CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, २ नोव्हेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक ३५२ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# बबनराव अवताडे शिवसेनेत प्रवेश करणार?

### राजकीय चर्चेला उधाण; आवताडे यांच्या कार्यालयास उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१ नोव्हेंबर-**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मंगळवेढ्यात येऊन सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष बबनराव आवताडे व खरेदी विक्री संघाचे चेअरमन सिध्देश्वर आवताडे त्यांच्या कार्यालयास भेट दिली.

शनिवारी सिध्देश्वर आवताडे यांचा वाढदिवस असल्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आवताडे यांचा सत्कार केला. याप्रसंगी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष बबनराव आवताडे, सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे, विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके, तालुका प्रमुख आबासाहेब लांडे, शहर प्रमुख प्रतीक किल्लेदार, स्वप्नील निकम आदी उपस्थित होते. दरम्यान, या भेटीमध्ये येत्या तीन चार दिवसात बबनराव आवताडे गटाचा शिवसेनेत प्रवेश होणार असल्याचे बोलले जात आहे. बऱ्याच दिवसापासून प्रवेश होणार, अशी चर्चा रंगली होती. यावेळी सोलापूर लोकसभा संपर्क प्रमुख महेश साठे यांनी आवताडे यांचा प्रवेश घ्यायचा आहे. त्यावर एकनाथ शिंदे म्हणाले तीन चार दिवसात प्रवेश करून घेऊ असे आश्वासन यावेळी दिले. दरम्यान, आमदार समाधान आवताडे यांनी दामाजी चौकात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले दामाजी पुतळ्यास एकनाथ शिंदे यांनी पुष्पहार अर्पण करून शिंदे यांचा ताफा बबनराव आवताडे यांच्या कार्यालयाकडे गेला.





# टेंभुर्णी पोलिसांचा २४ तासांत खुनाचा उलगडा!

### अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १ नोव्हेंबर-**

मौजे रांजणी शिवारातील उजनीच्या मुख्य कॅनलमध्ये सापडलेल्या हातपाय बांधलेल्या अनोळखी युवकाच्या खुनाचा तपास टेंभुर्णी पोलिसांनी अवघ्या २४ तासांत उलगडला आहे. पोलिसांनी या प्रकरणी तीन आरोपींना अटक करून खुनाचे गूढ उकलले आहे.

३० ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजण्यापूर्वी उजनी धरणालगतच्या मुख्य कॅनलमध्ये एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. मृतदेहाचे हातपाय दोरीने बांधून, त्याला दगड लावून पाण्यात फेकण्यात आले होते. प्राथमिक तपासात हा खून असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर टेंभुर्णी पोलिसांनी जिल्ह्यात तसेच जिल्हाबाहेर मृत व्यक्तीचा फोटो प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाद्वारे प्रसिद्ध करून ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यातून मयताची ओळख आश्रम विठ्ठल करंडे (वय ३१, रा. फपाळवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर) अशी पटली. सोलापूर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये त्याचे वडील विठ्ठल नवनाथ करंडे आणि नातेवाईकांनी मृतदेहाची ओळख पुष्टी केली. गावात चौकशी केली असता मयताला दारूचे व्यसन असल्याचे, तो नेहमी घरातील व बाहेरील लोकांना त्रास देत असल्याचे समोर आले.

तपासादरम्यान पोलिसांनी मृताचा भाऊ रणजित उर्फ सौरभ विठ्ठल करंडे याच्यावर संशय घेतला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आणि त्याचे साथीदार सचिन धर्मा चौधरी व सोमनाथ उर्फ श्याम मोहन तांबे (तिघेही रा. फपाळवाडी, ता. बार्शी) यांनी आश्रम करंडेचा खून केल्याची कबुली दिली. तिघांनी बार्शी जवळील कदमवस्ती परिसरात दाताळाने डोक्यात मारून, नंतर गळा आवळून आश्रम करंडेचा खून केला. त्यानंतर ओळख पटू नये म्हणून हातपाय बांधून, दोरीला दगड बांधून मृतदेह उजनी कॅनलमध्ये फेकण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अटक आरोपींना माढा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता, त्यांना ७ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर आणि सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संजय जगताप, टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नारायण पवार, सपोनि विशाल वायकर, पीएसआय कुलदीप सोनटक्के, अजित मोरे, पुरुषोत्तम धापटे, विलास रणदिवे, प्रदीप पर्वते, संदीप गिरमकर, विलास नलवडे, रमेश जाधव, मोहन तळेकर, सुरज मुलाणी, प्रसाद अनभुळे, प्रकाश जगदाळे, गणेश इंगोले आदी सहभागी झाले होते.

## मूळच्या अहिल्यानगरच्या तेजस्वी सातपुते एसआयटीच्या प्रमुख

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १ नोव्हेंबर-**



फलटण येथील डॉ. संपदा मुंडे मृत्यू प्रकरणी तपास करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आली आहे. आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वात हे पथक काम करणार आहे. त्यांच्या पथकाला तत्काळ तपास सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेच. तेजस्वी या मूळच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील (शेवगाव) आहेत. मोठ्या जिद्दीने आयपीएस अधिकारी झाल्या असून पोलिस अधीक्षक आणि उपायुक्त (सशस्त्र पोलीस दल उपायुक्त पुणे येथे कार्यरत) म्हणून विविध ठिकाणी त्यांनी काम केलेले आहे. आता या गाजलेल्या, महत्वाच्या आणि तेवढ्याच संवेदनशील गुन्ह्याच्या तपासाची जबाबदारी सरकारने त्यांच्यावर सोपविली आहे

# पालिका कर्मचाऱ्यांसाठी शासनाने दरमहा विशेष निधी द्यावा

### ▸▸धर्मवीर कर्मचारी संघटनेची उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**



सोलापूर महानगरपालिकेकडील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाप्रमाणे महागाई भत्ता मिळत नाही. सोलापूर महापालिकेची आर्थिक परिस्थिती नसल्याने अडचणी येत आहेत. यामुळे नगर विकास विभागाने सोलापूर महापालिका कर्मचाऱ्यांसाठी दरमहा सुमारे १० कोटी रुपये विशेष निधी द्यावा या मागणीचे निवेदन धर्मवीर शहर व शहर हद्दवाढ कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सोलापूर दौऱ्यावर आले असताना ''धर्मवीर'' संघटनेच्या वतीने त्यांना हे निवेदन देण्यात आले. सोलापुरात धर्मवीर कर्मचारी संघटनेसह विविध संघटनांच्या वतीने महापालिका कर्मचाऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात येत आहे. या मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण पत्र देण्यात आले, अशी माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे यांनी दिली. सोलापूर महानगरपालिकेकडील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाप्रमाणे महागाई भत्ता मिळत नाही. त्यामुळे वारंवार प्रशासनाकडे संघटनेच्या मार्फत शासनाप्रमाणे महागाई भत्ता देणे बाबत निवेदन दिलेलो आहेत.



महापालिका प्रशासनाकडे पैसे नसल्यामुळे महागाई भत्ता देऊ शकत नाहीत, अशी अडचण सांगण्यात येते. त्यामुळे शासनाच्या नगर विकास विभागाकडून सोलापूर महापालिका कर्मचाऱ्यांसाठी विशेष निधी म्हणून कमीत कमी दरमहा ८ ते १० कोटी मंजुर करुन सोलापूर महानगरपालिकेकडे वितरीत करावा. तसे आदेश नगरविकास विभागास द्यावेत, असे धर्मवीर कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मल्लिकार्जुन हुणजे यांनी या निवेदनात म्हटले आहे.

# महापालिकेचे गाळे, समाजमंदिर, खुल्या जागेचे भाडे थकबाकी वसुली मोहिम उद्यापासून

### विशेष वसुली पथकांची नियुक्ती; अन्यथा सील कारवाई महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

महानगरपालिकेच्या वतीने शहर हद्दीतील महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व मेजर शॉपिंग सेंटर, मिनी शॉपिंग सेंटर, भुई-भाडे (खुली जागा), अभ्यासिका-समाजमंदिर, अधिकृत खोके इत्यादी संपत्तीवरील गाळेधारक व भाडेधारकांकडील थकबाकी वसुली मोहिम सोमवार दि. ३ नोव्हेंबर २०२५ पासून सकाळी ९ वाजल्यापासून सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती पालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली. महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार दि. ३ नोव्हेंबर पासून सकाळी ९ वाजल्यापासून ही मोहिम राबविण्यात येणार आहे.

यासाठी संबंधित विभागामार्फत विशेष वसुली पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या विविध शॉपिंग सेंटर आणि खुल्या जागांवर अनेक गाळेधारक व भाडेधारकांकडून दीर्घकाळापासून थकबाकी बाकी आहे. या पार्श्वभूमीवर महसूल वाढ व शासकीय महसूल पुनर्प्राप्तीच्या दृष्टीने ही कार्यवाही करण्यात येत आहे. थकबाकीदार गाळेधारक व भाडेधारक यांनी आपली थकबाकी रक्कम तातडीने भरून मनपाला सहकार्य करावे. अन्यथा महानगरपालिकेकडून गाळे व जागा सील करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. उद्या पासून मेजर गाळ्यासंदर्भात कारवाई सुरु करण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या महसूल विभागाने या मोहिमेसाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण केली असून, सर्व संबंधित अधिकारी व वसुली पथके यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. ही मोहीम सातत्याने राबवून थकबाकी वसुलीचे उद्दिष्ट साध्य करण्याचा मनपा प्रशासनाचा संकल्प आहे, असेही उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले आहे.

# क्रीडा





सोलापूर : राजीव गांधी इनडोअर स्टेडियमवर झालेल्या शालेय जिल्हा कबड्डी स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविलेला विद्या मंदिर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज कोळाचा संघ. दुसऱ्या छायाचित्रात १७ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविलेला कै.व.दे.विद्यालय व ज्युनिअर कॉलेज जवळेचा संघ. या कामगिरीवर दोन्ही संघाची पुणे विभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली. दोन्ही संघाचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुधद्धचंद्र झपके यांनी अभिनंदन केले.



# रुद्र ॲकॅडमी, शिवस्मारक व ट्रेडिशनल अँड स्पोर्ट्स कराटेच्या ॲथलिटसची कामगिरी

### सोलापूर शहर व पुणे विभागीय शालेय कराटे स्पर्धा

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**

शालेय कराटे या क्रीडाप्रकारात सोलापूर शहर व पुणे विभाग स्तरावर रुद्र ॲकॅडमी, शिवस्मारक व ट्रेडिशनल अँड स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे सर्व ॲथलिटस आपापल्या वजनीगटात विजेते ठरले.

स्पोर्टस कराटे बॅचची आर्या यादव ही संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाची इयत्ता बारावीमधील विद्यार्थिनी एकोणीस वर्षाखालील मुली बावन्न किलो खालील वजन गटात तर सतरा वर्षाखालील मुले सत्तर किलो खालील वजनगटात ऋतुराज साठे हा बी.एफ. दमाणी प्रशालेचा इयत्ता दहावीतील विद्यार्थी राज्य स्तरीय स्पर्धेसाठी विभागाचे प्रतिनिधित्व करतील.सर्व यशस्वी कराटेपटूंना आंतरराष्ट्रीय कराटे ॲथलिट आशीयाई पदक विजेती भुवनेश्वरीच्या मार्गदर्शनाने अ स्तरीय राष्ट्रीय पंच व कोच मिहिर सुरेश जाधव तसेच रुद्रच्या सात रस्ता शाखा व दमाणी प्रशालेचे प्रशिक्षक आकाश झळकेनवरु यांनी प्रशिक्षण दिले असून संचालिका रेन्शी संगीता सुरेश जाधव यांचे निर्देश लाभले आहेत.

**शहरस्तरावरील यशस्वी कराटे ॲथलिट:**

अंश सोलसकर (यशोधरा कनिष्ठ महाविद्यालय), तेजस तुरेराव (गांधीनाथा हायस्कूल), तन्मय बहिरवाडे (सिद्धेश्वर इं.मे. स्कूल), कौशल तापडिया (महेश इंमे स्कूल), सिद्धराज कुलकर्णी (संगमेश्वर पब्लिक स्कूल), श्रेयस कवीटकर (मॉडर्न स्कूल), अक्षिता कुलकर्णी (मॉडेल पब्लिक स्कूल), लहर सज्जन, सानवी वाळवेकर (दोघे आय एम एस), शिवम डोईजोडे, क्षितिज जाधव, यशदीप देशपांडे, प्राची ताकभाते, ऋतुजा मोरे, स्वरा ताकभाते (सर्व दमाणी प्रशाला).

## मंगळवारी शरीरसौष्ठव स्पर्धा

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

नागेश करजगी ऑर्किड शाळा मैदान, जुनी मिल कंपौंड, मुरारजी पेठ येथे यशराज नागेश करजगी यांच्या वाढदिवसानिमित्त, एन. के. श्री शरीर सौष्ठव स्पर्धा मंगळवार ४ नोव्हेंबर रोजी आयोजित केली आहे. जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सूरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली व आरिफ माधवार यांच्या पुढाकाराने ही स्पर्धा सोलापूर, धाराशिव, व लातूर जिल्ह्यातील खेळाडूंसाठी आयोजित केली आहे. ही स्पर्धा ६ वजनी गटात असून प्रत्येक गटात ४ बक्षीसे,रोख रक्कम,सन्मान पत्र व सन्मान चिन्ह देवून विजयी खेळाडूंना गौरविण्यात येईल. विजेत्या श्रीसाठी २१ हजार, उपविजयीसाठी ५ हजार तर बेस्ट पोझर व मोस्ट अपकमिंगसाठी अडीच हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच ६ वजनी गटातून प्रथम चौघांना ४, ३, २ व १ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. परगावच्या खेळाडूंना एकवेळचे एसटी प्रवास व एक वेळ भोजनाची व्यवस्था संयोजकांनी केली आहे. वजन तपासणी मंगळवारी सायं. ४ ते ५ या वेळेत होईल. इच्छुकांनी जिल्हा शरीरसौष्ठव संघटनेचे सचिव प्रमोद काटे (मो. ९४२२३८००३३) यांच्याकडे नोंदणी करावी.

# संगमेश्वर कॉलेजला दुहेरी मुकुट

### महाविद्यालीयन व्हॉलिबॉल स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत माढा आर्ट्स अँड कॉमर्स महाविद्यालय येथे झालेल्या महाविद्यालयीन व्हॉलिबॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजच्या पुरुष व महिला संघाने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात त्यांनी गतवर्षीच्या उपविजेता बोरामणीच्या ग्लोबल महाविद्यालयाचा २-१ सेटने पराभव केला. महिला गटात त्यांनी सांगोला महाविद्यालयास हरविले. दोन्ही संघास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी, सुहेल पठाण, मलिक नदाफ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव प्रा. ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले.

**विजयी संघ : महिला :** तृप्ती माने, सानिका वाठवडे, प्रीती माने, अंबिका हुले, प्राची घोडकुंभे, श्रावणी माने, तेजस्विनी गोयल, आरती वानखडे, स्वाती झिंगाडे, वर्धना धपाटे.

**पुरुषः** सुमित बचूटे, अजिंक्य पाटील, तनवीर नाईकवाडी, प्रज्वल नाले, सोहेब पठाण, झहीर शेख, शहेजान शेख, शुजल कोरे, ओंकार व्हाणकडे, जुबेर शेख, जफर शेख निरंकार काळे.



## 'सोनी'च्या कांबळेची राज्य स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर :** डी.एच.बी. सोनी कॉलेजमधील १२ वी सायन्सच्या उत्कर्षराजे कांबळे याने शालेय विभागीय एअर पिस्तूल स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुलांच्या गटात तृतीय स्थान मिळविले. या कामगिरीवर त्याची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास शारीरिक शिक्षण संचालक सुवर्णा कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संचालिका डॉ वासंती अय्यर, प्राचार्य डॉ. आशा रोकडे, उपप्राचार्य बुमरा यांनी अभिनंदन केले.



**सोलापूर : मुंबईत झालेल्या महाराष्ट्राच्या वरिष्ठ गट महिला संघाने मध्यप्रदेशचा पराभव करून विजेतेपद पटकाविले. त्या संघाच्या निवड समितीचे चेअरमन सोलापूरच्या स्नेहल जाधव होत्या. त्यानिमित्त सोलापूरच्या क्रिकेटपटूंनी केक कापून आनंदोत्सव साजरा केला.**

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, २ नोव्हेंबर २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



नि राष्ट्रभक्तीने परिपूर्ण आणि अनुशासनबद्ध संस्कारांनी ओतप्रोत शे-दोनशे व्यक्ती कोणत्याही गावात असल्या तर त्या गावातील दोन-चार हजार नागरिकसुद्धा त्यांचे अनुकरण करतील आणि याच मार्गाने आपल्या हिंदू राष्ट्रात आसेतु हिमाचल एकसूत्र, राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भारतीय समाज उभा राहू शकतो. या कार्यासाठी वेळ लागू शकतो, पण यश निश्चित आहे.

**बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# ‘वंदे मातरम्’ समाजाला ऐक्याच्या सूत्रात बांधणारे

## रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन

◆ **जबलपूर, १ नोव्हेंबर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी शनिवारी ‘वंदे मातरम्’ लिहिणाऱ्या बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांचे स्मरण केले आणि समाजात विभाजनाची प्रवृत्ती वाढत असल्याने ‘वंदे मातरम्’ची भावना आत्मसात करावी, असे आवाहन केले. विभाजनाच्या वाढत्या प्रवृत्तीत ‘वंदे मातरम्’ हे समाजाला ऐक्याच्या सूत्रात बांधू शकते, असे होसबळे यांनी सांगितले.

१८७५ मध्ये रचलेले हे गीत राष्ट्रीय कवी रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ मध्ये काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात सादर करीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तेव्हापासूनच हे गीत केवळ देशभक्तीचा केवळ मंत्रच नव्हे, तर राष्ट्रीय घोषणा, राष्ट्रीय चेतनेचा आवाज आणि राष्ट्राचा आत्मा बनले आहे. त्यानंतर ‘वंदे मातरम्’ बंगालच्या फाळणीसह भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील सर्व सेनानींचे घोषवाक्य बनले, असे होसबळे यांनी म्हटले.

महर्षी अरबिंदो, मॅडम भिकाजी कामा, महान कवी सुब्रमण्यम् भारती, लाला हरदयाल, लाला लजपत राय इत्यादी देशातील अनेक विद्वान आणि महापुरुषांनी त्यांची वर्तमानपत्रे आणि मासिकांच्या नावांमध्ये ‘वंदे मातरम्’चा समावेश केला होता. महात्मा गांधीही अनेक वर्षे त्यांच्या पत्रांचा शेवट ‘वंदे मातरम्’ने करीत असत, असे दत्तात्रेय होसबळे म्हणाले.



‘वंदे मातरम्’ हे देशाचे आत्मगीत आहे, त्याची प्रेरणा सर्वांना मिळते. ‘वंदे मातरम्’ची रचना झाल्यानंतर १५० वर्षांनीही दिव्य प्रभावामुळे समाजात राष्ट्राप्रति समर्पणाची भावना निर्माण करण्याची शक्ती त्यात आहे. प्रदेश, भाषा आणि जात इत्यादी संकुचित विचारसरणीच्या आधारावर आज फूट पाडण्याची प्रवृत्ती वाढत असताना ‘वंदे मातरम्’ हा समाजाला एकत्र आणणारा धागा आहे, असे दत्तात्रेय होसबळे यांनी म्हटले.

या राष्ट्रीय गीताला भारतातील सर्व प्रदेश, समाज आणि भाषांमध्ये सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे. आजही ‘वंदे मातरम्’ समाजाच्या राष्ट्रीय चेतनेसाठी, सांस्कृतिक ओळखीसाठी आणि एकतेच्या भावनेसाठी एक मजबूत पाया म्हणून काम करते. आजही ते समाजाच्या राष्ट्रीय चेतनेसाठी, सांस्कृतिक ओळखीसाठी आणि एकतेच्या भावनेसाठी एक शक्तिशाली पाया आहे. राष्ट्रीय चेतना आणि राष्ट्रनिर्मितीच्या या पवित्र वेळी, या महान मंत्राच्या भावनेचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे होसबळे यांनी सांगितले.

‘वंदे मातरम्’ या गीताच्या रचनेला १५० पूर्ण झाल्याच्या शुभ प्रसंगी, रा. स्व. संघ सर्व स्वयंसेवकांसह संपूर्ण समाजाला आवाहन करतो की, त्यांनी प्रत्येक हृदयात ‘वंदे मातरम्’ची प्रेरणा जागृत करावी आणि ‘स्व’च्या आधारावर राष्ट्र उभारणीच्या कार्यात सक्रिय व्हावे तसेच या प्रसंगी आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी व्हावे, असे दत्तात्रेय होसबळे म्हणाले. (वृत्तसंस्था)

### एकतेच्या भावनेचा मजबूत आधार

‘वंदे मातरम्’ आजही राष्ट्रीय चेतना, सांस्कृतिक ओळख आणि समाजाच्या एकतेच्या भावनेचा मजबूत आधार आहे. राष्ट्रीय चेतना आणि राष्ट्र उभारणीच्या पुनर्जागरणाच्या या पवित्र काळात, या महान मंत्राच्या भावना समजून घेण्याची गरज आहे.

# व्यंकटेश्वर मंदिरातील चेंगराचेंगरीत १० ठार

## आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम् येथील दुर्घटना

◆ **श्रीकाकुलम्, १ नोव्हेंबर**

आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यातील कासीबुग्गा येथील व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात शनिवारी झालेल्या चेंगराचेंगरीत १० भाविकांचा मृत्यू झाला, तर काही जण जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. एकादशीमुळे मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास ही चेंगराचेंगरी झाली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या दुर्घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

एकादशी असल्याने व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात शनिवारी मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली. मंदिर परिसरात प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढल्याने लोकांमध्ये गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी धाव घेत बचावकार्य सुरू केले. साडेअकरा वाजता झालेल्या चेंगराचेंगरीत १० जणांचा मृत्यू, तर दोन जण जखमी झाल्याची माहिती काशीबुग्गा उपविभागाचे पोलिस उपअधीक्षक लक्ष्मण राव यांनी दिली. या चेंगराचेंगरीत किमान पाच भाविक जखमी झाले, अशी माहित आंध्रप्रदेशच्या गृहमंत्री वंगालेपुडी अनिथा यांनी दिली. मृत्युमुखी पडलेले भाविक ३५ ते ४० वर्ष वयोगटातील असल्याचे त्यांनी सांगितले.

कासीबुग्गा व्यंकटेश्वर मंदिर हे देणगी विभागाच्या अखत्यारित नव्हे, तर खाजगी आहे. दर शनिवारी येथे दीड ते दोन हजार भाविक येतात. कार्तिकातील एकादशीनिमित्त येथे भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली, असे अनिथा यांनी सांगितले.

या चेंगराचेंगरीवर आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी दुःख व्यक्त केले. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधान कार्यालयाकडून दोन लाखांची मदत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेवर तीव्र शोक व्यक्त केला. पंतप्रधान कार्यालयाने मृतकांच्या कुटुंबीयांना दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आल्याची माहिती पंतप्रधान कार्यालयाने दिली.

## महत्त्वाचे

### सीएमएस-०३ उपग्रहाचे आज होणार प्रक्षेपण

**श्रीहरिकोटा** : भारतीय अंतराळ संस्था अर्थात इस्रो रविवारी आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथून सायंकाळी ५:२६ वाजता ४,४१० किलो वजनाचा सीएमएस-०३ उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करणार आहे. हा भारतातून सोडला जाणारा इस्रोचा सर्वाधिक वजनाचा उपग्रह आहे आणि नौदलाची क्षमता वाढविणे याचा उद्देश आहे. सीएमएस-०३ उपग्रह इस्रोच्या शक्तिशाली रॉकेट, एलएमव्ही३-एम५ वापरून पृथ्वीच्या भू-समकालिक हस्तांतरण कक्षेत प्रक्षेपित केला जाईल. हा उपग्रह भारताच्या उच्च-क्षमतेच्या अंतराळ संशोधनाला एक नवीन दिशा प्रदान करेल आणि सागरी क्षेत्रात संवाद साधण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. नौदल आणि लष्करात समन्वय साधण्यासह शत्रूची गोपनीय माहिती मिळविण्यासाठी या उपग्रहाचा उपयोग होणार आहे. देशातील डिजिटल संप्रेषण, उपग्रह इंटरनेट आणि सागरी कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी उपग्रहाचा फायदा होईल.

### जेईई मेन्स-२०२६ साठी नोंदणी प्रक्रिया सुरू

**नवी दिल्ली** : जानेवारी महिन्यात होणाऱ्या जेईई मेन्स सत्र १ च्या परीक्षेसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख २७ नोव्हेंबरपर्यंत आहे. परीक्षा केंद्राची यादी जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केली जाईल. राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात् एनटीएने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, जेईई मेन्स दोन परीक्षांमध्ये घेतली जाईल. पहिली परीक्षा जानेवारीमध्ये आणि दुसरी एप्रिलमध्ये घेतली जाणार आहे. जेईई मेन्स २०२६ सत्र १ साठी नोंदणी सुरू झाली आहे. एनटीएच्या संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहे. सत्र १ ची परीक्षा २१ जानेवारी ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान होणार आहे, तर दुसरे सत्र १ एप्रिल ते १० एप्रिल २०२६ पर्यंत असेल. ही परीक्षा १३ भाषांमध्ये घेतली जाईल, त्यात इंग्रजी, हिंदी, आसामी, बंगाली, गुजराती, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, पंजाबी, तमिळ, तेलुगू आणि उर्दू यांचा समावेश आहे.

# मतदार याद्या निर्दोष करा, नंतरच निवडणूक घ्या

## राज-उद्धव यांचे निवडणूक आयोगाला आवाहन

### मनसे-उबाठाचा मुंबईत मोर्चा, शरद पवार गट आणि काँग्रेस नेते सहभागी

◆ **मुंबई, १ नोव्हेंबर**

मतचोरी आणि मतदार याद्यांमधील घोळाचा आरोप करत, आधी मतदार याद्या निर्दोष, पारदर्शक करा, त्यानंतर निवडणुका घ्या, अशी मागणी मनसे अध्यक्ष राज ठाकरे, उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्याच्या मोर्चाला संबोधित करताना केली.

मतचोरी आणि मतदार याद्यांमधील घोळाचा आरोप करत महाविकास आघाडीने मुंबईत सत्याचा मोर्चा काढला. या मोर्चात ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, सुप्रिया सुळे, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, सहभागी झाले आहेत. सोबतच डाव्या पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते देखील मोर्चात सहभागी झाले होते.



मोर्चाला उसळलेली गर्दी

कल्याण-डोंबिवली-मुरबाड येथील साडेचार हजार मतदारांनी मलबार हिल मतदारसंघातही मतदान केल्याचा आरोप राज ठाकरे यांनी आपल्या भाषणातून केला. पुराव्यादाखल त्यांनी तीन नावे वाचूनही दाखविली. सगळे लपून-छपून सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. तर जेव्हा कधी निवडणुका होतील, तेव्हा याद्यांवर काम करा. प्रत्येक चेहरा ओळखला पाहिजे. दुबार-तिबार तिथे आले, तर तिथेच फोडून काढा आणि मग पोलिसांच्या ताब्यात द्या, असे आवाहन यावेळी राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना केले. (तभा वृत्तसेवा)

**सत्तेचा गैरवापर केला जात आहे : शरद पवार**
(पान ५ वर)

### माझ्या नावाने खोटा अर्ज : उद्धव ठाकरे

माझ्या म्हणजे उद्धव बाळासाहेब ठाकरे या नावाने खोटा अर्ज करण्यात आल्याचा खुलासा उद्धव ठाकरेंनी यावेळी केला. आयोगाचे अधिकारीच पडताळणीसाठी आले आणि त्यांनी सांगितले. असा सगळा बोगस प्रकार चालला आहे. असे सगळे पुरावे घेऊन न्यायल्यात जाणार असून, न्याय मिळेल अपेक्षा आहे. जनता तुमचा निर्णय करेल असा इशारा देत आम्ही एकत्र तुमच्यासाठी आलो असे सांगत, तुम्हीच साथ दिली नाही तर आमच्या एकत्र येण्याला काही अर्थ नसल्याचे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

### जीएसटी संकलन १.९६ लाख कोटी रुपये

**नवी दिल्ली** : कर कपातीनंतर सणासुदीच्या काळात झालेल्या खरेदीमुळे ऑक्टोबरमध्ये एकूण जीएसटी संकलन १.९६ लाख कोटी रुपयांवर गेले. हे संकलन वार्षिक वृद्धीच्या ४.६ टक्के आहे. यंदाच्या आर्थिक वर्षातील जीएसटीची ही सर्वांत कमी आकारणी आहे.

# जुबेरच्या वळसंगमधील शिबीरामध्ये उपस्थित असलेल्या एकाची चौकशी

## शिबीरात उपस्थित नावाची यादी पोलिसांकडे

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**

पुणे एटीएसने अटक केलेला जुबेर हंगरगेकर हा वळसंग येथे ज्या शिबीरासाठी आला होता, त्या शिबीराला उपस्थित असलेल्यांच्या नावाची यादी पोलिसांना मिळाली असून या यादीतील सोलापूरातील सर्वांची चौकशी करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

अल कायदा या दहशतवादी संघटनेशी संबंधित असलेल्या जुबेर हंगरगेकर दहा दिवसाखाली सोलापुरात एका कार्यक्रमासाठी आला होता. त्या कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्यांपैकी जेलरोड पोलिसांनी एकास ताब्यात घेवून शनिवारी चौकशी केली आहे. मात्र पोलिसांनी त्याविषयी माहिती देण्यास नकार दिला. त्या कार्यक्रमासाठी हजर राहिलेल्यांची यादी पोलिसांच्या हाती लागली आहे. त्यानुसार प्रत्येकास बोलावून चौकशी केली जात आहे. तसा अहवालही वरिष्ठ कार्यालयास दिला जाणार आहे. अल कायदा शी संबंधित असलेल्या जुबेर हंगरगेकर यास पुणे एटीएस पोलिसांनी अटक केली असून त्यास ४ नोव्हेंबर पोलिस कोठडी दिली आहे.

त्याच्याशी संपर्कात असलेल्या प्रत्येकांना ताब्यात घेवून चौकशी केली जात आहे. त्यानुसार पुणे एटीएस पथकाने सोलापूर शहरातील तिघांना ताब्यात घेवून चौकशी केली आहे. जुबेर वळसंग मधील एका शाळेमध्ये ऑक्टोंबरमध्ये आला होता. त्या ठिकाणी उपस्थित राहिलेल्या ३0 हून अधिक जणांची यादी पोलिसांच्या हाती लागली आहे. त्या प्राप्त यादीनुसार शहरातील त्या कार्यक्रमासाठी गेलेल्यांची चौकशी होणार आहे.






# निवडणुकांच्या तोंडावर मविआचा फेक नरेटिव्हचा कट उधळून लावा : रविंद्र चव्हाण

### भाजपाचे मूक आंदोलन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ ऑक्टोबर:**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तोंडावर महाविकास आघाडीच्या नेत्यांचा पराभवाच्या भीतीपोटी लोकसभेसारखाच पुन्हा फेक नरिटिव्ह पसरवण्याचा कट आहे. भाजपाच्या बूथ स्तरापासूनच्या प्रत्येक कार्यकर्त्यांने पेटून उठायला हवे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केली.

महाविकास आघाडीचा खोटा प्रचार आणि भ्रम निर्माण करण्याचे डाव हाणून पाडण्यासाठी, मविआच्या दुटप्पी भूमिकेची पोलखोल करण्यासाठी शनिवारी गिरगाव चौपाटी येथे करण्यात आलेल्या मूक आंदोलनावेळी चव्हाण बोलत होते. भाजपा मुंबई अध्यक्ष आ. अमित साटम, कौशल्य विकास




आणि उद्योजकता व पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ, आ. योगेश सागर, आ. विद्या ठाकूर, आ. संजय उपाध्याय यांच्यासह अनेक आमदार, युवा मोर्चा मुंबई अध्यक्ष तेजिंदर सिंग तिवाना, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी सहभागी झाले होते. यावेळी चव्हाण म्हणाले की, प्रत्येक नागरिकाच्या स्वप्नातला महाराष्ट्र घडवण्यासाठी महायुती सरकार झोकून काम करत असताना महाविकास आघाडी राज्यात अराजक माजवून पिछाडीवर नेण्याचा प्रयत्न करत आहे. परदेशी शक्ती आणि फंडिंगच्या मदतीने पोसणा-या सामाजिक संस्थांना हाताशी घेऊन विकास रोखण्याचे आणि दिशाभूल करून अस्थिरता निर्माण करण्याचे काम ही मंडळी करत आहेत. ठाकरे बंधूंवर निशाणा साधत चव्हाण म्हणाले की, हे बंधू वक्तृत्वशैलीच्या बळावर जनतेला महाराष्ट्राच्या अस्मितेवरून भावनिक आवाहनांमध्ये अडकवून त्यांची दिशाभूल करत आले आहेत. महाराष्ट्राला सर्वात वाईट दिवस ठाकरे बंधूंनी दाखवले. महायुती सरकारच्या काळात राज्याला पुढे नेण्यासाठी होत असलेले प्रकल्प, योजना याकडे डोळे उघडे ठेवून पहा असे आवाहन केले. अमित साटम म्हणाले की, मतदार आपल्याला का नाकारत आहेत याचे आत्मपरिक्षण करण्याऐवजी मविआ नेत्यांनी मोर्चाच्या माध्यमातून असत्याचा तमाशा लावला आहे. आगामी निवडणुकांमध्ये महाराष्ट्रातील मतदारांनी मविआला घरचा रस्ता दाखवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे निवडणूक निकालानंतर प्रतिक्रिया काय द्यायची याची पूर्वतयारी म्हणजे हा मोर्चा आहे अशी खिल्ली त्यांनी उडविली.

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# एक धागा सुताचा

दैनंदिन जीवनशैलीत ज्या काही बाबी आपल्याला जिव्हाळ्याच्या वाटतात, त्यामध्ये राजकारण हा एक आवडता विषय असतो. अनेक जण राजकारणाकडे गांभीर्याने पाहात असल्याने, देशाच्या राजकारणात जे काही घडत, बिघडत असते, त्यानुसार त्यांच्या आनंदाचा निर्देशांक बदलत असतो. अनेकदा असे काही घडते की त्यामुळे त्यांना काहीतरी आशादायक वाटू लागते आणि असेही काही वेळा घडते, त्यामुळे नैराश्य वाटू लागते. कधी कधी राजकारणाविषयी चिंता वाटू लागते आणि कधी कधी किळसही येते. अलिकडच्या काळात तर चिंता वाटण्यासारख्याच घटना अधिक असाव्यात अशी स्थिती असल्याने, राजकारणाकडे गांभीर्याने पाहावयाचे की जे काही चालले आहे त्याकडे करमणुकीच्या भावनेने पाहावयाचे याचा संभ्रम वाटण्यासारखी स्थिती आहे. गेल्या काही महिन्यांत तर, राजकारण ही केवळ करमणूकच नव्हे, तर तो निव्वळ विनोद असावा असेही काही घडताना दिसू लागले आहे. दिवाळीच्या दिवसांत फटाक्यांची आतषबाजी करण्यातली मजा अनुभवणे हा मुलांच्या आनंदाचा सोहळा असतो. यंदाच्या दिवाळीत मात्र, पावसाळी वातावरणामुळे काही फटाके वाजलेच नाहीत. आपला फटाका हमखास वाजणार या विश्वासाने काही जण तो घेऊन मैदानात उतरले, त्याची वातही पेटविली आणि आता मोठ्ठा धमाका होणार या अपेक्षेने लोकांच्या नजराही त्या फटाक्याकडे लागल्या. फटाका वाजविणाऱ्यानेही आपले कान झाकून घेतले आणि होणाऱ्या हादऱ्याने बरीच काही पडझड वगैरे होणार या अपेक्षेने वाटही पाहिली. पण त्यांना आणि लोकांनाही अपेक्षित धमाका झालाच नाही आणि फटाक्याची पेटविलेली वात आतल्या दारूपर्यंत पोहोचण्याआधीच विझून गेल्याने त्यांचाच हिरमोड झाला. आता दिवाळी संपल्यानंतर असे, न वाजलेले फटाके गोळा करून त्यांना दुसऱ्या फटाक्यांच्या वाती लावून पुन्हा वाजविण्याचा प्रयत्नही काही जणांनी सुरू केला आहे. कुणा एखाद्याने अगोदर वाजवलेला फटाका फुसका निघाल्यानंतर त्याला दुसऱ्या फुसक्या फटाक्याची वात लावून तो पुन्हा वाजविण्याचे तंत्र जमले की होणारा आनंद मूळ वातीच्या फटाक्यातून निघणाऱ्या आवाजाहूनही अधिक असतो. तो आनंद मिळविण्याचा प्रयत्न त्यामध्ये होता, हे उघड आहे. पण तो प्रयत्नदेखील फसल्यावर होणारा हिरमोड मात्र निराशाजनक असतो.

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना, काही आठवड्यांपूर्वी काहीसा तोच अनुभव आला असावा. अॅटम बॉम्बचा धमाका उडविण्याच्या आवेशात मोठा गाजावाजा करून त्यांनी उभ्या पक्षाला कामाला लावून एक अॅटम बॉम्ब तयार केला आणि मोठ्या उत्साहात माध्यमांच्या साक्षीने त्यांनी या अॅटम बॉम्बची वातदेखील पेटविली. या फटाक्याचा मोठ्ठा धमाका होणार या अपेक्षेने त्यांनी स्वत:चेच कान घट्ट झाकूनही घेतले, पण तो फटाकाही वाजलाच नाही. मोठ्या अपक्षेने फटाक्याची वात पेटवावी, हाताने कान घट्ट झाकून घ्यावे आणि वात विझून गेल्याने आवाजही येऊच नये, असे झाल्यावर लहान मुलांना जे वाटते, तसेच काहीसे त्यांनाही झाले असावे. राहुल गांधी यांच्या त्या अॅटम बॉम्बचा स्फोट तर झाला नाहीच, पण तो साधा वाजलादेखील नाही. उलट, राहुल गांधी ज्या आवेशात आरोपांच्या माळा लावतात, तो आवेशच नंतर फुसका ठरतो हे पुन्हा एकदा दिसू लागल्याने त्यांचा हा नवा बॉम्बदेखील अगोदरच्या अनेक फुसक्या फटाक्यांप्रमाणेच निकामी ठरल्याचीच चर्चा सुरू झाली. २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला मतचोरीचा फटका बसला होता, असा एक कांगावा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनीही एकदा केला होता, तेव्हाही काँग्रेसजनांना तो मोठा अॅटम बॉम्ब वाटला होता. पण निवडणूक आयोगाने काँग्रेसला चर्चेसाठी पाचारण केल्यावर मात्र, या बैठकीत हजर राहण्याचे टाळून आपला बॉम्ब फुसका निघाल्याची अप्रत्यक्ष कबुलीच काँग्रेसने दिली होती. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत मतचोरीचे काही दाखले दिल्यानंतर हेच आरोप प्रतिज्ञापत्राद्वारे दाखल करण्याचे आयोगाने दिलेले आव्हानही काँग्रेसने स्वीकारलेच नाही आणि नेहमीप्रमाणे हा नवा फटाकादेखील फुसका होता हे स्पष्ट झाले.

अॅटम बॉम्बचा धमाका उडविण्याच्या आवेशात राहुल गांधींना मैदानात उतरवायचे आणि ऐनवेळी तो बॉम्बच फुसका निघावा हा राहुल गांधींच्या बाबतीत काँग्रेसला येणारा हा काही पहिलाच अनुभव नाही. याआधीही राहुल गांधींचे अनेक फटाके असेच फुसके ठरले होते. त्यामुळे असे फुसके फटाके वाजविण्याऐवजी नव्या करमणुकीच्या खेळांचा सराव सुरू झालेला दिसतो. राहुल गांधी हेच या नव्या खेळांचे कप्तान आहेत. सध्या त्यांनी पंतप्रधान मोदी यांना घेरण्यासाठी लावलेल्या नव्या फटाक्याची वात काँग्रेसच्याच दिशेने फिरल्याचे दिसू लागले आहे. मोदी मतांसाठी काहीही करून दाखवतील, त्यांना नाच करावयास लावले तर ते नाचदेखील करतील असे काहीसे विचित्र विधान त्यांनी एका सभेत जाहीरपणे केल्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर फिरू लागली आणि मतदारांच्या हातात हात गुंफून नाच करणाऱ्या सोनिया गांधी, प्रियांका गांधी आणि खुद्द राहुल गांधी यांच्याच चित्रफितींचा सुळसुळाट समाजमाध्यमांवर दिसू लागला. मतांसाठी नाच करण्याची गांधी कुटुंबाचीच परंपरा अधोरेखित करून राहुल गांधींचा नवा फटाकादेखील फुसका ठरविण्याकरिता समाजमाध्यमांवरील एक सजग वर्ग सज्ज झालेला दिसत आहे.

तरीही, अशा प्रकारे राहुल गांधी यांनी पेटविलेले फटाके फुसके निघाल्यानंतर न वाजलेल्या त्याच फटाक्यांना नव्या वाती लावून नवे स्फोट घडविण्याची नवीच कल्पना उद्धव ठाकरे यांच्या गटास सुचली आणि हुबेहूब राहुल गांधी यांनी केलेल्या तयारीचीच नक्कल करून आदित्य ठाकरे यांनी मतदारयाद्यांच्या घोळाचे प्रात्यक्षिक करून राहुल गांधींना जे



जमले नाही ते करून दाखविण्याचा प्रयत्न केला. मागच्या आठवडाभरात अशाच 'कॉपी पेस्ट' उपक्रमांना महाराष्ट्राच्या राजकारणात उधाण आले होते. आदित्य ठाकरे यांनी त्यांच्या वरळी विधानसभा मतदारसंघातील मतदारयाद्यांमधील घोळाचे काही नमुने कार्यकर्त्यांसमोर सादर केले आणि पुन्हा एकदा निवडणूक आयोगाविषयी संभ्रम पसरविण्याच्या राहुल गांधी यांच्याच प्रयत्नांची पुनरावृत्ती करून पाहिली. पण त्या फटाक्याचाही फारसा गाजावाजा झालाच नाही. राहुल गांधींच्या फुसक्या फटाक्यानंतर निवडणूक आयोगाने त्यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आव्हान तरी दिले होते. आदित्य ठाकरे यांनी तोच न वाजलेला फटाका नव्या वातीनिशी पुन्हा वाजविण्याचा प्रयत्न केल्यानंतर निवडणूक आयोगाने तर त्याची दखलही घेतलेली दिसत नाही. या फटाक्याचा स्फोट घडविण्यासाठी आदित्य ठाकरे यांनीदेखील राहुल गांधी यांच्यासारखाच मंच सजवला होता. त्याच पद्धतीचे सादरीकरण करून काकणभर सरस नेपथ्य घडविण्याचा प्रयत्नही केला गेला. पण मतदारयाद्यांतील काही त्रुटींमुळे किंवा यादीतील घोळामुळे मतदानात घोळ असल्याचा छातीठोक दावा मात्र कोणालाच करता आला नाही. एखाद्या मतदाराचे नाव वेगवेगळ्या याद्यांमध्ये असू शकते, त्याची काही कारणेही असतात. नावांची अशी पुनरावृत्ती होणे योग्य नाही, याबाबत कोणाचेही दुमत नसूनही, दोन वेगवेगळ्या याद्यांमध्ये नाव असलेला मतदार दोन वेळा मतदान करू शकत नाही, ही बाब मात्र गुलदस्त्यात ठेवून मतदारांमध्ये संभ्रम पसरविणारा तो फटाकाही फुसकाच ठरला. मागे एकदा, नवी मुंबईतील एका सभेत खुद्द शरद पवार यांनीच मतदारांना एक सल्ला दिला होता. आपल्या गावी असलेल्या यादीत तुमचे नाव असेल तर गावाकडे मतदान करा, नंतर बोटावरची शाई पुसा आणि पुन्हा मुंबईत मतदान करा, असे त्यांनी भर सभेत सांगितल्यामुळे गोंधळ उडाला. आम आदमी पार्टीने तर, याआधीच्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात बोगस मतदान झाल्याचा थेट आरोपही केला. या वक्तव्याच्या चौकशीची चक्रे फिरू लागली तेव्हा पवार यांनी आपल्या वक्तव्यावर सारवासारव केली. असे दुबार मतदान कसे करता येईल असा प्रश्नही विचारला गेला आणि आपण गमतीने तसे बोललो असे सांगून पवार यांनीच दुबार मतदानाच्या शक्यतेचा इन्कारही केला होता. आज पवारांनी मतदारांना दिलेला तो सल्ला आणि नंतर केलेली ती सारवासारव लक्षात असती तर कोणीही दुबार मतदानाचा कांगावा करत भुई धोपटली नसती.

आदित्य ठाकरे यांचा प्रयोगही राहुल गांधी यांच्या प्रयोगाप्रमाणेच फसला. असा कांगावा लोकांना पटत नाही हे स्पष्ट झाल्यावर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरे यांनी आता याच मुद्द्यावर दंड थोपटले आहेत. मनसेच्या स्थापनेपासून राज ठाकरे यांना एका गहन प्रश्नाने ग्रासलेले आहे. तोच प्रश्न खुद्द शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनाही पडला होता आणि त्याचे उत्तर त्यांना कधीच सापडलेही नव्हते. आपल्या सभांना एवढी प्रचंड गर्दी होते, मग मतदानाच्या वेळी हे लोक कोठे जातात, असा प्रश्न त्यांनी सभेला उपस्थित असलेल्या जनतेलाच विचारला होता. तेव्हा तर, राज्यात काँग्रेसच्या झेंड्याखाली सत्ताकारण सुरू होते. बाळासाहेबांना ते कोडे कधीच उलगडले नाहीच, पण त्याच कोड्याचे ओझे पुढे राज ठाकरे यांच्या खांद्यावर येऊन पडले. राज ठाकरे यांच्या सभांनाही प्रचंड गर्दी होते. त्यांच्या भाषणाला टाळ्या, शिट्ट्यांचा गजरही होतो. पण त्यांनाही मते मात्र मिळतच नाहीत. मनसेच्या स्थापनेपासून पुढे या पक्षाला मतांच्या राजकारणात गळतीच लागली आणि त्यांच्यासमोरील हे कोडे अधिकच गूढ होत गेले. अजूनही त्यांना तो प्रश्न पडलेला असल्याने, मतदारयाद्यांच्या घोळाचा धागा पकडून त्याचे उत्तर शोधण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. वस्तुतः, राज ठाकरे किंवा उद्धव ठाकरे यांनी मतदारांच्या मानसिकतेचा किंवा मतदारांच्या अपेक्षांचा फारसा विचार केलेला नसावा, असा त्यांच्या एकूण राजकारणाचा बाज आहे. आपण ठरवू ते धोरण आणि आपण बांधू ते तोरण अशीच त्यांची राजनीती आहे. त्यामुळेच, सत्ता हाती द्या, मी सगळे सुतासारखे सरळ करेन असा दावा करणारे राज ठाकरे सतत तोडफोडीची आणि खळ्ळ खट्याककीच भाषा करत राहिले. मारझोड, नासधूस, ही त्यांच्या राजकारणाची दिशा अनेकदा स्पष्ट झाली आहे. कोणताही जनहिताचा प्रश्न हाती घेऊन तोदेखील नासधूस, तोडफोडीच्या मार्गाने सोडवावा या विचारावर राज ठाकरेंचा पक्ष ठाम असतो, असे अनेकदा दिसून आले आहे. रस्त्यांवरील टोल आकारणी हा जनतेच्या दृष्टीने संवेदनशील आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. तो राजकीय चातुर्याने हाताळला, तर जनतेचा विश्वास संपादन करणे शक्य होते. पण हा प्रश्नदेखील राज ठाकरे यांच्या पक्षाने खळ्ळ खट्याक नीतीनेच हाताळला आणि या मुद्द्यावरून लावलेला फटाकाही फुसकाच ठरला. सभेसाठी जमणाऱ्या अलोट गर्दीचे रूपांतर मतदानात का होत नाही, हा बाळासाहेबांना पडलेला प्रश्न राज ठाकरेंना पडला, ते साहजिकही होते. उद्धव ठाकरे यांना मात्र तो प्रश्न पडण्याचे फारसे काही कारणच नसावे. कारण त्यांनी युती आणि आघाडीच्या आधारावरच सत्ताकारण केले. शिवसेनेत फूट पडण्याआधी उद्धव ठाकरे यांनी आपल्या राजकारणाची दिशा बाळासाहेबांच्या राजनीतीच्या नेमक्या उलट दिशेने फिरवली. भाजपसोबतच्या दीर्घकाळातील युतीमुळे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला सत्तेच्या सान्निध्यात राहणे शक्य झाले होते. पुढे भाजपविरोधात कडवट भूमिका घेऊन त्यांनी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडी केली, त्यामुळे पुन्हा सत्तेची ऊब मिळतच गेल्याने, मतांच्या बेरजेचा हिशेबही करण्याची गरज त्यांना भासली नसावी. शिवसेनेच्या सभांना होणाऱ्या गर्दीत त्या पक्षाच्या मतदारांचा आकडा घरंगळत चालल्याचे स्पष्ट होऊनही, सत्ता सहजसाध्य होत गेल्याने, उद्धव ठाकरे यांना तो प्रश्न पडला नसावा. आता मात्र, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर पक्षाला पुरती गळती लागल्यावर कदाचित त्यांना सत्तेची नवी गणिते, नव्या कुबड्या शोधण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या प्रश्नाची पालखी त्यांच्याही खांद्यावर येण्याची चिन्हे दिसू लागल्याने, पुन्हा त्यांच्या गटानेही मतदारयाद्यांच्या घोळाच्या सुतावरून राजकारणातला स्वर्ग गाठण्याचा राहुल गांधी यांचा फुसका फटाका वाजविण्याचा खटाटोप चालविलेला दिसतो.

त्यामुळेच, राजकारणाकडे गांभीर्याने पाहणाऱ्यांना आता त्यात फारसा रस राहिलेला नाही. राजकारण हा करमणुकीचा खेळ वाटावा असे अनेक नवनवे किस्से यात भर टाकत आहेत. सरत्या आठवड्याच्या सुरुवातीस, गेल्या सोमवारी उद्धव ठाकरे यांच्या गटाचा निर्धार मेळावा मुंबईच्या वरळी डोममध्ये पार पडला. याच मेळाव्यात आदित्य ठाकरे यांनी मतदारयादीतील गोंधळाच्या राहुल गांधी यांच्या प्रात्यक्षिकाचा पुढचा प्रयोग सादर केला होता आणि त्यापाठोपाठ राज ठाकरे यांनी आपल्या पक्षाच्या मेळाव्यात मतदान यंत्रे घोळ करू शकतात असे लोकांना भासविण्यासाठी काही जादूचे प्रयोगही करून दाखविले होते. सार्वजनिक मंचावर सनसनाटी आरोप करून सरकारविरुद्ध आणि सरकारी यंत्रणांविरुद्ध समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण करण्याची एक सूत्रबद्ध कार्यपद्धती कामाला लागलेली आहे, असा थेट आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या त्या फसलेल्या प्रयोगानंतर केला होता. अशा प्रयोगांमुळे आरोप करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेभोवतीच गैरसमज आणि संशयाचे धुके पसरणार असून ते टाळावयाचे असेल तर सज्जड पुराव्यांसह जनतेसमोर जाणे योग्य ठरते, असा सल्लाही त्यांनी त्या वेळी दिला होता. आदित्य ठाकरे यांनी राहुल गांधी यांच्या प्रयोगाचीच नक्कल केल्यानंतर फडणवीस यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया बोलकी आहे. महाराष्ट्रात दुसरा पप्पू तयार होऊ नये, असा टोला त्यांनी हाणला होता. सरकार आणि स्वायत्त संस्थांच्या विरोधातील आरोपांची शहानिशा करण्याची एक विहित कार्यपद्धती असते. संविधानाने त्या कार्यपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संविधानाची हमी देत या कार्यपद्धतीस नाकारून कोणी नेता बेछूट वक्तव्ये करत असेल, तर त्यातील गांभीर्य नाहीसे होईल, म्हणून, केवळ सुताचा एक धागा पकडून स्वर्ग गाठण्याचा प्रयत्न म्हणजे राजकारणातील करमणुकीचा प्रयोग ठरतो. तसे होऊ नये यासाठी नेत्यांनी काळजी घ्यायला हवी.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### अनुभूती व अनुभव देणारी गिरनार यात्रा

या वर्षीची गिरनार परिक्रमा १ नोहेंबर ते ५ नोहेंबर कार्तिक एकादशी ते कार्तिक पौर्णिमापर्यंत होणार आहे. या परिक्रमेची आख्यायिका अशी आहे. गिरनार हा हिमालय पुत्र व माता पार्वतीचा भाऊ. माता पार्वती आणि शिव यांचा विवाह सोहळा २०००० वर्षांपूर्वी हिमालयात झाला. बहिणीच्या लग्नासाठी गिरनार समुद्रातून बाहेर पडला आणि जमिनीवर स्थिर झाला समुद्रापासून अवघ्या ५० किमी. वर, हिमालयात जाऊ शकला नाही. पुढच्या त्रिपुरारी पौर्णिमेला माता पार्वती भगवान शिवासह गिरनारला मुक्कामी आल्या. शिव पार्वती विवाहात सर्व देव, ऋषी, तीर्थ, नवग्रह अष्ट सिद्धी, नावनिधी, ५२ वीर, ६४ मातृका, ११ जलदेवता, नव नाग, अष्ट वसू, कुबेर भंडारी आले होते. त्यांच्यासह शिव पार्वती ४ दिवस गिरनारवर होते. त्या काळात सर्व देवतांनी गिरनारच्या जंगलात मुक्काम केला होता. आजही कार्तिक एकादशी ते कार्तिक पौर्णिमा या दिवसात सर्व देवता गिरनारच्या परिक्रमा मार्गात मुक्कामी असतात. परिक्रमेत पाच रात्री मुक्काम करावा. कमीतकमी एक रात्र तरी मुक्काम करावा म्हणजे या देवतांचे सान्निध्य व आशीर्वाद मिळतात. याकरिता ही परिक्रमा केली जाते. शास्त्रानुसार एकूण ३ गिरनार परिक्रमा केल्या की एका कैलास यात्रेचे पुण्य मिळते. गिरनार पर्वत उजव्या हाताला ठेवून त्याला प्रदक्षिणा घालणे यालाच परिक्रमा करणे असे म्हणतात. गिरनारच्या भोवती पूर्ण जंगल आहे. जे सध्या वनविभागाच्या अखत्यारीत आहे. वर्षभर आपल्याला या जंगलात प्रवेश मिळत नाही. फक्त या परिक्रमेच्या कालावधीत ५ दिवस सर्वांसाठी प्रवेश मिळतो. या जंगलात मुंगी, विंचूपासून ते सिंहापर्यंत भरपूर प्राणी आहेत. पण या ५ दिवसांत हे प्राणी आपल्याला काहीही त्रास देत नाहीत. ही दत्तगुरूंचीच कृपा आहे. देव आणि त्यांचे गण हे सुद्धा या कालावधीत परिक्रमेसाठी येतात आणि परिक्रमा करतात अशी आख्यायिका आहे. ही परिक्रमा करण्याने आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या अनेक पापांची मुक्ती मिळते. त्यामुळे प्रचंड संख्येने भक्त मंडळी ही परिक्रमा करतात. आपल्यासारख्या सामान्य माणसांपासून ते साधू, संत आणि देव सुद्धा ही परिक्रमा करतात. त्यामुळे परिक्रमा करताना या सत्पुरुषांचे दर्शन, आशीर्वाद मिळाल्यास सोने पे सुहागा असतो. गिरनार परिक्रमेचा मार्ग हा पूर्णपणे जंगलातून जातो. तीन डोंगर चढणे आणि उतरणे त्यात तीव्र चढ आणि अतीतीव्र उतार असे स्वरूप आहे.

परिक्रमेला सुरुवात झाल्यावर १२ किलोमीटरवर जिनाबाबा की मढी हे स्थान येते. मागील शतकात गिरनार येथे जिनाबाबा नावाचे अवलिया होऊन गेले. त्यांची एक चिलीम अद्याप येथे आहे. त्या चिलमीतून ते आत-बाहेर करत होते असे म्हणतात. यांची समाधी व धुनी येथे आहे. येथे परिक्रमावासींसाठी गरम भोजन या संस्थानतर्फे उपलब्ध असते. थोडे पुढे सरनो नावाची छोटी नदी लागते. त्यात बरेच जण स्नान करतात. तेथून पुढे ८ किलोमीटरवर मालवेला हे स्थान आहे. मालवेला येथे आंब्याची अनेक झाडे आहेत. तेथून पुढे ८ किलोमीटरवर बोरदेवीचे स्थान आहे. विग्रह आणि मंदिर दोन्ही नितांत सुंदर आहेत. परिक्रमेतील शेवटचा टप्पा हा बोरदेवी ते तलेटी हा मार्ग परिक्रमावासींसाठी अतिशय सरळ आहे.त लेटी म्हणजे गिरनार पर्वताच्या पहिल्या पायरीजवळ आल्यावर ही परिक्रमा पूर्ण होते.

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

●● ●●

### जीवनाची समृद्धता : कार्तिक एकादशी

शेकडो वर्षे पंढरपूरच्या विठुमाउलीच्या महाद्वारामध्ये लाखो भक्त अलौकिक सुखाचा अनुभव घेत आले आहेत. महाराष्ट्राच्या मातीमध्ये जन्माला आलेल्या संतांच्या विभूतीने भागवतधर्माचा जो काही आनंदकल्लोळ केला त्यातून समाधानाच्या आनंदाचे निदान सापडले. आणि ते आजही तसेच टिकून आहे. ज्या जागेपणी हा सुखाचा सोहळा अनुभवायचा असतो, तीच आजची प्रबोधन एकादशी आहे. आषाढातल्या देवशयनी एकादशीला देव झोपतात आणि कार्तिकातल्या प्रबोधिनी एकादशीला ते जागे होतात, अशी विठलभक्तांची श्रद्धा आहे. परंतु ज्या काळात देव झोपतात, त्याच काळात भक्तांनी जागे राहायचे असते. कदाचित म्हणूनच आषाढी ते कार्तिकीच्या चातुर्मासामध्ये अनेक विठ्ठलभक्तांचा पंढरीमध्ये निवास असतो. महाराष्ट्रातल्या अनेक गावागावांमध्ये आश्विन ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत काकडा आरतीचा परिपाठ पाहायला मिळतो. देवाचे झोपणे किंवा जागे होणे हा भक्तांच्या परमेश्वरावरील प्रेमाचा उत्तुंग असा कल्पना विलास म्हणावा लागेल. कारण कार्तिकी एकादशीला प्रबोधिनी हा शब्द वापरून भक्तांनी स्वतमच्याच प्रबोधनाचा वसा मात्र कायम ठेवलेला दिसून येतो. आषाढीची महिनाभराची वारी त्यानंतर आपापल्या घरी आलेले वारकरी प्रपंचामध्ये रममाण होत असले तरी विठ्ठलाच्या साक्षीने जागवलेला हा परमार्थ तसाच पुढे चालू ठेवायचा आहे. ही जाणीव त्यांच्या मनामध्ये असते. त्याचे आपल्याला विस्मरण होऊ नये या एकाच श्रद्धेपोटी हा भगवद्‌भक्त पुन्हा पुन्हा त्या पंढरीच्या महाद्वारावर जाऊन आपल्या भगवद्‌भक्तीच्या अधिष्ठानाचे आवर्तन करीत असतो. कोणी काहीही म्हणो. परंतु महाराष्ट्राला मिळालेली ही भागवत धर्माची देणगी विलक्षण आहे. ज्ञानेश्वर माउली, जगद्‌गुरू तुकाराम महाराज, नामदेव महाराज, जनाबाई, मुक्ताबाई अशी ही संत विभूतींची मांदियाळी म्हणजे भगवंताने



महाराष्ट्राला प्रेमाने भक्तीचा अलंकारच दान दिल्यासारखे म्हणता येईल. आजच्या प्रबोधिनी किंवा कार्तिकी एकादशीचासुद्धा याच दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. महाराष्ट्रातल्या संतांनी आपल्या या अनुभवातूनच समाजाला समृद्ध करणारे अभंग लिहिले.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

●● ●●

### अमेरिकेचे आकर्षण कमी करावे

पूर्वीपासूनच आम्हा भारतीयांना अमेरिकेचे जबरदस्त आकर्षण आहे. अमेरिका शस्त्र-शक्ती-धन-तंत्रज्ञानसंपन्न राष्ट्र आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात, संशोधनाच्या क्षेत्रातही तो देश आघाडीवर आहे. लहान देशांना एकमेकाशी भांडण्यात गुंतवून स्वत:चा प्रभाव वाढवण्याचा विचित्र डाव अमेरिका सातत्याने खेळत आहे. जगावर सत्ता गाजवण्याची, बलशाली असल्याने, अमेरिकाला अनुकूल परिस्थिती मिळत राहिली. त्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा अमेरिकेने घेतला आहे. संयुक्त राष्ट्रसंघातही त्याच देशाचे वर्चस्व आहे. सगळे जागतिक प्रश्न संयुक्त राष्ट्र संघाच्या मार्फतच सोडविले जातात आणि त्यात अमेरिकेच्या मताला जास्त महत्त्व असते. कमी लोकसंख्या असल्याने तो देश धनाढ्य आहे. त्यामुळे तो भौतिकवादी देश आहे. तिथे पैशाला खूप जास्त मान आहे, माणसाला नाही. भावनिक नाते त्या वातावरणात टिकून राहूच शकत नाही. भारत आर्थिकदृष्ट्या गरीब होता पण आता भारताने नवीन आर्थिक धोरण राबवून देशाला आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत आणले आहे. देशाचे सैन्यबळ वाढले आहे. नवीन-नवीन संकल्पना राबवून देश प्रगत राष्ट्र होण्याच्या मार्गावर आहे. भारताची परराष्ट्रधोरणे मैत्री वाढवणारी असल्याने अनेक देशांशी भारताचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले आहेत.

भारताने कोरोना काळात जगाला केलेली औषधांची मदत वाखाणली गेली. भारताची ही सगळी आगेकूच, ही दमदार कामगिरी अमेरिकेच्या सत्ताधाऱ्यांना सहन होत नाहीये. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारताच्या दौऱ्यावर येऊन गेले आहेत. पंतप्रधान मोदींनी त्यांचे हार्दिक स्वागत केलेले आहे. दोघांनी मैत्रीसंबंध जाहीर केले आहेत, असे असूनही अमेरिकेने विदेशी विद्यार्थ्यांना-भारतीय विद्यार्थ्यांना त्या देशात राहण्याची परवानगी नाकारली, त्यांना भारतात परत पाठविले तेही अत्यंत अपमानास्पद पद्धतीने. देशावर आर्थिक दबाव आणण्यासाठी अनावश्यक आयातकर जाहीर केले, भारताने रशियाकडून तेल घेऊ नये यासाठी जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. ऑपरेशन सिंदूर हे अभियान अमेरिकेच्या मध्यस्थीमुळेच थांबवावे लागले असे जाणकारांचे मत आहे. आता अमेरिका पाकिस्तानला शस्त्रपुरवठा करतो आहे हे वाचण्यात आले.

अमेरिकेच्या अशा वागण्याचा तरुणांनी विचार करावा. जो देश आपल्याला चुकीची वागणूक देतो, आपल्या शत्रूला मदत करतो, आपल्या प्रगतीत अडसर निर्माण करतो त्या देशात जाणे म्हणजे आपला देशाभिमान, स्वाभिमान विसरण्यासारखे आहे. आपल्या घरात जसे आपण राजे असतो, तसे आपल्या देशात आपण स्वतंत्र, सुरक्षित व निर्भय असतो. म्हणून तरुणांनी अमेरिकेचे आकर्षण कमी करावे. आपला देश जास्त चांगला आहे हे नीट लक्षात घ्यावे.

**आशा पांडे**/नागपूर

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# सत्याचा नव्हे, सत्तेचा मोर्चा!

सत्ता गेल्यानं विरोधक चवताळलेले दिसत आहेत. विरोधकांना असं वाटत होतं, नव्हे आजही वाटतं की सत्ता ही त्यांची मक्तेदारी आहे. एक चहावाला येऊन पंतप्रधान कसा होऊ शकतो... हे अजूनही त्यांच्या पचनी पडलेलं नाही. हा यांचा जो अहंकार आहे, त्याला जनतेने धक्का दिला. मग त्याचा राग आता विरोधक अशा मार्गाने काढताना दिसत आहेत. आपल्याला हवी तशी सत्ता मिळत असेल तरच निवडणुका होऊ द्यायच्या नाही तर निवडणुका नकोत, असा अत्यंत धक्कादायक आणि देशविघातक पवित्रा विरोधकांनी घेतलेला दिसत आहे. त्यांच्या या उपद्व्यापाचाच एक भाग म्हणजे सत्तेसाठी काढलेला हा असत्यांचा मोर्चा होय..!

संवैधानिक संस्थांवर हल्ले करणे, त्यांच्या विश्वासार्हतेला धक्का लावणे आणि निवडणुका होऊ देणार नाही असा इशारा देण्याचे प्रकार विरोधकांनी चालविले आहेत. निवडणुका हा संसदीय लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. जेव्हा २०२४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये यांना यश मिळालं, तेव्हा हीच मतदारयादी होती. तेव्हा कधी यांनी तक्रार केली नाही. विधानसभा निवडणुकीतही हीच मतदारयादी होती. निवडणूक लढून निर्णय लागेपर्यंत यावर कधीही आक्षेप घेतला नाही. मात्र, आता या लोकांनी फार मोठे गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. यांचा प्रश्न हा मतदारयादीतल्या तथाकथित घोळापुरता मर्यादित नाही. यांचं कसं झालं आहे, आमच्या मनाप्रमाणे झालं तर ठीक, नाहीतर निवडणूकच होऊ देणार नाही. राज ठाकरेंनी सार्वजनिक सभेतून तसे जाहीरच केले ना... ''निवडणुका कशा होतात ते मी बघतो'' म्हणून. महत्त्वाचं म्हणजे निवडणुका होऊ देणार नाही ही भाषा नक्षल्यांची आहे. आणि तीच भाषा आता हे लोक वापरत आहेत. हे आता अर्बन नक्षल्यांची भाषा वापरू लागल्याचे दिसते, असे म्हणायला वाव आहे. संविधान मान्य नाही, ते नष्ट करायचे. वैधानिक संस्था नष्ट करायच्या, संसदीय लोकशाहीचा आधार असलेल्या निवडणुकाच होऊ द्यायच्या नाहीत. हे प्रकार यापूर्वी नक्षलवादी नेहमी फलक, पत्रकं टाकून निवडणुकीवर बहिष्कार टाकून करायचे. कारण त्यांना संविधान मान्य नाही, लोकशाही मान्य नाही. त्यासाठी ते अशा पद्धतीने निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचं आवाहन करायचे. बसं... सारखा प्रकार करताना हे लोक दिसत आहेत. नक्षलवादी किमान लपून छपून निवडणुकीवर बहिष्काराची भाषा बोलायचे, हे लोक तर उघडपणे आता त्यांचीच भाषा करू लागले आहेत. एकीकडे नक्षलवादी शरण येत आहेत आणि अर्बन नक्षल उचल खात आहेत की काय असेच वाटू लागले आहे.

बरं हे निवडणुका घेऊ नका हे कोणत्या परिस्थितीत म्हणत आहेत. तर, सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत निवडणुका आटोपण्याचे निर्देश दिलेले असताना. याचा सरळ अर्थ विरोधक सर्वोच्च न्यायालयाला देखील मानत नाहीत, निवडणूक अयोगालाही मानत नाहीत, संसद, विधिमंडळालाही मानत नाहीत, कायदा व सुव्यवस्थेसाठी उभारण्यात आलेल्या यंत्रणेलाही मानत नाहीत. विनापरवानगी मोर्चा काढला... मुळात यांच्या या एकूण वर्तनातून हे देशाचे संविधान आणि संसदीय लोकशाहीच उद्ध्वस्त करायला निघाल्याचे दिसते.

भारतीय लोकशाहीत विरोधी पक्ष असला पाहिजे, विरोधी पक्षाचा नेता असला पाहिजे. त्यांनी जनतेचे प्रश्न मांडले पाहिजेत, बाजू मांडली पाहिजे, सरकारच्या चुका दाखविल्या पाहिजेत. हे सगळं अपेक्षितच आहे. पण थेट मुळावरच घाव घालण्याचा प्रकार यांनी चालवला आहे. याला तर बेजबाबदारपणाचा कळसच म्हणावा लागेल.

मुळात हे सगळे लोक घराण्यातून पुढे आले आहेत. उद्धव ठाकरे आज एका पक्षाचे नेते का आहेत? कारण ते बाळासाहेब ठाकरेंचे चिरंजीव आहेत. राज ठाकरेंनी जरी मनसे हा पक्ष स्वबळावर स्थापन केला असला तरी, त्यांना एखादा पक्ष स्थापन करण्याइतकं बळ कुठून मिळालं? कारण ते बाळासाहेब ठाकरेंचे पुतणे आहेत. शरद पवार घराणेशाहीच चालवत आहेत. सुप्रिया सुळे, रोहित पवार, अजित पवार हे त्यांच्या घराणेशाहीची मूर्तिमंत उदाहरणं आहेत. काँग्रेस तर घराणेशाहीचा कळस आहे, हे वेगळ्यानं सांगण्याची गरज नाही. या लोकांना सगळं आयतं मिळालं असल्यामुळं संघर्ष माहिती नाही. जनता, जनतेचे प्रश्न, प्रत्यक्ष जमिनीवरील समस्या, लोकशाहीच्या तत्त्वांशी विसंगत वाटणे, अधिकारांचे उल्लंघन होणे, किंवा एखाद्या विशिष्ट धोरणाचे अपेक्षित परिणाम साध्य होत नसल्यास त्याचा वैधानिक पद्धतीने विरोध करण्याऐवजी हे लोक थेट व्यवस्थाच उद्ध्वस्त करायला निघाले आहेत. त्यामुळे हा विषय केवळ भारतीय जनता पक्षापुरता मर्यादित नाही, आपल्या भवितव्याचा प्रश्न आहे. संवैधानिक व्यवस्था उरली नाही, लोकशाही टिकली नाही, निवडणुका झाल्या नाही तर, आपलं, आपल्या देशाचं काय होईल? असा व्यापक गंभीर प्रश्न विरोधकांच्या या भूमिकेच्या निमित्तानं निर्माण झाला आहे.

सार्वजनिकपणे प्रात्यक्षिक दाखवून बनावट आधार कार्ड बनवायचं. आणि गुन्हा दाखल झाल्यावर त्याचं समर्थनदेखील करायचं. उद्या नोटा कशा छापायच्या याचंही प्रात्यक्षिक दाखवायला हे लोक मागेपुढे पाहणार नाहीत. वरून त्याचं समर्थनदेखील करतील. या भूमिकेला गुन्हेगारी नाही तर काय म्हणायचं. राहुल गांधींनी हायड्रोजन बॉम्ब फोडला... तेव्हा निवडणूक आयोगानं त्यांना केवळ तुमचे हे सर्व आरोप प्रतिज्ञापत्रावर सादर करा असं सांगितलं. पण आजवर राहुल गांधींनी ते दिलं नाही. मात्र, सत्याचा मोर्चा काढणाऱ्यांना आजवर शपथेवर सत्य बोलता आले नाही. कारण प्रतिज्ञापत्रावर तुम्ही खोटं बोलला, चुकीची माहिती दिली तर, शिक्षा होते. बाकी काही कळत नसलं तरी एवढं कदाचित राहुल गांधींना कळत असावं किंवा त्यांना त्यांच्या सल्लागारांनी समजावून सांगितलं असावं. बरं राहुल गांधी असोत किंवा मग हे दोन नौटंकी भाऊ असोत... यापैकी कोणीही वैधानिक, न्यायिक मार्ग स्वीकारताना दिसत नाही. बिहारमधील 'एसआयआर' विरोधात न्यायालयात गेल्यावर तोंडावर आपटणारे, हे विरोधक आता कोणीही न्यायालयात दाद माण्याच्या तयारीत नाहीत. कारण त्यांनी केलेल्या आरोपातले सत्य त्यांच्या मनाला माहिती आहे. त्यामुळे संविधानाने उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही मार्गाचा अवलंब न करता, जनतेच्या मनात विष पेरून, संवैधानिक संस्था उद्ध्वस्त करण्याचा यांचा डाव आता उघड झाला आहे.

त्यामुळे हा विषय केवळ आता भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस असा सत्ताधाऱ्यांच्या विरोधापुरता किंवा यांनीच विचार करण्यापुरता राहिलेला नाही. यावर आता तुम्ही आम्ही अर्थात सर्वसामान्य जनतेला, सामान्य मतदारांना विचार करायला भाग पाडणारा हा गंभीर विषय आहे. हे असं चालू द्यायचं का? यावर निर्णय आता जनतेला घ्यावा लागणार आहे. सत्ता मिळविण्यासाठी संपूर्ण देशाची व्यवस्था उद्ध्वस्त करणाऱ्या यांच्या षडयंत्राला जनता आता बळी पडणार नाही, एवढं मात्र निश्चित आहे.

९२७०३३३८८६

### समाजरक्षकच गुन्हेगार झाले तर?

पोलिसांचे मुख्य कर्तव्य म्हणजे नागरिकांचे रक्षण, कायद्याचे पालन आणि समाजात शांतता व सुरक्षितता निर्माण करणे. मात्र, आज अशा घटना वारंवार घडताना दिसतात, ज्यात पोलिसच गुन्हेगार असल्याचे समोर येते. नुकताच मद्रास उच्च न्यायालयाने अशाच एका प्रकरणात पोलिसांचा खोटारडेपणा उघड करून त्यांना दिलेली शिक्षा हे त्याचेच ठळक उदाहरण आहे. प्रकरण असे की, चेन्नईतील तीन पोलिस अधिकाऱ्यांनी अमली पदार्थविरोधी प्रकरणात एका निरपराध नागरिकाविरुद्ध खोटे पुरावे निर्माण करून खोटी साक्ष दिल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी उच्च न्यायालयाने या तिन्ही पोलिस अधिकाऱ्यांना १० लाख रुपयांचा दंड ठोठावला. एका निरपराध व्यक्तीला अडकवण्यासाठी पोलिसांनी जर असा कट रचला असेल, तर हे अत्यंत धक्कादायक आहे. उच्च न्यायालयाने आपल्या निरीक्षणात नमूद केले की, या पोलिसांनी कायद्याची चौकट वाकवून न्यायव्यवस्थेचा गैरवापर केला. सर्वसामान्य नागरिकांचा पोलिसांवर विश्वास असतो, कारण त्यांना वाटते की पोलिस त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना न्याय देतील. परंतु, चेन्नईतील या निकालाने हा विश्वास डळमळीत झाला असून नागरिकांचा भ्रमही दूर झाला आहे. अलिकडच्या काळात अशा अनेक घटना घडल्या आहेत. पूर्वी चोरी, धमकी, हत्या, बलात्कार असे गुन्हे केवळ गुंड करत असत; पण आता हीच कृत्ये काही पोलिसांकडून उघडपणे होताना दिसतात. फलटण येथे नुकत्याच घडलेल्या महिला डॉक्टरच्या आत्महत्येच्या प्रकरणातही पोलिसांची गलिच्छ मानसिकता समाजासमोर आली आहे. पोलिस दल हे समाजाची संरक्षक भिंत आहे. परंतु या भिंतीला जर तडे गेले, तर समाज नष्ट व्हायला वेळ लागणार नाही. हे गांभीर्याने लक्षात घेऊन गुन्हेगार पोलिसांविरोधात सरकारने कठोर आणि निष्पक्ष भूमिका घेणे अत्यावश्यक आहे. पोलिसांची निवड करताना केवळ उंची, ५६ इंच छाती आणि वजन हेच निकष न ठेवता सद्सदविवेकबुद्धी, नीतिमत्ता आणि समाजहित या निकषांना प्राधान्य द्यायला हवे. कारण, जेव्हा रक्षकच भक्षक बनतात, तेव्हा न्याय आणि सुरक्षिततेचा पाया डळमळतो.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## आजचे संघगीत-३०

रविवार, २ नोव्हेंबर २०२५

### वैरभावनाविरहित अमुचा भारत देश असावा

वैरभावनाविरहित अमुचा भारत देश असावा
ऐक्याचा नित सर्वत्रांनी जयजयकार करावा ॥धृ.॥

वेगळेच जरि वंशपंथ तरि असे एक आदेश
नकोत अमुच्या झेंड्याखाली भिन्न भिन्न गणवेश
कोनाकोनामधुनी यावे सुपुत्र झेंड्याखाली
महान त्यागानेच करू या भरतखंड बलशाली ॥१॥

सहिष्णुता अंगात बाणवा निंदु नका परक्यास
सहकाऱ्यांवर जीवेभावे राखा दृढ विश्वास
परस्परांतिल सर्व भेद हे विसरू या मोदाने
जाते घडि ही अपुली राखा अभंग एकोप्याने ॥२॥

कलह मिटावे परस्परांतिल ऐक्यबीज रुजवावे
ऐक्याच्या वट वृक्षावरती संघपुष्प विलसावे
स्वदेशसेवेवाचुनि दुसरा हृदयी भाव नसावा
शाखाशाखांमधुनी असला नित संस्कार घडावा ॥३॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून जनजागृतीपर रॅली

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

दक्षता जनजागृती सप्ताह २०२५ च्या अनुषंगाने सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्यावतीने सोलापूर शहरामध्ये शनिवारी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या रॅलीचे उद्घाटन पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी हिरवा झेंडा दाखवुन केले. या रॅलीमध्ये उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, उपअधिक्षक प्रशांत चौगुले व २ पोलीस अधिकारी, १३ पोलीस अंमलदार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय येथील ७ पोलीस अधिकारी, १० पोलीस अंमलदार, ५० आरसीपी पोलीस अंमलदार, भरतीपूर्व प्रशिक्षण, सोलापूर येथील ५० विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता. सदर रॅली पोलीस सोलापूर शहर आयुक्त कार्यालय येथुन गांधी चौक, सात रस्ता चौक, रंगभवन चौक मार्गे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.



## चंदेले महाविद्यालयात इंदिरा गांधी, वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

चंदेले समाजकार्य महाविद्यालयात भारताच्या पहिला महिला पंतप्रधान स्वर्गीय इंदिराजी गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी थोर स्वातंत्र्य सेनानी भाई छंनुसिंह चंदेले, इंदिरा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला विद्यालय महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री राहुलजी चंदेले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र. प्राचार्य गायकवाड एस बी, ग्रंथपाल संतोष भागवत, प्रताप चंदेले राणी भुजंगे महादेव गावडे रामेश्वर गवळी ज्योतिबा राऊत सचिन कांबळे संजय कांबळे शैलेश रजपूत आधी उपस्थित होते.



## 'उमेद'चे ७०० पूरग्रस्त विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

अतिवृष्टीमुळे सिना नदीला आलेल्या पुरामध्ये शालेय विद्यार्थी यांचे शालेय साहित्य वाहून गेले होते. सदर विद्यार्थ्यांना परिपूर्ण शालेय साहित्य देवुन उमेदने केलेले सामाजिक काम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप यांनी केले. उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत स्वयंसहायता समूह मधील सदस्य, अभियानातील कर्मचारी यांनी स्वखुशीने निधी जमा करून करमाळा तालुक्यातील ७ गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी यांना ७०० शालेय कीटचे वाटप केले. यावेळी गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, तालुका अभियान व्यवस्थापक अवधूत देशमुख, सुषमा बिचुकले, गणेश पाटील, आण्णा आवताडे, उमेश डांगे, तालुका व्यवस्थापक योगेश जगताप, दिगंबर साळुंखे, चंद्रकांत माने उपस्थित होते. उमेद अभियानाच्या वतीने जवळपास चार लाख ५० रुपये किंमतीचे शालेय साहित्य ७०० विद्यार्थी यांना वाटप करून सामजिक कार्यात सहभागी झाल्याचा आनंद व्यक्त केला.



## राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त बीएसएनएल येथे शपथ कार्यक्रम

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

भारत सरकारचे गृहमंत्री व सहकार मंत्री आदरणीय श्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण देशभर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. सरदार पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त देशभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यांच्या एकजुट भारताच्या कार्याची प्रेरणा आजही देशवासीयांना एकात्मतेचा संदेश देते. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा टेलिफोन भवन, बीएसएनएल कार्यालयात राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाप्रबंधक श्रीकांत मुब्रूखाणे यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गास राष्ट्रीय एकता शपथ देण्यात आली. याप्रसंगी उपमहाप्रबंधक विठ्ठल कुलकर्णी, श्रीधर अतनूर, संतोष जेटगी, बिराजदार, कोलारकर, त्रिंबके, रवी लिंगनूर, प्रवीण कवडे, राजेश तेलगावकर, अमित पोटफोडे, कुमार आळगीकर, ए. शेख, व्ही. माने, प्रवीण कवडे, प्रशांत कवडे, अंकोलीकर तसेच कार्यालय अधीक्षक सुजित हावळे उपस्थित होते.

# 'रेशीमगाठी' पुन्हा जुळताहेत, संसार फुलताहेत

### वादानंतर विस्कटलेल्या नात्यांची पुनर्बांधणी करताना जोडपी करताहेत नव्या नियमांची आखणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

एकमेकांशिवाय राहवत नाही; पण एकत्र राहणंही अवघड या भावनेतून अनेक जोडपी आज नव्या अटी-शर्तीवर आपला संसार पुन्हा फुलविताना दिसत आहेत. वैचारिक मतभेद, वेगवेगळ्या जीवनशैली, व्यसनाधीनता, एकत्र कुटुंबातील तणाव किंवा परस्परांवरील संशय अशा अनेक कारणांवरून दाम्पत्यांत वाद होतात. त्यामुळे पत्नी माहेरी निघून जाते किंवा पती तिला घराबाहेर काढतो. अशा परिस्थितीत वाद किंवा राग शांत झाल्यानंतर पत्नी नांदायला येत नसेल किंवा पती नांदायला घेऊन जात नसेल तर साथीदार न्यायालयाचा दरवाजा ठोठावतो. त्यानंतर, पुन्हा एकत्र येताना मात्र जोडपी विविध अटी अनब शर्तीचा आधार घेत असल्याचे चित्र कौटुंबिक न्यायालयात दिसून येत आहे.

भांडण झाल्यानंतर माहेरी गेलेली पत्नी किंवा पत्नीला नांदविण्यास तयार नसलेला पती अशा दोन्ही परिस्थितीत साथीदार न्यायालयाचा दरवाजा ठोठावतात. हिंदू विवाह कायद्यातील कलम ९ नुसार अशा जोडप्यांना पुन्हा एकत्र येण्याची कायदेशीर संधी मिळते. पती अथवा पत्नीने न्यायालयात अर्ज केल्यानंतर त्या दोघांचे



समुपदेशकामार्फत समुपदेशन केले जाते. या वेळी, त्यांच्याकडून एकमेकांसमोर अटी-शर्ती ठेवल्या जातात. त्या मंजूर झाल्यानंतर न्यायालय त्या जोडप्यांच्या एकत्रित येण्याच्या आदेशात या अटी-शर्तीचा उल्लेख करते. तसेच न्यायालयास योग्य वाटतील, अशा बाबींचा देखील त्यात उल्लेख असतो. दाम्पत्यांना अटी-शर्ती मंजूर झाल्यानंतर त्यावर न्यायालयाचा शिक्कामोर्तब होतो अन् पुन्हा नव्याने संसाराला सुरुवात होते. प्रत्येक प्रकरणातील अटी व परिस्थिती वेगवेगळ्या असतात. जोडप्यातील मतभेदांचे स्वरूप काय आहे, हे समजून घेत समुपदेशनानंतर न्यायालय त्यावर निर्णय देते. एखाद्या जोडीदाराने धर्मांतर करणे, मानसिक आजाराने ग्रस्त असणे किंवा कोणत्याही वैध कारणाविना संसार त्यागणे अशा परिस्थितींमध्ये अर्ज नामंजूर होण्याची शक्यता अधिक असल्याचे वकिलांनी सांगितले.

बहुतांश प्रकरणात अटी-शर्ती म्हणजे नाते तुटण्याचे कारण मानले जाते. परंतु, आजची जोडपी त्यांच्याच माध्यमातून नातं जपण्याचा प्रयत्न करत आहेत. तडजोड नव्हे, तर नव्या नियमांच्या चौकटीतून पुन्हा एकदा संसार उजळिवण्याचा हा प्रयत्न आधुनिक काळातील नवा विवाहसंस्कार ठरत आहे.

*** दोघांकडून ठरविल्या जाणाऱ्या प्रमुख अटी -**

- काही विशिष्ट व्यक्तींशी संबंध ठेवायचे नाहीत.
- समाजमाध्यमांत वावर मर्यादित ठेवायचा.

*** पतीकडून ठेवण्यात येणाऱ्या प्रमुख अटी...**

- वाद घालायचा नाही.
- सासू-सासऱ्यांची काळजी घ्यायची.
- कुटुंबाच्या हितासाठी सल्ला ऐकायचा.
- सासरकडील मंडळींचा संसारातील प्रत्येक गोष्टींमध्ये हस्तक्षेप नको.

*** पत्नीकडून ठेवण्यात येणाऱ्या प्रमुख अटी...**

- पतीने व्यसन करायचे नाही.
- शारीरिक, मानसिक छळ करायचा नाही.
- सासू-सासऱ्यांसोबत राहायचे नाही.
- माहेरच्या लोकांना आदराने वागवायचे.



## माथाडी कामगार, चालकांसाठी आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

सोलापूर मालधक्का येथे माथाडी कामगार आणि चालकांसाठी दोन दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कर्मचारी कल्याण आणि सामुदायिक आरोग्यासाठी एक सक्रिय पाऊल म्हणून मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २९ आणि ३० ऑक्टोबर २०२५ रोजी सोलापूर मालधक्का परिसरात, रामवाडी येथे माथाडी कामगार आणि ट्रक/टेम्पो चालकांसाठी दोन दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

या शिबिरादरम्यान एकूण ९४ एक्स-रे, ८१ रक्त चाचण्या, ५७ सायनस टीबी चाचण्या आणि १८ थुंकीच्या चाचण्या घेण्यात आल्या. सोलापूर महानगरपालिकेच्या क्षयरोग विभागातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आणि त्यांच्या समर्पित टीमने आरोग्य तपासणी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. हा उपक्रम सोलापूर महानगरपालिका रुग्णालयाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता आणि सोलापूरच्या मुख्य वस्तू पर्यवेक्षक आणि त्यांच्या टीमकडून मौल्यवान सहकार्य मिळाले, ज्यामुळे सुरळीत समन्वय आणि सहभाग सुनिश्चित झाला. पंतप्रधानांच्या 'क्षयरोग मुक्त भारत अभियान' (क्षयरोगमुक्त भारत मोहीम) अंतर्गत वस्तू हाताळणीच्या कामात गुंतलेल्या कामगारांमध्ये क्षयरोग आणि इतर आरोग्य समस्यांचे लवकर निदान आणि प्रतिबंध करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे आरोग्य शिबिर सोलापूर विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी आणि सार्वजनिक आरोग्यासाठीच्या सततच्या वचनबद्धतेवर प्रकाश टाकते.

## विकास सहकारी बँकेतर्फे श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांचे वाग्यज्ञ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

येथील विकास सहकारी बँकेतर्फे बुधवार ५ नोव्हेंबर ते शुक्रवार ७ नोव्हेंबर दरम्यान श्रीगुरु चैतन्यमहाराज देगलूरकर ह्यांच्या वाग्यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे.

बुधवार ५ नोव्हेंबर ते शुक्रवार ७ नोव्हेंबर दरम्यान रोज सायंकाळी साडे सहा ते साडे आठ ह्यावेळेत हेरिटेज लॉन्स, गांधीनगर येथे प्रवचने संपन्न होतील. २००९ पासून प्रतिवर्षी चैतन्य महाराजांची ज्ञानेश्वरीतील विविध विषयांवर सोलापूरात प्रवचने होत असून ह्यावर्षी म्हणोनि जेथ श्री श्रीमंतु अर्थात (कर्तृत्व आणि कृपा) ह्या अठराव्या अध्यायातील ओवीवर महाराज सलग तीन दिवस विवेचन करतील.



गेल्या दोनशे वर्षांपासून ज्ञानेश्वरी सेवा आणि चातुर्मासात पंढरीत वास्तव्य ही देगलूरकर घराण्याची परंपरा आहे, त्यांचे निष्ठापूर्वक जतन आणि संवर्धन करण्याचे काम चैतन्यमहाराज करीत आहेत. आजपर्यंत महाराजांनी ज्ञान,भक्ती, कर्म, मन,बुद्धी, अहंकार, दैवी संपत्ती,गुरू महिमा,पसायदान अशा वैविध्यपूर्ण विषयांवर मांडलेले अभ्यासपूर्ण चिंतन सोलापूरकरांच्या पसंतीस उतरले आहे.

मागील २२ वर्षापासून प्रतिवर्षी परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरीजी यांच्या त्रीदिवसीय वाग्यज्ञाचे आयोजन बँकेमार्फत केले जात असे. या वाग्यज्ञास सर्व बंधू भगिनींनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे चेअरमन कमलकिशोर राठी, ज्येष्ठ संचालक राजगोपाल मिणियार आणि सर्व संचालकांनी केले आहे.

## ११ डिसेंबर रोजी होणाऱ्या मोर्चात सहभागी व्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मु.पो.लवंगी येथे श्री गणेश सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते ही बैठक महादेव मंदिरात घेण्यात आली. यावेळी सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे तालुकाध्यक्ष गुरूशांत कुंभार उपस्थित होते या बैठकीचे अध्यक्ष सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक व मोहोळ तालुका अध्यक्ष भास्कर कुंभार हे होते तर प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे, सचिव धोंडिराम जेवूरकर, माळकवठे येथील भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष सिद्राम बगले यांची होती. सिद्राम बगले



यांनी प्रास्ताविक केले तर अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी मी येथे का आपणांस विनंती करण्यासाठी आलों आहे कारण ११ डिसेंबर २०२५ रोजी हिवाळी अधिवेशनात विधानभवनवर मोर्चा काढण्यात येणार आहे त्यासाठी आपण जास्तीत जास्त संख्येने मोर्चात सहभागी व्हावे महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालय कर्मचारी यांच्या किमान वेतन साठी मोर्चा काढण्यात येणार असून जास्तीत जास्त संख्येने मोर्चात सहभागी व्हावे . यावेळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी सविता बेडगे, हेमलता पाटील, शशिकला बिराजदार, आरती पाटील, गुरुशात कुंभार, संजीव माणकोजी, श्रीशैल कुरणे, रूद्राप्पा बाके, इंद्रजित माने, संतोष कुंभार, रेवणप्पा काळे, संजय बिराजदार उपस्थित होते. आभार काशिनाथ पाटील यांनी मानले.





# पालिकेच्या बस स्टॉपमध्ये पडलेले भगदाड बुजविले

### 'तरुणभारत'च्या वृत्ताची दखल; महापालिकेची कार्यवाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

शहराच्या मध्यवर्ती अशा गजबजलेल्या ठिकाणी असलेल्या सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाच्या लकी चौकातील बस स्टॉप मध्ये मोठे भगदाड पडल्याचे वृत्त प्रसिद्ध होताच महापालिकेने दखल घेतली. या बस स्टॉपमधील ते भगदाड बुजविण्यात आले आहे. महापालिकेने कार्यवाही केल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

सोलापूर शहरातील नवी पेठ लगत असलेल्या सुभाष चौक (लकी चौक) येथे सोलापूर महापालिका परिवहन उपक्रमाचे बस स्टॉप अनेक वर्षापासून आहे. वर्दळीच्या ठिकाणी असलेले हे बस स्टॉप प्रसिद्ध आहे. नेहमी या ठिकाणी मोठी गजबज असते. मात्र या बस स्टॉपच्या खालच्या बाजूला खंदक बागेकडे मोठे भगदाड पडले होते. यामुळे या बस स्टॉप मध्ये थांबणे धोकादायक झाले होते. गेल्या अनेक दिवसापासून याकडे महापालिका परिवहन उपक्रम प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तातडीने दखल घेतली.

महापालिका आयुक्तांच्या आदेशानंतर नियंत्रण अधिकारी तपन डंके यांनी याबाबत कार्यवाही केली. संबंधित विभागाकडून या बस स्टॉपमधील ते पडलेले भगदाड बुजविण्यात आले आहे. बस स्टॉप परिसरातील स्वच्छताही करण्यात आली. महापालिका प्रशासनाने कार्यवाही केल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

दरम्यान, विशेष म्हणजे या बस स्टॉपच्या समोरच दुचाकी आणि चार चाकी वाहने पार्किंग केली जातात. यामुळे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या बस स्टॉपची असून अडचण नसून खोळंबा अशी अवस्था झाली आहे. महापालिका परिवहन उपक्रम सुधारत असतानाच बस स्टॉपकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज वर्तवली जात आहे.

**सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.**
**शंकरनगर-अकलुज पो. यशवंतनगर (४१३११८) ता. माळशिरस जि. सोलापुर**
फोन नं.०२१८५ - २२२०४८,२२२२४८ फॅक्स नं.०२१८५ - २२२२४९
Email: smsmpssk@gmail.com Website: www.aklujsugar.com

**इथेनॉल वाहतूक टेंडर नोटीस**

आमचे कारखान्याकडील गळीत हंगाम २०२५-२०२६ मध्ये क्वार्टर-१ मध्ये उत्पादीत होणारे ५५.२० लाख लिटर इथेनॉल दि. ०१/११/२०२५ ते दि. २८/०२/२०२६ या कालावधीत कारखाना साईट ते खालील तपशिलाप्रमाणे ऑईल कंपनीचे डेपोंना टँकरव्दारे इथेनॉल वाहतूक करणाऱ्या अधिकृत वाहतूक कंत्राटदाराकडुन सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. नं. | वाहतूकीचे ठिकाण | एकेरी अंतर किमी |
|---|---|---|
| १ | बेंगलोर, कर्नाटक | ७३९.० |
| २ | लोणी, पुणे, महाराष्ट्र | १५२.७० |
| ३ | तिरूनावेल्ली, तामीळनाडू | १२६३.९० |

तरी वाहतूकीचे सिलबंद टेंडर मा. कार्यकारी संचालक यांचे नावे शनिवार दि. ७/११/२०२५ रोजी दु. २.०० वा. पर्यंत ई-मेल व्दारे किंवा समक्ष जमा करावेत. सिलबंद टेंडर पाकीटावर **'इथेनॉल वाहतूकीचे कोटेशन'** असा स्पष्ट उल्लेख करून, पाकीटावर संपुर्ण पत्त्यासह मोबाईल नंबर देणेत यावा. तसेच इथेनॉल वाहतूकदार यांनी त्यांचेकडे स्वमालकीचे विविध क्षमतेचे २० टँकर सुस्थितीत असलेचा कागदोपत्री पुरावा व इथेनॉल वाहतूकीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व शासकिय परवाने विधीग्राहय असल्याची पुर्तता करावी. टेंडर मंजुर झालेल्या वाहतूकदारांनी रू.१ लाख EMD आर.टी.जी.एस. ने जमा करावी.

वरीलप्रमाणे इथेनॉल वाहतूकीचे टेंडर स्विकारणे अथवा कोणतीही कारण न देता नाकारण्याचा हक्क कारखान्याने राखून ठेवलेला आहे.

**सही/- राजेंद्र केरबा चौगुले, कार्यकारी संचालक**
**सही/- शंकरराव रामचंद्रराव माने-देशमुख, व्हाईस चेअरमन**
**सही/- जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, चेअरमन**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः वैराग, ता. बार्शी जि, सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि वैराग व ता. बार्शी पैकी नगरपंचायत वैराग हद्दितील येथील गट नं. ११८/१ याचे क्षेत्र ०.०८.०० हे.आर.चौ.मी.(०.८ आर) आकार ० रू. १५ पैसे यापैकी क्षेत्र ०.००३.७० हे.आर. चौ.मी. याचा नगरपंचायत मिळकत नंबर २२२२/४ असून नगरपंचायत दप्तरी क्षेत्रफळ ३७५८ चौ.फूट आहे. सदर जागेचा प्लॉट नं.६ आहे. याचे मोजमाप दक्षिण-उत्तर रूंदी २३ मी. ४८ सेमी.(७७ फूट) व पूर्व-पश्चिम लांबी१५ मी. ०४ सेमी(४९ फूट) आहे. यासी चतुःसिमा पुर्वेस-प्लॉट नं. ५, दक्षिणेस-गुरव यांची जमीन व उत्तरेस-२४ फूट रूंद रस्ता, याची वागणूक व पाणी उत्तर बाजुने जाणेची वहिवाट आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक खुली प्लॉटजागा आतिल तदंगभूत वस्तूसह व वहिवाटीच्या हक्कासहीत. सदरची प्लॉट जागा वैराग नगरपंचातीच्या हद्दीतील असून रहिवाशी झोनमधील आहे.

उपरोक्त वर्णन केलेल्या खुली प्लॉट जागा ही श्री. धनाजी मोहन सुतार यांची स्वतंत्र मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे. विद्यमान मालकांनी सदरची प्लॉटजागा त्यांचे प्रांपचिक अडचणीसाठी व व्यवसायासाठी आर्थिक गरज असल्यामुळे विक्रीस काढलेली आहे व आमचे अशिलाबरोबर विक्री करणेकामी ठराव केलेला आहे. सदर प्लॉटजागा मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद प्लॉटजागेवरती कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर प्लॉट जागेसंदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरूपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर प्लॉटजागेवर कोणाचा बोजा हक्क हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास काही वाद असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात हरकत खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर प्लॉटजागा ही निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १/११/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे अॅड. घोडके आर. आर.**
B.Sc. L.L.B Roll No. - MAH/2166/2018
**वैराग, ता. बार्शी सोलापूर**
**मो.नं. ९८८१८४१५९५**

विशेष वसुली व विक्री अधिकारी दि लक्ष्मी को ऑप बँक लि. सोलापूर (अवसायानात) मुख्य कार्यालय- ३१९ दक्षिण कसबा सोलापूर

**स्थावर मालमत्ता प्रत्यक्ष ताबा बाबत सूचना**

सर्व जनतेस, कर्जदार, भागीदार, जामीनदार यांना सदर ताबा सुचनेद्वारे कळविण्यात येते की, ज्या अर्थी दि लक्ष्मी को. ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर मुख्य कार्यालय सोलापूर या संस्थेचे विशेष वसुली अधिकारी यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७/३ अन्वये दिनांक ११/१२/२०२१ रोजी कर्जदार प्रथमेश मेडिकल अँड जनरल स्टोअर्स चे प्रो. प्रा. बाळप्पा अडव्यंप्पा नंदुरे व जामीनदार यांना मागणीची सूचना (डिमांड नोटीस) पाठवून १५ दिवसाचे आत थकीत रक्कम आमचेकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्याअर्थी सदर कर्जदार, जामीनदार यांना कळविणेत येते की खालील सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचा दिनांक ०१/०९/२०२३ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७ पोट नियम ११ ड (१) अन्वये प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. आणि मा. उपविभागीय दंडाधिकारी सोलापूर (जा. क्रं २०२५/उविअक्रं. १/एमजी/एस.आर.कावि ७५८/२०२५ दि, १९/०८/२०२५) यांच्या आदेशाने दि. २८/१०/२०२५ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. सबब उपरोक्त कर्जदार, जामीनदार आणि तमाम जनतेस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, विक्री, बोजा, तारण, वाटणी, वहिवाट, बक्षीस, भाडेपट्टा अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये याउपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे असे ठरवून आमचे बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही याची नोंद उपरोक्त कर्जदार, जामीनदार आणि तमाम लोकांनी घ्यावी,

**स्थावर मालमत्तेचा तपशील मिळकतदार-बाळप्पा आडव्याप्पा नंदुरे**

जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, सोलापूर महानगरपालिका हद्दीतील उत्तर कसबा येथील सि.सं.नं.१३८० विठ्ठल आर्केड या इमारतीवर बांधण्यात आलेल्या गाळा नं १४ यासी क्षेत्रफळ २७९० चौ. मी. यासि चतुःसिमा येणेप्रमाणे
पूर्वेस-गाळा नं १३ दक्षिणेस-प्यासेज
पश्चिमेस-प्यासेज उत्तरेस-पार्किंग

**सही-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि. लक्ष्मी को ऑप बँक लि. (अवसायनात)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### महिला विश्वचषकात सुनिधी चौहान गाणार



**नवी दिल्ली** : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रविवारी नवी मुंबईत होणाऱ्या आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ च्या अंतिम सामन्यात भारतीय गायिका सुनिधी चौहान आपल्या सर्वात प्रसिद्ध गाणे गाऊन प्रेक्षकांना आनंदित करणार आहे. भारतातील घराघरात प्रसिद्ध असलेली सुनिधी ६० नर्तकांच्या गटासह येणार आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक संजय शेट्टी यांचा स्पेशल-इफेक्ट फटाक्यांचा कार्यक्रम देखील असेल, असे आयसीसीने एका निवेदनात म्हटले आहे. डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये मध्य-डाव दरम्यान लेसर शो, ३५० मास्ट कास्ट कलाकार आणि ड्रोन प्रदर्शन यांचा समावेश असेल. जेमिमाह रॉड्रिग्जच्या विजयी शतकी खेळीच्या बळावर भारताने उपांत्य सामन्यात सात वेळा विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर अंतिम फेरीसाठी आपले स्थान निश्चित केले. दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडला नमवून यजमान संघाविरुद्धच्या जेतेपदाच्या लढतीत आपले स्थान पक्के केले. सामन्यापूर्वी सुनिधी भारतीय राष्ट्रगीत सुद्धा गाणार आहे, तर केपटाऊनच्या टॅरिन बँककडून दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रगीत सादर केले जाईल.

### न्यूझीलंडने इंग्लंडविरुद्धची वन-डे मालिका जिंकली

**वेलिंग्टन** : माउंट मौंगानुई आणि हॅमिल्टन येथे झालेल्या पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यात विजय मिळवल्यानंतर, यजमान न्यूझीलंडने स्काय स्टेडियमवर झालेल्या मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात रोमांचक विजय मिळवला आणि इंग्लंडला ०-३ असा हृदयद्रावक पराभव पत्करावा लागला. मिशेल सॅण्टनरच्या नेतृत्वाखालील संघाने पाहुण्या संघाचा दोन गड्यांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना, इंग्लंडचा संघ ४०.२ षटकांत २२२ धावांवर गारद झाला. जेमी स्मिथ, बेन डकेट आणि जो रूट स्वस्तात बाद झाल्याने टॉप-ऑर्डर फलंदाज अपयशी ठरले.

### प्रो-रेसलिंग लीगचे जानेवारीत पुनरागमन

**नवी दिल्ली** : प्रो-रेसलिंग लीग जानेवारीमध्ये होणार आहे. ही लीग १८ दिवस चालेल आणि सहा संघांपैकी प्रत्येकी नऊ कुस्तीगीर असतील, ज्यात चार महिलांचा समावेश असेल. सर्व संघांमध्ये पाच भारतीय आणि चार परदेशी कुस्तीगीर असू शकतात. कोरोनाच्या साथीमुळे चार हंगामांनंतर निलंबित करण्यात आलेली प्रो रेसलिंग लीग जानेवारी २०२६ मध्ये पुनरागमन करणार आहे, आर्थिक पारदर्शकता आणि स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी कुस्ती फेडरेशन ऑफ इंडिया थेट कुस्तीगीर आणि फ्रँचायझींना पैसे देणार आहे. माजी प्रमुख ब्रिजभूषण शरण सिंग यांच्या विरोधात झालेल्या निषेधाचा भाग असलेल्या कुस्तीगीरांना भेदभाव सहन करावा लागणार नाही आणि त्यांना लिलावात त्यांची नावे नोंदवण्याची परवानगी दिली जाईल. पूर्वी, डब्ल्यूएफआयने वार्षिक रॉयल्टी शुल्कासाठी प्रो-स्पोर्टीला आयोजन करण्याचे अधिकार दिले होते, परंतु बहुतेक सहभागींनी तक्रार केली की त्यांना अनेक वर्षांपासून त्यांचे कर वजावटीवर स्रोत तपशील मिळाले नाहीत.

# भारताचे लक्ष्य ऐतिहासिक विश्वचषक

◆ **नवी मुंबई, १ नोव्हेंबर**

भारतीय महिला क्रिकेट एका निर्णायक क्षणाच्या उंबरठ्यावर आहे, जो पुरुषांच्या १९८३ च्या ऐतिहासिक विजयाची आठवण करून देतो. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघ रविवारी येथे आयसीसी महिला वन-डे विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेचा सामना करताना आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवण्याचा निर्धार करत आहे.

विश्वचषकाच्या १३ व्या आवृत्तीत तिसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचलेला भारत आणि पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचलेला दक्षिण आफ्रिका यांच्यात एक नवीन विजेता निर्माण होणार आहे.

विश्वविजेतेपद जिंकल्यास भारतात महिला क्रिकेटमध्ये अभूतपूर्व रस निर्माण होऊ शकतो. तरुण मुलींच्या नवीन पिढीला हा खेळ स्वीकारण्यास प्रेरणा मिळू शकते. तीन हंगामांपूर्वी महिला प्रीमियर लीगच्या आगमनापेक्षाही जास्त मुली क्रिकेट खेळण्यासाठी मैदानावर येऊ शकतात.



शनिवारी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर भारत महिला आणि दक्षिण आफ्रिका महिला यांच्यातील आयसीसी महिला विश्वचषक अंतिम एकदिवसीय क्रिकेट सामन्यापूर्वी सराव सत्रादरम्यान भारताची हरलीन देओल, (डावीकडे), जेमिमाह रॉड्रिग्ज (मागे मध्य भागी) व दीप्ती शर्मा (समोर मध्य भागी)

**भारत- दक्षिण आफ्रिका अंतिम सामना आज**
**स्थळ** : डी. वाय. पाटील स्टेडियम, नवी मुंबई
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्टसवर

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत** : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), ऋचा घोष (यष्टिरक्षक), उमा चेत्री (यष्टिरक्षक), जेमिमाह रॉड्रिग्ज, हरलीन देओल, शेफाली वर्मा, अमनजोत कौर, दीप्ती शर्मा, स्नेह राणा, क्रांती गौड, रेणुका सिंह ठाकूर, श्री चरणी, अरुंद, अरविंद.

**दक्षिण आफ्रिका** : लॉरा वोल्वार्ड (कर्णधार), ताझमिन ब्रिट्स, सिनालो जाफ्ता, काराबो मेसो, ॲनेके बॉश, नादिन डी क्लर्क, ॲनेरी डेर्कसेन, मारिझान कॅप, सुने लुस, नॉन्डुमिसो शांगासे, क्लो ट्रायॉन, अयाबोंगा खाका, मसाबालु, सेब्बाले, मसाबालु, सेबाला.

**भारताला तिसऱ्यांदा संधी**

यजमान भारतीय महिला संघाला ऑस्ट्रेसलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यातील विजयाच्या आनंदातून लवकर बाहेर पडावे लागणर आहे. जेमिमाह रॉड्रिग्जची अविस्मरणीय १२७ धावा आणि हरमनप्रीतची ८९ धावांची खेळी आणि सात वेळचा विश्वविजेता ऑस्ट्रेलियाच्या असामान्यपणे अनियमित खेळीमुळे भारत तिसऱ्यांदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला.

२०१७ च्या एकदिवसीय विश्वचषक अंतिम सामन्यात भारताचा इंग्लंडविरुद्ध नऊ धावांनी झालेला पराभव अजूनही त्या मोहिमेचा भाग असलेल्यांसाठी वेदनादायक आहे, यात हरमनप्रीतचाही समावेश आहे. त्यानंतर २०२३ च्या टी-२० विश्वचषक उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच धावांनी पराभव झाला आणि २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकाच्या सामन्यात त्याच प्रतिस्पर्ध्यांकडून आणखी एक हृदयद्रावक पराभव झाला.

भारतासाठी, लढाई आता कौशल्य किंवा फॉर्म सिद्ध करण्याबद्दल नाही, तर या स्पर्धेत अंतिम अडथळ्याला पार करण्याबद्दल आहे. भारताला विश्वचषक जिंकण्यासाठीची ही तिसरी संधी आहे.

सलग तीन सामने गमावल्यानंतर भारतीय महिला संघाने माजी विजेत्या न्यूझीलंड व ऑस्ट्रेलियावर जबरदस्त विजय मिळवून घरच्या मैदानावर पुन्हा एकदा जोरसादर मुसंडी मारली, आता त्यांनी विजयाची हीच लय अंतिम फेरीत कायम ठेवण्याची अपेक्षा आहे.

भारताला सर्वोत्तम फलंदाज स्मृती मंधाना (३८५ धावा) धावा काढेल अशी अपेक्षा होती परंतु तिला जेमिमाह रॉड्रिग्जच्या रूपात एक शिल्पकार सापडला.

डीवाय पाटील स्टेडियमच्या सपाट खेळपट्टी उच्च धावसंख्या आणि सायंकाळी दव पडण्यासाठी ओळखली जाते. आता भारतीय महिलांनी क्षेत्ररक्षण आणि गोलंदाजीत उत्तम कामगिरी करणे अपेक्षित आहे. भारताने ऑस्ट्रेलियावर मात करताना वेगवान गोलंदाज क्रांती गौड व रेणुका सिंग ठाकूरने लयीसाठी संघर्ष केला व कर्णधार हरमनप्रीतनेही एक नियमित झेल सोडला. परंतु स्पर्धेतील सर्वाधिक बळी घेणारी १७ बळी घेणारी दीप्ती शर्मा पुन्हा एकदा भारताच्या यशाची गुरुकिल्ली ठरेल.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेला 'अंडरडॉग' म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही. त्यांनी संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय जिद्द व चिकाटी दाखवली आहे. अनुभवी मॅरिझाने कॅप (२०४ धावा, १२ बळी), नादिन डी क्लार्क (१९० धावा, ८ बळी), तझमिन ब्रिट्स (२१२ धावा), क्लोई ट्रायन (१६७ धावा, ५ बळी) आणि कर्णधार लॉरा वोल्वार्डने (४७० धावा) उत्तम कामगिरी केली आहे. डावखुरी फिरकी गोलंदाज नोनकुलुलेको म्लाबा (१२ विकेट) भारताच्या उजव्या हाताने जबरदस्त फलंदाजीची परीक्षा घेईल.

गत वर्षी टी-२० विश्वचषक अंतिम फेरीत न्यूझीलंडकडून पराभव पत्करल्यानंतर, एक पाऊल पुढे जाण्याची दक्षिण आफ्रिकेची भूक प्रचंड आहे.

**इतिहास घडविण्यासाठी हरमनप्रीतला अखेरची संधी**

शेवटी, कोणता संघ दबाव चांगल्या प्रकारे हाताळतो यावर स्पर्धा अवलंबून असेल. हरमनप्रीत कौरसाठी, कर्णधार म्हणून एकदिवसीय विश्वचषक जिंकणारी पहिली भारतीय महिला म्हणून इतिहासात आपले नाव कोरण्याची ही शेवटची संधी असू शकते. ◂(वृत्तसंस्था)

# श्रेयस अय्यरला रुग्णालयातून सुटी

### आता त्याची प्रकृती स्थिर: बीसीसीआय

◆ **नवी दिल्ली, १ नोव्हेंबर**



ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात यशस्वीरित्या झेल घेण्याच्या प्रयत्नात प्लीहा आणि बरगडीच्या दुखापतीनंतर भारताचा एकदिवसीय उपकर्णधार श्रेयस अय्यरला सिडनी येथील रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. आता त्याची प्रकृती सुधारत आहे.

सिडनी आणि भारतातील तज्ज्ञांसह बीसीसीआय वैद्यकीय पथक त्याच्या प्रकृतीवर समाधानी आहे आणि त्याला आज रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे, असे बीसीसीआयने शनिवारी एका निवेदनात म्हटले आहे.

तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात हर्षित राणाच्या गोलंदाजीवर ॲलेक्स कॅरीचा कठीण झेल घेण्याचा प्रयत्न करताना ३० वर्षीय अय्यर याच्या डाव्या बरगडीला दुखापत झाली होती.

अय्यर जेव्हा विमान प्रवास करण्याजोगा तंदुरुस्त होईल तेव्हा तो भारतात परतण्याची अपेक्षा आहे, परंतु पुढील दोन महिने तो खेळापासून दूर राहील.

दुखापत त्वरित ओळख पटली आणि किरकोळ प्रक्रियेनंतर रक्तस्त्राव त्वरित थांबवण्यात आला. त्यासाठी त्याचे योग्य वैद्यकीय व्यवस्थापन करण्यात आले आहे, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# टेनिसपटू रोहन बोपण्णा निवृत्त

◆ **नवी दिल्ली, १ नोव्हेंबर**



भारताचा दोन वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता रोहन बोपण्णाने शनिवारी व्यावसायिक टेनिसमधून निवृत्तीची घोषणा केली. त्यामुळे त्याच्या २० वर्षांच्या कारकिर्दीचा शेवट झाला. त्याने आतापर्यंत देशाला अनेक गौरव मिळवून दिले.

बोपण्णाने निवृत्तीचा निर्णय पॅरिस मास्टर्स १००० मध्ये ॲलेक्झांडर बुब्लिकसोबत खेळल्यानंतर काही दिवसांनी घेतला. या जोडीला अखेर ३२ व्या फेरीत जॉन पीअर्स आणि जेम्स ट्रेसी यांच्याकडून ५-७, ६-२, १०-८ असा पराभव पत्करावा लागला.

२० अविस्मरणीय वर्षांच्या दौऱ्यानंतर आता मी अधिकृतपणे माझी रॅकेट बंद करत आहे, असे रोहनने एका लांबलचक पोस्टमध्ये लिहिले.

भारतातील महान टेनिसपटूंपैकी एक म्हणून ओळखले जाणारा बोपण्णा याने आपल्या शक्तिशाली सर्व्हिस, कुशल नेट कौशल्ये आणि पुरुष आणि मिश्र दुहेरीमध्ये कायमस्वरूपी प्रभाव यांच्या आधारे एक उल्लेखनीय वारसा निर्माण केला. वीस वर्षांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत, ४५ वर्षीय हा खेळाडू भारतीय टेनिसचा आधारस्तंभ राहिला आहे, त्याने अनेक डेव्हिस चषक मोहिमांमध्ये आणि ऑलिम्पिक स्पर्धेत अभिमानाने देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# विदर्भाविरुद्ध तामिळनाडू ४ बाद २५२

### प्रदोष रंजन पॉलचे शतक

◆ **कोइम्बतूर, १ नोव्हेंबर**

प्रदोष रंजन पॉलने फलंदाजीत आपली उत्तम कामगिरी सुरू ठेवत आणखी एक शतक झळकावले. शनिवारी विदर्भाविरुद्धच्या एलिट ग्रुप अ रणजी करंडक सामन्याच्या पहिल्या दिवशी खेळ थांबला तेव्हा तामिळनाडूने ४ बाद २५२ धावा केल्या.

मागील फेरीत नागालॅण्डविरुद्ध कारकिर्दीतील सर्वोत्तम द्विशतक ठोकणाऱ्या पॉलने १३ चौकारांसह ११३ धावा केल्या, तर बाबा इंद्रजित खेळाच्या शेवटी ९४ धावांवर नाबाद होते, तो आपल्या शतकापासून सात धावा दूर आहे. तामिळनाडूने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर पॉलने इंद्रजितसोबत चौथ्या गड्यासाठी १७९ धावा जोडल्या. सलामीवीर विमल कुमार (२) आणि अतीश एसआर (३) अनुक्रमे नचिकेत भुते आणि प्रफुल्ल हिंगे यांनी स्वस्तात बाद केल्याने यजमान संघ सुरुवातीलाच अडचणीत सापडला होता. त्यानंतर पॉलने अँड्र्यू सिद्धार्थ सी सोबत हातमिळवणी करून डाव सावरला आणि नंतर तो ३० व्या षटकात अक्षय कर्णेवारला बाद झाला. डावखुरा फलंदाज इंद्रजित सोबत एक मजबूत भागीदारी करून तमिळनाडूला सुरक्षिततेकडे नेले. ◂(वृत्तसंस्था)

# बुमराह खेळत असेल तर अर्शदीपचे नाव यादीत दुसऱ्या क्रमांकावर असायला हवे : अश्विन

◆ **नवी दिल्ली, १ नोव्हेंबर**

भारताचा माजी ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने भारतीय संघ व्यवस्थापनाच्या टी-२० अंतिम एकादशममधून अर्शदीप सिंगला वगळण्याच्या निर्णयाबद्दल आश्चर्य व्यक्त केले.

कामगिरीनुसार जसप्रीत बुमराहनंतर डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप हा दुसऱ्या क्रमांकाचा पसंतीचा वेगवान गोलंदाज असावा. अर्शदीपसारख्या सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूला दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही, असे अश्विनने म्हटले आहे.

मेलबर्नमध्ये झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियाकडून चार गड्यांनी पराभव झाल्यानंतर अश्विनने हे विधान केले. भारताचा संघ केवळ १२५ धावांवर गारद झाला, परंतु ऑस्ट्रेलियाने १४ षटकांतच धावांचा पाठलाग करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. कॅनबेरा येथे झालेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला टी-२० सामना वाया गेला..

जर बुमराह खेळत नसेल, तर अर्शदीप त्या संघाच्या यादीत प्रथम क्रमांकाचा पहिला गोलंदाज होतो. या संघातील अकरा खेळाडूंमधून अर्शदीप सिंग कसा बाहेर पडतो हे मला समजत नाही, असेही अश्विन म्हणाला. रोहित शर्मा-राहुल द्रविडच्या काळात, अर्शदीप टी-२० क्रिकेटमध्ये भारताच्या सर्वात विश्वासार्ह वेगवान गोलंदाजांपैकी एक झाला होता आणि सध्या तो या फॉरमॅटमध्ये देशातील सर्वाधिक बळी टिपणारा आणि १०० बळींचा टप्पा ओलांडणारा पहिला भारतीय गोलंदाज आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भारताला पहिल्या विजयाची आशा

◆ **होबार्ट, १ नोव्हेंबर**

रविवारी होबार्टमधील निमजा स्टेडियममध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया संघादरम्यान तिसरा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. जोश हेझलवूडच्या अनुपस्थितीत भारतीय फलंदाज चांगली कामगिरी करण्याचा आणि मालिकेत पहिला विजय नोंदविण्याचा प्रयत्न करतील. सध्या पाच सामन्याच्या टी-२० मालिकेत ऑस्ट्रेलिया १-० ने आघाडीवर आहे. पहिला टी-२० सामना पावसामुळे रद्द करण्यात आला.

या महिन्याच्या अखेरीस सुरू होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या ॲशेस कसोटी मालिकेत हेझलवूडला पुन्हा जोमाने खेळता यावे म्हणून त्याला विश्रांती देण्यात आली आहे. हेझलवूड भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेतील उर्वरित सामन्याचा भाग असणार नाही. त्यामुळे हेझलवूडत्या योग्य लांबी व अचूक गोलंदाजीमुळे भारताच्या अव्वलर फलंदाजांना कोणत्याही दडपणाविना खेळण्याची संधी मिळेल.

'हे निश्चितच दिलासादायक ठरेल. मी कधीही अशा गोलंदाजीचा सामना केला नव्हता, असे स्टार सलामीवीर अभिषेक शर्मा मेलबर्न सामन्यानंतर म्हणाला होता.

हेझलवूडच्या अनुपस्थितीचा अर्थ असा होईल की, भारतीय फलंदाज उसळी व वेगवान चेंडू हाताळण्यात थोडे कमकुवत दिसत आहे. त्याच्या अनुपस्थितीमुळे




**भारत-ऑस्ट्रेलिया तिसरा टी-२० सामना**
स्थळ : निमजा स्टेडियम, होबार्ट
वेळ : दुपारी १:४५ वाजतापासून (भारतीय वेळेनुसार)
थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर




झेवियर बार्टलेट, नॅथन एलिस किंवा शॉन ॲबॉट सारख्य गोलंदाचा सामना करताना भारतीय फलदाजांना थोडे अधिक आश्वासक वाटेल.

कर्णधार सूर्यकुमार यादव व कर्णधार-इन-वेटिंग शुभमन गिल दोघांनाही अतिरिक्त उसळी व वेगवान गोलंदाजीचा सामना करण्यात अडचणी आल्या होत्या.

मात्र, होबार्ट येथील बेलेरिव्ह ओव्हलच्या सीमा आकाराने लहान आहे. २०१२ मध्ये बेलेरिव्ह ओव्हलवर चॅम्पियन एकदिवसीय फलंदाज म्हणून विराट कोहलीने विजयासाठी ३२१ धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेविरुद्ध ८६ चेंडूत नाबाद १३३ धावांची उत्कृष्ट खेळी केली.

**अर्शदीप सिंगला संधी मिळणार**

भारतीय संघ व्यवस्थापनाचा फलंदाजीच्या खोलीबद्दलचा ध्यास या दौऱ्यात चर्चेचा विषय राहिला आहे आणि एमसीजीवर १२५ धावा करणे यासारख्या काही फलंदाजीतील अपयश अशा रणनीतीच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात.

अतिरिक्त उसळी असलेल्या खेळपट्टीवर, भारत तीन फिरकी गोलंदाजांसह मैदानात उतरला, परंतु अर्शदीप सिंग हा १०० टी-२० बळींसह एकमेव भारतीय गोलंदाज असूनही त्याला अंतिम एकादशमध्ये स्थान मिळाले नाही.

जर जसप्रीत बुमराह खेळत असेल, तर अर्शदीप सिंगचे नाव यादीत दुसऱ्या क्रमांकावर असायला हवे. जर बुमराह खेळत नसेल, तर अर्शदीप सिंगचे नाव यादीत पहिले असेल, असे रविचंद्रन अश्विनने म्हटले होते.

जरी कोणी हर्षितला एक सक्षम फलंदाज मानत असेल, जो तो नक्कीच आहे, तरी दुसऱ्या सामन्यातील काही आकडे नक्कीच डोळे उघडणारे असतील.

होबार्टमध्ये एका बाजूला खुले क्षेत्र स्विंग गोलंदाजीला मदत करेल, भारताने अर्शदीपला खेळवण्याच्या वेदीवर एका फिरकी गोलंदाजीचा पर्याय बलिदान देण्याचा विचार केला पाहिजे. ◂(वृत्तसंस्था)

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत** : सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, शुभमन गिल, तिलक वर्मा, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), शिवम दुबे, अक्षर पटेल, हर्षित राणा, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, जितेश शर्मा (यष्टिरक्षक), अर्शदीप सिंग, रिंकू सिंग, वॉशिंग्टन सुंदर.

**ऑस्ट्रेलिया** : मिचेल मार्श (कर्णधार), शॉन ॲबॉट (सामने १-३), झेवियर बार्टलेट, महली बियर्डमन (सामने ३-५), टिम डेव्हिड, बेन द्वारशुइस (सामने ४-५), नॅथन एलिस, ग्लेन मॅक्सवेल (सामने ३-५), ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुहनेमन, मिचेल ओवेन, जोश फिलिप, तन्वीर संघा, मॅथ्यू शॉर्ट आणि मार्कस स्टोइनिस

# भारत अ संघाला १५६ धावांची गरज

### ऋषभ पंत नाबाद ६४

### दक्षिण आफ्रिका अ संघाचा दुसरा डाव गडगडला

◆ **बंगळुरू, १ नोव्हेंबर**

येथे सुरु असलेल्या भारत अ संघाविरुद्ध पहिल्या अनधिकृत कसोटी क्रिकेट सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिका अ संघाने दुसऱ्या डावांत १९९ धावा काढून भारत अ संघासमोर विजयासाठी २७५ धावांचे लक्ष्य ठेवले. धावांचा पाठलाग करताना दिवस अखेर भारत अ संघाने ३९ षटकांत ४ ब ाद ११९ धावांचा टप्पा गाठला असून त्यांना विजयासाठी आणखी १५६ धावा काढण्याची गरज आहे.

दक्षिण आफ्रिका अ संघाने पहिल्या डावांत ३०९ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात भारत अ संघाला २३४ धावांपर्यंतच मजल मारता आली. पहिल्या डावांत ७५ धावांची आघाडी मिळविणाऱ्या दक्षिण आफ्रिका अ संघाने दुसऱ्या डावात दुसऱ्या दिवस अखेर बिनबाद बिनबाद ३० धावा केल्या, याच धावसंख्येवरून आज दक्षिण आफ्रिकेने पुढे खेळण्यास सुरुवात केली आणि त्यांचा दुसरा डाव ४८.१ षटकांत सर्वबाद १९९ धावांवर आटोपला. दक्षिण आफ्रिका अ संघाने भारत अ संघासमोर विजयासाठी २७५ धावांचे लक्ष्य ठेवले. भारत अ संघाने तिसऱ्या दिवस अखेर ३९ षटकात ४ बाद ११९ धावा काढल्या. उद्या सामन्याचा शेवटचा दिवस असून भारत अ संघाला आता विजयासाठी आणखी १५६ धावा काढण्याची गरज आहे. त्यांच्याकडे आणखी सहा गडी शिल्लक आहे.


ऋषभ पंत : नाबाद ६४, चेंडू ८१ , चौकार ८, षट्कार २

बिनबाद ३० धावावरून पुढे खेळताना दक्षिण आफ्रिकेचे फलंदाज भारत अ संघाच्या गोलंदाजांसमोर फारसे चमकू शकले नाही. लेसेगो सेनोक्वाने व झुबायर हामझाने प्रत्येकी ३७ धावांची, तर त्शेपो सिपाम्लाने २५ धावांचे योगदान दिले. त्यामुळे भारत अ संघासमोर विजयासाठी २७५ धावांचे लक्ष्य राहिले. दक्षिण आफ्रिका अ संघाला दुसऱ्या डावांत १९९ धावांत गुंडाळताना भारत अ संघाच्या तनुष कोटियानने ४ बळी, अंशुल कम्बोजने ३ बळी, गुरनूर ब्रारने २ बळी, तर मानव सुतारने एक बळी टिपला.

धावांचा पाठलाग करताना भारत अ संघाची घसरगुंडी उडाली, साई सुदर्शन (१२), आयुष म्हात्रे ( ६) व देवदत्त पडिक्कल (५) यांच्या रुपाने तीन महत्त्वपूर्ण मोहरे गमावल्यानंतर मात्र भारत अ संघाने जोरदार मुसंडी मारली. रजत पाटीदार व कर्णधार ऋषभ पंतने आपले कौशल्य पणाला लावत संघाच्या विजयाच्या आशा जिवंत ठेवल्या. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ८७ धावांची भागीदारी करून संघाला ३७ षटकांत ११९ धावांवर पोहोचवले, मात्र याचवेळी रजत पाटीदार तियान व्हॅन वुरेनच्या गोलंदाजीला बळी पडला. पाटीदारने ८७ चेंडूंत ५ चौकारांच्या मदतीने २८ धावांची खेळी केली. पुढे ऋषभ पंत व आयुष बदोनीने नाबाद खेळी करत दिवस अखेरपर्यंत भारत अ संघाला ३९ षटकांत ४ बाद ११९ धावांचा टप्पा गाठून दिला. पंत ६४ धावांवर, तर बदोनी शून्यावर नाबाद राहिलो ऋषभ पंतने ८१ चेंडूंत ८ चौकार व २ षट्कार हाणले. ◂(वृत्तसंस्था)

# महिला क्रिकेटपटूही होणार मालामाल

◆ **नवी दिल्ली, १ नोव्हेंबर**

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामना खेळताना भारतीय महिला क्रिकेट संघ इतिहासाच्या उंबरठ्यावर आहे आणि रविवारी नवी मुंबईत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने सुवर्णपदक जिंकल्यास त्यांना रोख नफा देऊन सन्मानित करण्यास बीसीसीआय पूर्णपणे सज्ज आहे.

बीसीसीआयचे माजी सचिव आणि आता आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनी शिफारस केलेल्या 'समान वेतन' धोरणाचे पालन करून, गेल्या वर्षी अमेरिकेत टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघाला देण्यात आलेल्या रकमेइतकीच रक्कम संघाला देण्याचा विचार वरिष्ठ करत आहेत, असे मानले जाते.

पुरुषांच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत कामगिरीसाठी संपूर्ण संघाला - खेळाडू आणि सपोर्ट स्टाफला तब्बल १२५ कोटी रुपये बक्षीस देण्यात आले. भारताने अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला होता.

बीसीसीआय पुरुष आणि महिलांना समान वेतन देण्याचे समर्थन करते आणि म्हणूनच अशी अनेक चर्चा आहेत की जर आपल्या मुलींनी विश्वचषक जिंकला तर पुरूषांच्या जागतिक विजयापेक्षा बक्षीस कमी नसेल. परंतु कप जिंकण्यापूर्वी घोषणा करणे चांगले नाही, असे बीसीसीआयच्या एका सूत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर वृत्तसंस्थेला सांगितले.

भारतीय महिला संघ २०१७ च्या विश्वचषक अंतिम सामन्यात लॉर्ड्सवर इंग्लंडकडून ९ धावांनी पराभूत झाला, तेव्हा बीसीसीआयने प्रत्येक खेळाडूला ५० लाख रुपये बक्षीस दिले होते. माजी मुख्य प्रशिक्षक तुषार आरोठे आणि इतर सपोर्ट स्टाफलाही उत्तम बक्षीस देण्यात आले.

आठ वर्षांनंतर, जर भारतीय महिला संघ जिंकला तर प्रत्येक क्रिकेटपटूला बक्षीस रक्कम कमी नाही तर १० पट जास्त असू शकते. ◂(वृत्तसंस्था)

# भारताने सांघिक गटात जिंकली दोन रौप्यपदके

### आशियाई शालेय बुद्धिबळ

◆ **उलानबाटार, १ नोव्हेंबर**

मंगोलियातील उलानबाटार येथे झालेल्या प्रतिष्ठित आशियाई शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद २०२५ स्पर्धेत ७ वर्षांखालील सांघिक गटात देशासाठी रौप्य पदक जिंकून, तरुण भारतीय बुद्धिबळपटूंचा समावेश असलेल्या संघाने आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा आपले कौशल्य सिद्ध केले.

मुंबईच्या लक्ष सत्येन जैन याच्या नेतृत्वाखालील भारतीय ७ वर्षांखालील संघाने आणि पुण्याच्या एसीएम कविश भट्टड आणि शिवांश नागा आदित्य कासुकुर्तीने प्रशंसनीय कामगिरी केली आणि १२ गुणांसह अंतिम फेरी गाठली. मंगोलियन संघाने १६.५ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

नऊ वर्षांखालील गटात भारताने एएफएम श्रेयन थिप्पार्थी, नोव्हा अय्यर जुगल आणि हृदय गर्गच्या नेतृत्वाखालील संघाद्वारे आणखी एक रौप्य पदक मिळवले. या वर्षीच्या आशियाई शालेय बुद्धिबळ स्पर्धेत १६ देशांतील ८०० हून अधिक खेळाडूंचा सहभाग होता.

तरुण भारतीय त्रिकुटाने संपूर्ण स्पर्धेत उल्लेखनीय संयम, रणनीतिक प्रतिभा आणि लढाऊ वृत्ती दाखवली व जागतिक दर्जाचे बुद्धिबळ विजेते निर्माण करण्याचा भारताचा अभिमानास्पद वारसा पुढे चालू ठेवला. गेल्या चार दशकांपासून आशियाई आणि जागतिक स्तरावरील वयोगटातील स्पर्धांमध्ये भारताला प्रचंड यश मिळाले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करणे आणि रौप्य पदक मिळवणे हा भारतासाठी अभिमानाचा क्षण आहे, असे मुख्य प्रशिक्षक दुर्गा नागेश गुट्टुला म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# उन्नती हुडा उपांत्य फेरीत; लक्ष्यसेन बाहेर

◆ **हायलो, १ नोव्हेंबर**

किशोरवयीन बॅडमिंटनपटू उन्नती हुडाने जर्मनीमध्ये सुरु असलेल्या सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सरळ गेममध्ये विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला, तर लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी यांनी उपांत्य फेरीत धडक मारली.

१८ वर्षीय उन्नतीने ४७ मिनिटांत संपलेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात चौथ्या मानांकित चीन तैपेईच्या लिन हसियांग ती हिच्यावर २२-२०, २१-१३ अशी मात केली. महिला एकेरीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत, रक्षिता श्री संतोष रामराजला डेन्मार्कच्या सहाव्या मानांकित लाईन क्रिस्टोफरसेन हिच्याकडून ७-२१, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीत, लक्ष्यने पहिला गेम गमावल्यानंतर बरोबरी पुनर्संचयित करण्यासाठी पुनरागमन केले, परंतु अखेर एक तास आणि १४ मिनिटे चाललेल्या सामन्यात त्याला पराभव पत्करावा लागला. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## प्रत्येक विभागीय अधिकाऱ्यांनी नाले, ड्रेनेजची कामे नियमित करावीत

**महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली विविध नाले परिसराची पाहणी**

सोलापूर, दि. १ नोव्हेंबर- शहरातील नाल्यांची व्यवस्था कार्यक्षम राहावी. पावसाळ्यात पाणी साचू नये यासाठी आवश्यक उपाययोजना तत्काळ राबविणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक विभागीय अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागातील नाले व ड्रेनेज कामांची नियमित पाहणी करून कामे गुणवत्तापूर्ण आणि वेळेत करण्याची काळजी घ्यावी, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले. महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज शहरातील गणेश पेठ शॉपिंग सेंटर परिसर नाला, कुंभार वेस येथील रूपा भवानी चौकाजवळील नाला, लेप्रसी कॉलनी कचरा डेपो या ठिकाणी पाहणी केली. त्याप्रसंगी त्यांनी आदेश दिले. यावेळी सहायक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका आकूलवार, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, विभागीय अधिकारी बक्षी, सहायक अभियंता शकील शेख आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी या तिन्ही ठिकाणी सुरू असलेल्या नाल्यांच्या कामाची आणि कचरा डेपो परिसरातील स्वच्छतेची सविस्तर माहिती घेतली. त्यांनी नाल्यांमध्ये बॉक्स कन्व्हर्ट बसविण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, त्याआधी तांत्रिक तपासणी करून नाल्यांची लेव्हल तपासावी आणि त्यानुसार काम सुरू करण्याचे निर्देश दिले. लेप्रसी कॉलनी कचरा डेपो परिसरातील ड्रेनेज लाईनचे काम व्यवस्थितपणे पूर्ण झाले आहे का, याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्वच्छतेवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे, तसेच नाल्यांची अडथळामुक्त वाहतूक सुनिश्चित करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.



## सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती व साफ सफाई करा

**ओमसाई प्रतिष्ठानच्या वतीने आरोग्य निरीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी**

सोलापूर, दि. १ नोव्हेंबर- प्रभाग २२ मधील सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती व साफ सफाई करण्यात यावी, अशी मागणी ओमसाई प्रतिष्ठानच्या वतीने संस्थापक अध्यक्ष शिवराज गायकवाड यांनी महापालिका आरोग्य निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रभाग २२ येथील छोटी व मोठी इराण्णा वस्ती, गरिबी हटाव झोप नं २ व रेवणसिद्धेश्वर झोपडपट्टी परिसर आणि इतर भागातील सार्वजनिक स्वच्छतागृह, लाईट वीज वितरण व्यवस्था तसेच रस्त्यावरील खड्डे यामुळे वस्तीतील लोकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्वच्छता व्यवस्था बाबत तेथील नागरिकांना शौचालयासाठी सार्वजनिक मैदानाचा व रेल्वेरूळ परिसराचा सहारा घ्यावा लागत असे. त्यामुळे या वातावरणाचा परिणाम सर्वच नागरिकांना होत आहे, त्या परिसरातील लहान मूल व काही वरिष्ठ नागरिक यांना आजाराला सामोरे जावं लागत आहे. ड्रेनिज लाईन खराब झाली असून पाऊस झाल्यावर तेथील नागरिकांच्या घरात पाणी घुसत असल्याने त्यांचे भवितव्य व पुढील वाटचालीस खूप मोठा धोका पत्करावा लागत असल्याने तेथील सामाजिक कार्यकर्ते धनराज संदोठाकर यांना निदर्शनास येताच त्यांनी सर्व विषयांवर गांभीर्याने प्रकाश पाडण्यासाठी ओम साई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शिवराज गायकवाड यांना माहिती दिली. परिसरात व वस्तीमध्ये जावून तेथील नागरिकांची समस्या जाणून घेतली. व ताबडतोब झोन अधिकारी अनिल चराटे यांना घडलेल्या या समस्येवर पूर्णतः लक्ष घालून समस्या व तेथील अडचणी दूर व्हाव्यात.तातडीने याचा पाठपुरावा करावा असे निवेदनात म्हटले आहे. जातीने लक्ष घालून सदर परिसरात व वस्तीत ताबडतोब कारवाई केली जाईल असे विश्वासपात्र विधान अधिकारी अनिल चराटे यांनी दिली. यावेळी शिवराज गायकवाड, धनराज संदोठाकर, विश्वास नागटिळक, श्रीकांत गिड्डे, देवा गायकवाड, महिंद्र गोसावी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## पठाणवस्ती ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन

पिलीव, दि. १ नोव्हेंबर- माळशिरस तालुक्यातील पठाणवस्ती ग्रामपंचायतीच्या वतीने स्वयंप्रेरणा वाचनालयाचे उद्घाटन अकलूजच्या प्रांताधिकारी श्रीमती विजया पांगारकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रांताधिकारी श्रीमती विजया पांगारकर, सरपंच एजाज पठाण, चांदापूरीचे सरपंच जयवंत सुळ, ग्रामविकास अधिकारी विलासराव बाबर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शब्बीर पठाण, मंडल अधिकारी भोसले, ग्राम महसूल अधिकारी अनिल चव्हाण, मुख्याध्यापक ठवरे, शिक्षक आवटी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक महादेव शेटे, पोलीस पाटील अजय हिंगमिरे, माजी संचालक इस्लामखान पठाण, उपसरपंच श्रीमती शितल पवार, सदस्य वनिता शेटे, अशोक सोनवणे, इम्तियाज पठाण तनवीर पठाण, अजित पठाण पिंतांबर मगर रामचंद्र शेटे ग्रामपंचायत कर्मचारी संजय मगर राजेंद्र शेटे उपस्थित होते. यावेळी शब्बीर पठाण, दुवाद पठाण, मंडळ अधिकारी भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. आभार सरपंच एजाज पठाण यांनी तर सूत्रसंचालन महादेव शेटे यांनी केले.

# अचकदानी तलावाजवळ पक्षी निरीक्षण मनोऱ्याची उभारणी करा

**पक्षी व वन्यजीव प्रेमींकडून मागणी**

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.१ नोव्हेंबर- अचकदानी (ता.सांगोला) या गावाला तेथील निसर्ग संपन्नता, पक्षी वैभव, तलाव परिसर व तेथील निरव शांतता यामुळे विशिष्ट ओळख प्राप्त आहे. अचकदानी वनविभाग परिक्षेत्रातील वनराईने समृद्ध रोपवाटिका व जलसंधारणातून समृद्ध असा जलाशय विविध स्थलांतरित व स्थानिक पक्ष्यांना आकर्षित करीत असतो. म्हणून येथे तलावाच्या जवळ पक्षी निरीक्षणासाठी महाराष्ट्र शासन व वन विभागाकडून निरीक्षण मनोऱ्याची उभारणी करण्यात यावी अशी मागणी पक्षी व वन्यजीव प्रेमी कडून होत आहे.



सांगोल्यातील पक्षी अभ्यासक प्रा.डॉ. प्रकाश बनसोडे व प्रा.डॉ.विधीन कांबळे हे पक्षी निरीक्षणासाठी अचकदानी येथे गेले असता त्यांना स्वर्गीय नर्तक या पक्षाच्या नर व मादीचे दर्शन झाले. प्रौढ नराचा रंग पांढरा असून डोके व त्याच्यावरील तुरा काळा व चमकणारी निळसर छटा असणारा असतो. प्रौढ नराची लांबी ही २० ते ३० सेंटिमीटर इतकी असते. अप्रौढ नराचा रंग तांबूस-तपकिरी असतो व त्याच रंगाची लांब शेपूट असते. मादी तांबूस तपकिरी असून शेपूट आखूड असते. डोक्यावरील तुरा लहान असतो. हे पक्षी गर्द झाडीचे ठिकाण, जलाशय, ओढे, तलाव, यांच्याजवळ दिसून येतात. कीटक भक्षी असणाऱ्या या पक्षांचा विणीचा हंगाम पावसाळ्याच्या पूर्वार्धात सुरू होतो. हा पक्षी भारताच्या नैऋत्येकडील प्रदेशात स्थानिक व इतर भागात स्थलांतरित आहे. अचकदाणी परिसरात स्वर्गीय नर्तक आढळल्याने निसर्गप्रेमी, पक्षीप्रेमी वन्यजीव अभ्यासक व छायाचित्रकार यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. म्हणून याठिकाणी पक्षी निरीक्षणासाठी निरीक्षण मनोऱ्याची उभारणी करण्याची मागणी होत आहे.



स्वर्गीय नर्तक या पक्षाला त्याच्या नराच्या शुभ्र पांढऱ्या रंगामुळे दुधराज असेही संबोधले जाते. हा पक्षी मध्य प्रदेश या राज्याचा राज्यपक्षी आहे. या पक्ष्याचे वैशिष्ट्य म्हणजे याच्या नराची लांब सडक पांढरी शेपूट. हा पक्षी हवेत उडत असताना या लांब सडक शेपटीच्या हवेत उडणाऱ्या रिबिनी प्रमाणे दिसणाऱ्या विशिष्ट हालचालींमुळे याला स्वर्गीय नर्तक हे नाव प्राप्त झाले आहे. स्वर्गीय नर्तक या पक्षाची सांगोला तालुक्यातील ही प्रथमच नोंद आहे. यापूर्वी इथे स्थलांतरित लाल सरी बदकेची शेकडोच्या संख्येने थव्याची नोंद २०२३ मध्ये केली आहे. या स्थलांतरित पक्ष्याच्या आढळण्यामुळे अचकदानीच्या पक्षी वैभवात भर पडली आहे. **- प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे, पक्षी अभ्यासक, सांगोला**



पक्ष्यांना निसर्गातील हवामान बदलाचे जन्मजात ज्ञान असते. सध्या चक्रीवादळामुळे कमी दाबाचा पट्टा निर्माण होऊन होणाऱ्या हवामान बदलामुळे पक्ष्यांच्या स्थलांतरावरही परिणाम होत असल्याचे जाणवत आहे. स्वर्गीय नर्तक या पक्ष्याला आययूसीएन रेड लिस्टमध्ये सर्वात कमी चिंताजनक म्हणून सूचीबद्ध केले आहे. अधिवासाचा नाश, विखंडन आणि ऱ्हास, तसेच हवामान बदल हे प्रमुख घटक या पक्ष्यांच्या अस्तित्वासाठी संभाव्य धोके आहेत. **- प्रा.डॉ.विधीन कांबळे, पक्षी अभ्यासक, सांगोला**



## शहरातील रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि.१ नोव्हेंबर- शहरातील प्रमुख व अंतर्गत रस्त्यावर अतिवृष्टी व इतर कारणामुळे झालेल्या खड्ड्यामुळे शहरवासीयांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवा. अन्यथा कामगार सेना तीव्र आंदोलन करणार असा इशारा वजा निवेदन सोलापूर महानगरपालिका आयुक्तांना म हाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने देण्यात आले. निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात विठ्ठल कुराडकर, प्रसाद जगताप, गुरुनाथ कोळी, पप्पू शेख, अरुण सीडगिदी, रेखा अडकी, राधिका मीठ्ठा, स्वाती शिंदे, सविता दासरी, लक्ष्मी रच्चा, अंबव्वा मालपुरी, रामबाई माटेटी, लक्ष्मी गुंटला, पद्मा मंकल यांचा समावेश होता.

## दयानंद बिडवे भारतीय जनता पक्षाचे हाडाचे कार्यकर्ते : आ. कल्याणशेट्टी

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि.१ नोव्हेंबर- भाजपाचे एकनिष्ठ कार्यकर्ता दयानंद बिडवे हे शांत, संयमी व मितभाषी अजात शत्रू असलेले भारतीय जनता पक्षाचे हाडाचे कार्यकर्ते आहेत. गेल्या ३५ वर्षापासून भाजपात काम करत असले तरी त्यांनी पक्षाच्या हितासाठीच काम केलेले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी कधी काम केलेले नाही हे वाखाणण्याजोगे असल्याचे प्रतिपादन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस दयानंद बिडवे यांच्या वाढदिवसा निमित्त सुभाष गल्ली येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मनिप्र बसवलिंग महास्वामी, अक्कलकोट भाजपा शहराध्यक्ष शिवशरण जोजन, महेश हिंडोळे, यशवंत धोंगडे, मिलन कल्याणशेट्टी, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, वटवृक्ष देवस्थानचे प्रथमेश इंगळे, गुरुमाऊली महाम्मा पसारे, संतोष पराणे, अल्पसंख्याकचे नन्नू कोरबु, रजाक सय्यद उपस्थित होते. याप्रसंगी कांतु धनशेट्टी, नागराज कुंभार, राजकुमार थांब, श्रीकांत झिपरे, सुनील गोरे, अनिल लोकापुरे, प्रशांत लोकापुरे, शुभम बिडवे, शरण बिडवे, सचिन गडसिंग, शिवकुमार चनशेट्टी, अंकुश केत, अनिल वेदपाठक, अविनाश पोतदार, गुरुनाथ पोतदार, नितीन पोतदार, संतोष धिवारे, समर्थ पराणे उपस्थित होते.





## प्रमोद महाराज जगताप यांना वारकरी पुरस्कार जाहीर



पंढरपूर, दि. १ नोव्हेंबर- चैतन्यसद्गुरु तात्यासाहेब बाबासाहेब वासकर महाराज यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा वारकरी पुरस्कार प्रमोद महाराज जगताप यांना जाहीर झाला आहे. येत्या ३ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. वारकरी पंथाचे थोर सत्पुरुष चैतन्यसद्गुरू तात्यासाहेब बाबासाहेब वासकर महाराज यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी वारकरी पंथाची सेवा करणाऱ्या सेवानिष्ठ विभूतीला वारकरी पुरस्कार प्रदान केला जातो.

या पुरस्काराचे वितरण श्रीक्षेत्र पंढरीत सोमवार दिनांक ३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, महावस्त्र, श्रद्धानिधी असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्रीगुरु विठ्ठल महाराज वासकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि श्रीगुरु चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि.३ नोव्हेंबर) दुपारी दोन वाजता वासकर वाडा संतपेठ पंढरपूर येथे पुरस्कार वितरण होणार आहे.

## बार्शीच्या न्यू हायस्कूलमध्ये २० वर्षानंतर भरली शाळा; माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला ११ हजारांची ग्रंथसंपदा



तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १ ऑक्टोबर- शाळेच्या भिंतीवर वाचलेला सुविचार 'ग्रंथ हेच गुरु' प्रत्यक्षात उतरवण्याचे काम बार्शीतील न्यू हायस्कूल प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांनी केलं.

आपल्या शाळेसाठी ११ हजार रुपयांची पुस्तके, ग्रंथसंपदा भेट स्वरुपात देत विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साह आणि आठवणींच्या हिंदोळ्यात संपन्न झाला. तीच खोली, तेच मैदान, तोच बेंच, तेच मित्र आणि म झी शाळा... असा हा मित्रांचा स्नेहमेळावा तब्बल २० वर्षानंतर जुळून आला.

जुने दिवस, जुने मित्र आणि शाळेच्या गोड आठवणी', या सगळ्यांना उजाळा देण्यासाठी न्यू हायस्कूल, बार्शी येथे दहावी (२००५-०६) बॅचचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. तब्बल २० वर्षानंतर माजी विद्यार्थी पुन्हा एकत्र आले आणि आपल्या शाळेच्या अंगणात भेटून आनंदोत्सव साजरा केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते रावसाहेब मनगिरे. तसेच शाळेचे निवृत्त शिक्षक आणि विद्यमान शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांनी फेटा, पुष्पगुच्छ व छोटेसे रोप देऊन शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या स्नेहसंमेलनाला ८५ माजी विद्यार्थी उपस्थित होते.



## वारकऱ्यांची तहान भागवत आहेत 'स्वेरी'चे विद्यार्थी

**राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम**

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १ नोव्हेंबर- दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्तिकी वारीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणीच्या भेटीसाठी आतुर झालेल्या आणि दर्शन रांगेत तासन तास उभ्या असलेल्या वारकऱ्यांची तहान स्वेरीचे विद्यार्थी शुद्ध पाणी देवून भागवीत आहेत.

स्वेरीचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली इंजिनिअरिंगचे विद्यार्थी, विभागप्रमुख आणि प्राध्यापक वर्ग हे पाणी वाटप करत आहेत. स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांच्या हस्ते रिद्धी सिद्धी मंदिराजवळ या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी तसेच संस्थेतील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी पाणी वाटप करत आहेत. विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे, प्रा. महुवा बिस्वास या उपक्रमासाठी परिश्रम घेत आहेत. परंपरेप्रमाणे दर्शन रांगेतील वारकऱ्यांना आर.ओ. फिल्टर्ड पिण्याचे पाणी वाटपाचे कार्य नवमीपासून सुरु झाले. वारकऱ्यांच्या उपस्थितीत रिद्धी सिद्धी गणपती मंदिरालगत असणाऱ्या पत्राशेड मधील दर्शन मंडप रांगेतील वारकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी देण्याच्या कार्याला आज दशमीच्या दिवशी अधिक गती आली आहे. सकाळी ८ ते सायंकाळी ८ या वेळेत गोपाळपूर, रिध्दी-सिध्दी मंदिर व दर्शन बारी, पत्रा शेड या ठिकाणी प्राध्यापक व विद्यार्थी वारकऱ्यांना प्रचंड उत्साहाने आर.ओ.फिल्टर्ड पाण्याचे वाटप करत आहेत. नवमी, दशमी व एकादशी या तीनही दिवशी विद्यार्थी ग्लास, वॉटर जग आणि वॉटर टँकद्वारे पाणी वारकऱ्यांपर्यंत पोहचवून वारकऱ्यांची तहान भागवणार आहेत. स्वेरीकडून दररोज आठ ते दहा हजार लिटर पाण्याचे वाटप केले जात आहे. प्रत्येक दिवशी ४ प्राध्यापक व २५ विद्यार्थी दिवसभर मोफत शुद्ध पाणी वाटप करत आहेत.

# सहकार शिरोमणी कारखाना सभासद व कामगारांचे हिताचाच विचार करणार

**चेअरमन कल्याणराव काळे; सहकार शिरोमणी कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा**

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १ नोव्हेंबर- सहकार शिरोमणी साखर कारखाना चालु नये, तो बंद पाडण्यासाठी विरोधकांनी अपप्रचार, बदनामी, असे अनेक अडथळे आणले. शासकीय कार्यालयात तक्रारी दाखल केल्या. त्यामुळे कारखान्यास वेळेत निधी उपलब्ध झाला नाही. मात्र विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता सर्व सभासदांचे, कामगारांचे व या संस्थेवर उपजिविका करणाऱ्या कुटुंबियांचे हित डोळ्यासमोर ठेवून आर्थिक अडचणीतून मार्ग काढत ही संस्था मार्गक्रमण करीत असल्याचे कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांनी सांगितले.

तालुक्यातील भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सह. साखर कारखान्याची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी (ता.३१) चेअरमन कल्याणराव काळे यांचे अध्यक्षतेखाली कारखाना कार्यस्थळावर खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेत मार्गदर्शन करताना काळे बोलत होते. यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन भारत कोळेकर उपस्थित होते.





### चेअरमन काळे यांनी केले १२ मुद्यांचे निरसन

यावेळी उपस्थित सभासदांनी उपस्थित केलेल्या १२ मुद्याचे पुराव्यासह निरसन चेअरमन कल्याणराव काळे यांनी करुन उपलब्ध निधीचा ऊस बिल, तोडणी वाहतुक बिल, कामगार पगार इ. साठी केल्याचे सांगितले.

### एकमताने सर्व ठराव मंजूर

वार्षिक सभेतील विषय पत्रिकेतील सर्व विषयांस उपस्थित सभासदांकडून हात उंचावून एकमताने मंजुरी देण्यात आली. यावेळी सभासदांचे सुचनेनुसार ऐनवेळी आलेल्या विषयावरही सर्व सभासदांनी आवाजी एकमताने मंजुरी दिली. विषयाचे वाचन प्र.कार्यकारी संचालक पोपटराव घोगरे यांनी केले. कारखान्याचे संचालक युवराज दगडे यांनी श्रध्दांजली ठराव मांडला.

### संस्थेस आर्थिक नुकसान पोहचविणाऱ्यांचे सभासदत्व रद्द

ऐनवेळी कारखान्याचे सभासद रणजीत जाधव यांच्यासह इतर सभासदांनी संस्थेच्या हितास बाधा आणणाऱ्या, संस्थेस आर्थिक नुकसान पोहचविणाऱ्या सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याची मागणी केली. त्यास उपस्थित सर्व सभासदांनी आवाजी एकमताने मंजुरी दिली.

### नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात कारखाना होणार सुरु

सन २०२५-२६ गळीत हंगामामध्ये सुमारे सहा लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट असून, नोव्हेंबरचे दुसऱ्या आठवड्यात कारखाना सुरु करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने ऊस तोडणी वाहतुक यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असून, ऊस उत्पादक शेतकरी यांनी आपला संपूर्ण ऊस सहकार शिरोमणी कारखान्यास गळीतास देण्याचे आवाहन चेअरमन काळे यांनी केले.

## महत्वाचे...




### सोलापूर तालुका पोलीस ठाणेच्या वतीने रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धा

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

केंद्र सरकारच्यावतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिन म्हणुन साजरा केला जातो. केंद्रीय गृह मंत्रालयाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० जयंती निमित्त सर्व पोलीस ठाणेच्या स्तरावर रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्यावतीने अकोलेकाटी येथे ५ कि. मी. चे रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. 'रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धा करीता सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे, सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम व इतर अधिकारी व अंमलदार असे एकूण २० कर्मचारी, अकोलेकाटी येथील पोलीस भरती पुर्व प्रशिक्षणा मधील विद्यार्थी व विद्यार्थीनी व आसपासच्या २०० लोकांनी सहभाग नोंदविला. सहभाग नोंदविलेल्या विद्यार्थ्यांना पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी उज्वल भविष्या करीता मार्गदर्शन केले. पोलिस निरीक्षक देशपांडे यांनी रन फॉर युनिटी मॅरेथॉन स्पर्धा मध्ये स्वत: सहभाग नोंदवुन ५ कि.मी. चे अंतर धावुन पुर्ण केले. स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविलेल्या विद्यार्थी मधुन प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक निवडुन त्यांना पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे व सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम यांच्या हस्ते बक्षीस परितोषक वितरण करण्यात आले आहे. तसेच सहभाग नोंदविलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पदक देण्यात आले आहे.

### बारावीची परीक्षा १० फेब्रुवारीला तर दहावीची २० फेब्रुवारीला

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**



राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने येत्या फेब्रुवारी मार्चमध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केली आहे. त्यानुसार बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी पासून, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. दोन्ही परीक्षा १९ मार्च रोजी संपतील. प्रात्यक्षिक परीक्षा २३ जानेवारीपासून सुरू होतील. मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केलेल्या वेळापत्रक माहितीसाठी आहे, परीक्षेपूर्वी शाळा महाविद्यालयांकडे दिले जाणारे छापील वेळापत्रकच अंतिम असेल, अन्य समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या वेळापत्रकावर विश्वास ठेवू नये, असे राज्य शिक्षण मंडळांने कळविले आहे.

# भगवान श्रीदेवी भुदेवीसमेत श्री वेंकटेश्वर स्वामी दिव्यरथोत्सव उत्साहात

## सर्वत्र घुमला गोविंदा गोविंदा... वेंकटरमना गोविंदाचा जयघोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ नोव्हेंबर**

सोलापूर शहरातील पूर्व भागात असणाऱ्या श्री वेंकटेश्वर देवस्थान मध्ये गेल्या दोन दिवसांपासून श्री वेंकटेश्वर भगवान यांचा ब्रह्मोत्सव हा धार्मिक कार्यक्रम सुरू असून, शनिवारी सकाळी ब्रह्म मुहूर्तावर ५ .३० वाजता मुळमुर्ती अभिषेक , सकाळी ९.३० ते १२.०० होमहवन, पूर्णाहुती, हनुमान वाहन सेवा, अर्पण करण्यात आली. यावेळी मंदिरात गोविंदा हरी गोविंदा श्री व्यंकट रमणा गोविंदा... हा जयघोष दुमदुमला.

श्रीदेवी भुदेवी समेत श्री वेंकटेश्वर स्वामी दिव्यरथोत्सवास सायंकाळी साडेसहा वाजता मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. तत्पूर्वी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास श्री वेंकटेश्वर स्वामी रथोत्सव मिरवणुकीची तयारी सुरू करण्यात आली. तिर्थप्रसाद गोष्टी व सायं. ४, वाजता श्री श्रीदेवी भुदेवी समेत श्री वेंकटेश्वर स्वामी दिव्यरथोत्सवम मंदिरापासून मिरवणूक सोहळा मोठ्या उत्साही आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

दरम्यान, भगवंताची रथोत्सव मिरवणूक जोडबसवण्णा चौक, राजेंद्र चौक, कन्ना चौक, औद्योगिक बँक, मार्कंडेय चौक, भद्रावती पेठ, दत्त चौक, पद्मशाली चौक या मिरवणूक मार्गावरून पुन्हा मंदिराकडे संपन्न झाली. रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास महाआरती व प्रसाद वाटप कार्यक्रम संपन्न झाल्याची माहिती मंदिर समितीने दिली. यावेळी दक्षिणात्य मंगल वाद्यांच्या तालावर धार्मिक विधी आणि कार्यक्रम संपन्न होत असून भाविकांमध्ये उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण दिसून आले. मिरवणूक मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा भाविकांची गर्दी होती. श्रींच्या दर्शनासाठी प्रत्येक भाविक आसुसलेला होता. श्रींना पुष्प अर्पण करून अनेक भाविकांनी यथोचित दर्शन घेतले.



सोलापूर : पूर्व भागातील दाजी पेठेतील व्यंकटेश्वर देवस्थान मंदिरात रथोत्सव काढण्यात आला.

**श्री व्यंकटेश्वर देवस्थान मध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील ब्रह्मोत्सव तिरुमाला तिरुपती मंदिर समितीच्या दक्षिणात्य परंपरेनुसार सुरू आहे. हा धार्मिक उत्सव संपन्न करण्यासाठी दाक्षिणात्य पुजारी तसेच ब्रह्मरुंद सोलापुरात दाखल झाले आहेत. श्रींचा कल्याणोत्सव आणि रथोत्सव हा धार्मिक विधी दक्षिणात्य धार्मिक परंपरेनुसार संपन्न झाले. यावेळी सोलापूर शहरातील असंख्य भाविक रथोत्सव मिरवणुकीसाठी तसेच श्रींच्या दर्शनासाठी आवर्जून उपस्थित असल्याचे दिसून आले. तर आज ८१ कळशाभिषेक, संध्याकाळी गरुड वाहन पालखी सेवा संपन्न होणार आहे.**

# मानवी लैंगिक तस्करीवर प्रतिबंध करणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**

मानवी लैंगिक तस्करी वर प्रतिबंध करणे हे प्रत्येक नागरिकांची जबाबदारी असल्याचे मत प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व अर्ज फौंडेशन गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने मानवी लैंगिक तस्करी प्रतिबंध, काळजी व लढा या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी शर्मा बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर दिवाणी न्यायाधीश ओ. एस. पाटील, एस. एस. शिंदे, एम. बी. कुडते, श्रीमती. ए. एस. बिराजदार आदी न्यायाधीश व अर्ज फौंडेशन चे फॉउंडर अरुण पांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचा उद्देश समाजात संवेदनशिलता निर्माण करुन प्रत्येक नागरिकाने तस्करीविरुध्द आवाज उठवणे' हा सामाजिक संकल्प घ्यावा, असा होता. यावेळी सर्वांनी सुरक्षित समाज सन्मानाचे जीवन हा संदेश देत लैंगिक तस्करीविरोधी लढ्यात सक्रिय राहण्याची प्रतिज्ञा केली. या कार्यशाळेत सामाजिक कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, विधी सेवेचे पॅनल विधीज्ञ, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, महिला व बाल विकास विभाग, बाल न्यायमंडळ, सखी वन स्टॉप सेंटर आदीं सहभागी झाले होते. कार्यशाळेत अरुण पांडे यांनी भारतातील वाढती लैंगिक तस्करी, तिची कारणं, कायदेशीर तरतूदी (पोस्को, आयटीपीए) तसेच बळी पडलेल्या महिलांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजना या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. रुपेश पाठक लैंगिक तस्करी बाधित महिलांची मानसिकतेविषयी व सामाजिक भूमिकानविषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन ॲड. शिवकैलास झुरळे यांनी केले तर आभार डॉ. रुपेश पाठक यांनी मांडले.






# जामीन हा अधिकार नसून विवेकाधीन न्यायिक निर्णय

## ॲड. मिलिंद थोबडे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

जामीन हा अधिकार नसून विवेकाधीन न्यायिक निर्णय आहे आणि त्यात वकिलांची मांडणी अत्यंत निर्णायक ठरते, असे मत बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य ॲड. मिलिंद थोबडे यांनी व्यक्त केले.

सोलापूर बार असोसिएशनतर्फे सुरू असलेल्या विधी व्याख्यानमालेच्या ज्ञानसमृद्ध प्रवासाचा पाचवा टप्पा बार असोसिएशन हॉल येथे पार पडला. यावेळी ॲड. थोबडे हे बोलत होते.

ॲड. थोबडे यांनी लॉ रिलेटींग टू बेल या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी भारतीय दंड प्रक्रिया संहिता, संविधानातील व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्त्व आणि न्यायालयीन निर्णयांच्या माध्यमातून जामिनासंदर्भातील न्यायशास्त्राचा विस्तृत आढावा घेतला. असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी केले. सहसचिवा ॲड. मीरा प्रसाद यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्यांचे आभार मानले. यावेळी उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख, खजिनदार ॲड. अरविंद देडे उपस्थित होते.



**आदिला नदीवर पूल उभारण्याचे काम युद्ध पातळीवर**

**सोलापूर : पुणे महामार्गावर आदिला नदीवर पूल उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. शनिवारी टिपलेले छायाचित्र.**

# सोलापूर जिल्ह्यात बनावट खतावर कारवाई

## टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; कृषी विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

मे. रेवणसिद्ध ॲग्रो एजन्सी, मोडनिंबचे चालक रेवण तनपुरे यांच्या गोडाऊनमध्ये बनावट इफको, पी.पी.एल कंपनीच्या बॅगमधील १०:२६:२६ व १८:४६:०० (DP) रासायनिक बनावट खताचा साठा आढळून आला.

या खताचा पुरवठादार रामलिंग माळी, रा. बैरागवाडी व उत्पादक दीपक सस्ते, राहणार ढवळेवाडी, तालुका फलटण यांचे विरुद्ध राष्ट्रीयकृत इफको व पीपीएल सारख्या खत उत्पादन करणाऱ्या कंपनीच्या नावे विनापरवाना खते उत्पादन व विक्री करणे, साठवणुकी बाबतचा परवाना न घेणे, शासनाची व शेतकऱ्यांची दिशाभूल व फसवणूक केल्यामुळे खत नियंत्रण आदेश १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील विहित तरतुदींचे उल्लंघन केले आहे. माढाचे तालुका कृषी अधिकारी शरद गावडे यांनी टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केलाअसून पुढील तपास टेंभुर्णी पोलीस करत आहेत.



कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय भरारी पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीवरून विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गावसाने, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी हरीदास हावळे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बाळू बागल, मोहीम अधिकारी अजय वगरे , जिल्हा कृषी अधिकारी सागर बारावकर, शरद गावडे, प्रविण झांबरे, विलास मिस्किन, बार्शी, ईफको कंपनीचे प्रतिनिधी रवींद्र मोरे यांच्या उपस्थितीत कारवाई करण्यात आली.

# पंढरपूरचे माजी उपनगराध्यक्ष अरुण कंडरेसह नऊ जणांवर वाळू चोरीचा गुन्हा

## ▸ महसूल विभागाची कारवाई; १२ ब्रास वाळूसाठा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**



पंढरपूर शहरातील भीमा नदीपात्रातून स्वतःच्या आर्थिक फायदा करिता ५६ हजार रुपयांचा अवैध वाळूसाठा करून ठेवल्या प्रकरणी पंढरपुरातील माजी उपनगराध्यक्ष अरुण कंडरे, माजी नगराध्यक्ष सुभाष दादा भोसले यांच्यासह भोसले व कंडरे कुटुंबा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाई बुधवारी सायंकाळी साडेचार ते आठच्या सुमारास करण्यात आली आहे. यामध्ये अरुण कंडरे यांचे बंधू प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अजित कंडरे यांचा देखील समावेश आहे. नगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर विरोधकांना हा दणका मानला जातोय. महसूल प्रशासनाच्या या कारवाईने वाळू चोरी करणाऱ्यांमध्ये खळबळ माजली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर शहरातील भीमा नदी पात्रालगत असलेल्या २२७/१, ११३/४ या सर्व्हे नंबरच्या जमिनीमध्ये हेमंत वसंतराव भोसले, माजी नगराध्यक्ष सुभाष वसंतराव भोसले, मुकुंद वसंतराव भोसले, दीपक वसंतराव भोसले, श्रीनिवास मोहन यलमार (कंडरे), जालिंदर मोहन यलमार (कंडरे), दिलीप प्रल्हाद यलमार (कंडरे), माजी उपनगराध्यक्ष अरुण प्रल्हाद यलमार (कंडरे), प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक अजित प्रल्हाद यलमार (कंडरे) (रा. सर्व पंढरपूर) यांनी शासनाच्या संमतीचे विनापरवाना वाळू साठा करून ठेवला होता. या कारवाईत ३२ हजार रुपये त्यात एकूण ८ ब्रास वाळू, २४ हजार रुपये त्यात एकूण ४ ब्रास वाळू असे ५६ हजार रुपयांचा वाळू साठा जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली तलाटी अमर पाटील, सहाय्यक तलाटी महेश कुमार मारुती सावंत, गणेश पिसे यांच्यासह महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध सरकारतर्फे महसूल अधिकारी महेश कुमार मारुती सावंत यांनी बी एन एस कलम ३०५ (इ), ३ (५), सह गाऊन खालीच कायदा कलम ४(१), ४ (क) (१), २१ पर्यावरण रक्षण अधि.का. १९८६ चे कलम १५ प्रमाणे कायदेशीर तक्रार दिली आहेत. पुढील तपास पोलिस हवालदार पवार करत आहेत.

# अमरावती येथे अखिल भारतीय पक्षीमित्र संमेलनाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

यंदाच्या वर्षी ३८ वे महाराष्ट्र राज्य तथा तिसरे अखिल भारतीय पक्षिमित्र संमेलन अमरावती येथे वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या यजमानपदाखाली सुरू झाले. अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात १ आणि २ नोव्हेंबर दरम्यान होत असून या संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यास संमेलनाध्यक्ष म्हणून निवृत्त प्रशासकीय अधिकारी तथा मित्रा या राज्य नियोजन संस्थेचे अध्यक्ष प्रवीण परदेशी हे ऑनलाइन पध्दतीने जोडले गेले होते. तर उद्घाटक म्हणून प्रधान वन्यजीव संरक्षक श्रीनिवास रेड्डी, मुख्य अतिथी म्हणून अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी माजी महापौर मिलिंद चिमोटे, माजी संमेलनाध्यक्ष अनिल माळी, महाराष्ट्र पक्षी मित्रचे अध्यक्ष जयंत वडतकर, संमेलन आयोजन समितीचे अध्यक्ष तथा कार्यवाह महाराष्ट्र पक्षीमित्र डॉ. गजानन वाघ, स्वागताध्यक्ष डॉ अंजली देशमुख, सहसचिव डॉ. मंजुषा वाठ, उपाध्यक्ष श्रीकांत वऱ्हेकर आदी उपस्थित होते. या संमेलनासाठी संपूर्ण राज्यातून व राज्याबाहेरून किमान ३०० प्रतिनिधी या संमेलनासाठी उपस्थित होते.



संमेलनाध्यक्ष यांनी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. श्रीनिवास रेड्डी यांनी भविष्यात देखील अशा प्रकारच्या चळवळीस त्यांच्या वतीने भरघोस मदत करण्याचे त्यांनी जाहीर केले. महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी याप्रसंगी भविष्यात होऊ घातलेल्या पक्षी मित्र निवडणुकीचे संभाव्य उमेदवार यांची यादी जाहीर केली व अमरावतीकरांना या पक्षांना मतदान करून एका आगळ्यावेगळ्या निवडणुकीसाठी आव्हान केले. माजी महापौर मिलिंद चिमोटे यांनी आपल्या भाषणात कुठल्यातरी एका कारणासाठी स्वतःचे आयुष्य झोकुन देणाऱ्या अशा पद्धतीच्या पक्षी मित्रांचे कौतुक केले. वेक्स या संस्थेस २५ वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्ताने रानवेध या मासिकाचे विमोचन, सोबत अन्य पुस्तकांचे देखील विमोचनदेखील याप्रसंगी करण्यात आले. यावर्षीचा पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार संभाजीनगर येथील डॉ. दिलीप दिवाकर यार्दी यांना प्रदान करण्यात आला. इतर पुरस्कारांपैकी पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार अकोला येथील बाळ उर्फ जयदीप काळने यांना तर पक्षी जनजागृती पुरस्कार वाशिम येथील मिलिंद सावदेकर यांना, पक्षी संशोधन पुरस्कार वरुड (जि. अमरावती) येथील प्रतिक चौधरी यांना तर यावर्षीपासून नव्याने सुरुवात झालेला पहिला नवोदित पक्षिमित्र पुरस्कार साकोली (जि. भंडारा) येथील विकास बावनकुळे या नवोदित पक्षिमित्रास प्रदान करण्यात आला आहे. पक्ष्यांवर सातत्याने लिखाण करणाऱ्यास दिला जाणारा पक्षी विषयक साहित्य पुरस्काराची घोषणा सुद्धा यावेळी करण्यात आली. यावर्षीचा पक्षी साहित्य पुरस्कार सांगली येथील जेष्ठ पक्षी व पक्ष्यांच्या आवाजाचे तज्ञ शरद आपटे यांना तसेच भाईदर (जि. ठाणे) येथील डॉ. पराग नलावडे या दोन लेखकांना देण्यात आला. नवोदित शालेय विद्यार्थ्यांस दिला जाणारा स्व. विनोद गाडगीळ नवोदित पक्षिमित्र पुरस्कार पुण्याच्या सात वर्षिय अर्पित चौधरी यांस प्रदान करण्यात आला. संमेलनाच्या आधी छायाचित्र प्रदर्शन व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धांच्या विजयी उमेदवारांना देखील या प्रसंगी सन्मानित करण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर • दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## घरकुलाची कामे प्राधान्याने पूर्ण करून सोलापूर जिल्हा राज्यात अग्रणी ठेवा : अतिरिक्त सीईओ कोहिणकर

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**
मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामध्ये आपल्या जिल्हयातील ग्रामपंचायतीचा राज्यात पहिल्या क्रमांक मिळवणे हे अंतिम ध्येय असून यासाठी जिल्हा प्रशासन सहकार्य करण्यास तयार आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे संकल्पनेतील या अभियानात सोलापूर जिल्हा राज्यात अग्रभागी ठेवा. यासाठी जिल्ह्यातील घरकुलांची कामे प्राधान्याने पुर्ण करा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी केले. जिल्ह्यात दोन टप्यात एक लाखापेक्षा अधिक घरकुल मंजूर झाली आहेत.



अतिवृष्टी, महापूर व इतर अनेक कारणांनी घरकुलची कामे प्रलंबित आहेत. दिवाळी सणामुळेही घरकुल बांधकाम बंद होते. लाभार्थ्यांना पहिला व दुसरा हप्त्याचेही वितरण करण्यात आले आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी जलद गतीने बांधकाम पूर्ण करावे. आता सर्व अधिकारी व लाभार्थ्यांनी घरकुलची कामे पूर्ण करून राज्यात अग्रणी ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही कोहीणकर यांनी केले.

## ▶▶ महत्वाचे...

### हैद्राबाद रोडवरील अपघातात वृध्दाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**
हैद्राबाद रोडवर रस्ते अपघातात अनोळखी वृध्दाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली.अपघातात मयत झालेल्या व्यक्तीची ओळख पटलेली नाही. १ नोव्हेंबर रोजी पहाटे एकच्या सुमारास हैद्रबाद ते सोलापूर रोडवरील नुर हॉटेलसमोरील रस्ते अपघातात जखमी होऊन बेशुध्द पडलेल्या वृध्दास एमआयडीसी पोलिस ठाण्यातील हवालदार डी जी नवले यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. त्यावेळी उपचारापूर्वीच त्या अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे डॉ. शितलकुमार यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली.

### पाणी समजून ॲसिड पिल्याने दोघे उपचारासाठी दाखल

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**
शहरात वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या घटनांमध्ये पाणी समजून ॲसिड पिल्याने दोघांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गोरखनाथ लक्ष्मण शिंगाडे (वय ५६, रा. कृष्णमंदीरजवळ, अशोक चौक, सोलापूर) यांनी १ नोव्हेंबर रोजी पहाटे अडीचच्या सुमारास राहत्या घरी झोपेतून उठून पाण्याच्या बाटलीत ठेवलेले ॲसिड पाणी समजून पिल्याने त्यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जानवी लिंबाजी कांबळे (वय १६, रा. नान्नज, ता. उत्तर सोलापूर) हिने १ नोव्हेंबर रोजी दुपारी घरी पाणी पिण्याच्या प्लास्टीक ग्लासमध्ये पाणी असल्याचे समजून फिनेल प्राशन केले. त्यामुळे तिला त्रास होऊ लागल्याने काका प्रशांत यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. या दोन्ही घटनांची नोंद सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शेतीच्या वादातून मारहाण

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**
शेतीच्या वादातून शिरपनहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे वृध्देस मारहाण करून जखमी करण्यात आले. कल्याणी दत्तात्रय पाटील (वय ६९, रा. शिरपनहळ्ळी) असे जखमी वृध्देचे नाव आहे. ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी कल्याणी पाटील यांना त्यांच्या स्वतःच्या शेतात शेतीच्या रस्त्याच्या वादातून सोमनाथ शिवानंद पाटील, शिवानंद गौरीशंकर पाटील व इतर एक जणांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून ढकलून दिले. त्यामध्ये कल्याणी पाटील यांच्या सर्वांगास मुका मारल लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



पंढरपूर : रविवारी साजरा होणाऱ्या कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी दुपारी चंद्रभागेच्या वळवंटात वारकऱ्यांची गर्दी झालेले ड्रोनच्या माध्यमातून काढलेले छायाचित्र सोलापूर ग्रामीण पोलिसांकडून उपलब्ध करून देण्यात आले.

# चंद्रभागा वाळवंटासह पंढरपुरातील रस्ते गेले फुलून

- **कार्तिकी यात्रा : पावसामुळे भाविकांच्या संख्येत कमालीची घट**
- **विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनासाठी लागताहेत पाच ते सहा तासांचा कालावधी**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. १ नोव्हेंबर-**
विठ्ठल नाद विठ्ठल भेद । विठ्ठल छंद विठ्ठल ।। विठ्ठल सुखा विठ्ठल दु:खा । तुक्या मुखा विठ्ठल ।। या संत वचना प्रमाणे कार्तिकी एकादशीच्या अनुप्यम्य सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी राज्याच्या कानाकोऱ्यातून तसेच शेजारील कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि मध्यप्रदेशा मधून रेल्वे, एसटी तसेच खासगी वाहनांमधून मोठ्या संख्येने भाविक येथे दाखल होवु लागले आहेत. विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनासाठी पाच ते सहा तासांचा कालावधी लागत आहे.

यावर्षी राज्याच्या विविध भागात मोठ्या प्रमाणावर पाऊस तसेच पूरपूरिस्थी निर्माण झालेली होती. विशेष म्हणजे अजूनही काही भागात पाऊस सुरुच आहे. त्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांबरोबरच पावसाचा शहरातील नागरिकांना देखील मोठा फटका बसलेला आहे. त्यामुळे यावर्षी कार्तिकी यात्रेसाठी येणाऱ्या वारकऱ्यांची संख्या खूपच रोडावल्याचे दिसत आहे.

कार्तिकी एकादशीचा सोहळा याचि देही याची डोळा अनुभविण्यासाठी शनिवारी नवमीच्या दिवशी मोठ्या संख्येने येथे भाविक दाखल होवू लागलेले आहेत. भाविकांच्या गर्दीमुळे पंढरीनगरी फूलून गेलेली आहे. बोला पुंडलिक वरदे हरि विठ्ठल आणि सावळ्या विठुनामाच्या जयघोषामुळे पुण्यनगरी असलेली पंढरी भक्तीरसात चिंब झालेली आहे.

शहरातील मठ, धर्मशाळा तसेच मंदिर परिसरातील चिंचोळ्या गल्लीमधील मोठ्या वाड्यांमधून आणि चंद्रभागेच्या विस्तीर्ण वाळवंटा बरोबरच पैलतिरावरील पासष्ठ एकर परिसरात वारकरी विठ्ठल भक्तीत लीन होवून भजन, कीर्तन आणि प्रवचना सारख्या कार्यक्रमातून भाविक दंग झालेले दिसत आहेत. दरम्यान विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग तसेच शहरातील अन्य मार्गा बरोबरच प्रमुख असलेल्या स्टेशन रस्त्यावर प्रासादिक वस्तु, सोलापूर चादरी, घोंगडी, फोटोफ्रेम, देवदेवतांच्या मुर्ती अशा दुकानांमधून भाविकांची गर्दी दिसत आहे.

पदस्पर्श दर्शना बरोबरच विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने विठ्ठलाच्या मुखदर्शनाची देखील चांगली व्यवस्था केलेली आहे. येथील गोपाळपूर रस्त्यावरील पत्राशेड मधील चार ते पाच गाळे दुपारी भरल्याचे दिसत होते. त्यामुळे विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन घेण्यासाठी भाविकांना पाच ते सहा तासांचा कालावधी लागत आहे.

### उड्डाणपुलामुळे मुखदर्शन रांगेत सुसुत्रता

मुखदर्शनाच्या रांगेत देखील सुसुत्रता यावी यासाठी मंदिर समितीच्या वतीने शहरातील संभाजी चौक परिसरात लोखंडी उड्डाणपुल उभारण्यात आलेला आहे. या उड्डाणपुलामुळे प्रदक्षिणा रस्त्यावरुन ये जा करणाऱ्या भाविकांना मुखदर्शन रांगेचा त्रास जाणवत नाही. या बरोबरच मुखदर्शनाच्या रांगेत विस्कळीतपणा न येता दर्शन रांगेत सुसुत्रता राहिल या बाबतची काळजी मंदिर प्रशासनाकडून घेण्यात आलेली दिसत आहे.

### शहराला पोलिसी छावणीचे स्वरुप

चंद्रभागा वाळवंट, पासष्ठ एकर परिसर, मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, पदस्पर्श दर्शन रांग, गोपाळपूर रस्त्यावरील पत्राशेड आदी परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. या वर्षी देखील जिल्हा पोलिस प्रमुखांच्या संकल्पनेतून साकारलेल्या तिर्थक्षेत्र पोलिसिंग उपक्रमा अंतर्गत शहरात चार ते पाच ठिकाणी मदत केंद्रांचे टेंट लावण्यात आलेले आहेत. या केंद्रामध्ये नियुक्त करण्यात आलेल्या पोलिसांकडून तसेच पोलिस मित्रांकडून वारकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

### यात्रेतील भाविकांची संख्या रोडावली

कार्तिकी यात्रेसाठी राज्याच्या विविध भागांसह विशेषत: कोकण, मुंबई या भागातून वारकरी मोठ्या संख्येने येथे येत असतात. मात्र यावर्षी परतीच्या पावसाने मुंबई,कोकणासह राज्याच्या विविध भागात मोठ्या प्रमाणावर धुमाकुळ घातला. त्यामुळे अनेक भागात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्याचा देखील फटका वारकरी यात्रेसाठी येण्यावर झाल्याचे जाणवत आहे.

# ॲडव्हेंचर पार्क झाले चकाचक; पासपोर्ट ऑफिस परिसराचे काय?

## ▶▶ पासपोर्ट काढण्यासाठी परगावहून आलेल्या नागरिकांना होते सोलापूरच्या बेघरांचे दर्शन





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**
राज्यातील नामांकित शहरांमध्ये सोलापूर शहराचे नाव जोडले जाते. यापूर्वी रेल्वेचे डीआरएम ऑफिस आहे. डाक विभागाचे विभागीय पोस्ट कार्यालय आहे. मुंबई आणि गोवा अशी विमानसेवा सुरू झाली आहे. सोलापूर शहरात पासपोर्ट ऑफिस असल्याने, सोलापूरसह कोल्हापूर, पुणे, मुंबई, सातारा, सांगली, विविध जिल्ह्यातील नागरिक पासपोर्ट काढण्यासाठी सोलापूर शहरात येत आहेत.

तेव्हा पासपोर्ट कार्यालयसमोर आल्यानंतर परजिल्ह्यातून आलेल्या नागरिकांना सोलापूरच्या बकाल बेघरांचे दर्शन घडत आहे. पासपोर्ट ऑफिससमोर बसणाऱ्या बेघरांची वाढत चाललेल्या संख्येमुळे सोलापूरचे धार्मिक महत्त्व मातीमोल होत चालले आहे. याकडे प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असून सोलापूरवासीयांनीच यावर आता तोडगा काढावा असा सूर ऐकण्यास मिळत आहे.

दरम्यान, पासपोर्ट ऑफिस सोलापुरात असल्याने सोलापूर जिल्ह्याच्या आसपासच्या जिल्ह्यातील अनेक नागरिक सोलापुरात पासपोर्ट काढण्यासाठी दाखल होतात. पासपोर्ट काढण्याच्या निमित्ताने आलेल्या नागरिकांना सोलापूरच्या धार्मिक तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे अनेक भाविक धार्मिकस्थळी भेट देत असल्याची संख्या वाढत आहे. त्यामुळे सोलापूरमधील धार्मिक क्षेत्रांचा विकास होत आहे. अशा विकासाच्या परिस्थितीमध्ये सोलापूर शहरात बेघर आणि इतरत्र फिरणाऱ्या भिक्षेकरुंची संख्या देखील दिवसागणिक वाढत आहे. त्यांच्या दयनीय अवस्थाकडे पाहिले असाता, परजिल्ह्यातील आलेल्या नागरिकांचा हिरमोड होताना दिसत आहे.

### ✔ सोलापूरच्या विकासाला हे बाधक ठरत आहे

सोलापूर शहरातील अनेक दानशूर व्यक्ती आणि संस्था अशा बेघर आणि भिक्षेकरु लोकांना जेवण आणि पाणी मोफत आणून देतात. त्यामुळे निर्ढावलेल्या या बेघरांना कष्ट करण्यापेक्षा आयते जीवन जगण्याची तसेच व्यसन करण्याची सवय जडत आहे. पासपोर्ट काढण्याच्या निमित्ताने परजिल्ह्यातील अनेक नागरिक देवस्थानस भेटी देत असल्यामुळे सोलापूरच्या धार्मिक पर्यटनचा विकास होत आहे. दुसरीकडे मात्र बेघर आणि भिक्षेकरु यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने सोलापूरच्या विकासाला बाधक ठरत आहे.

**- सचिन शिंदे, सामाजिक कार्यकर्ते**

### ✔ ॲडव्हेंचर पार्क चकाचक पासपोर्ट ऑफिस कधी?

सोलापूर शहरात तयार झालेले एडवेंचर पार्क गेल्या अनेक दिवसापासून धुळखात पडून होते. हे एडवेंचर पार्क तयार करण्यासाठी महापालिकेने लाखोंची रक्कम खर्च केली. अखेर अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर एडवेंचर पार्क परिसर चकाचक झाले असून, हे पार्क नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे. मात्र याच एडवेंचर पार्कच्या शेजारीच असणाऱ्या पासपोर्ट ऑफिसची अवस्था बकाल झाली आहे. मात्र येथे बेघर तसेच भिक्षेकरूंची संख्या असल्याने एडवेंचर पार्क चकाचक झाल्यानंतर पासपोर्ट ऑफिस कधी चकाचक करणार आहे.

**- मयुर गवते, सामाजिक कार्यकर्ते**

# विद्यार्थ्यांच्या मनातील गणित, विज्ञान विषयाची भीती दूर होणार

- **डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान अध्ययन समृध्दी कार्यक्रम**
- **जिल्ह्यातील ५ लाख विद्यार्थ्यांना फायदा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**
गणित व विज्ञान विषयातील विद्यार्थ्यांचे पायाभूत ज्ञान दृढ करण्याच्या उद्देश्याने शासनामार्फत डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान अध्ययन समृध्दी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील पाच लाख विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. जिल्हा परिषदेसह सर्व माध्यमांच्या खासगी व शासकीय शाळांमध्ये कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम महाराष्ट्र सरकारचा उपक्रम आहे. राज्यातील शाळांमध्ये गणित व विज्ञानाच्या शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी खान अकादमीच्या सहायाने राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर त्यांना डिजीटल स्वरूपात दर्जेदार शैक्षणिक सामग्री उपलब्ध करून देणे आहे. सर्व शाळांमधील गणित व विज्ञान शिक्षकांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून वेबिनार आयोजित केले जाणार आहेत.




### गणित व विज्ञान विषयात पारंगत होण्यासाठी मदत

समृध्दी कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये गणित व विज्ञान विषयासंबंधी कुतुहल व महत्वकांक्षा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. यामुळे विद्यार्थी गणित व विज्ञान विषयात पारंगत होण्यासाठी मदत होणार आहे. यासाठी शिक्षकांचे वेबिनार आयोजित करण्यात येत आहेत.

**- सचिन जगताप,**
**माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर**

### विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणासाठीही लाभ

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गणित व विज्ञान विषयासंबंधी भीती आहे. समृध्दी कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये गणित व विज्ञान विषयाची भीती दूर होणार आहे. शिवाय विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणासाठीही लाभ होणार आहे.

**- रवीराज खडाखडे,**
**शिक्षक सहकार संघटना, पुणे विभगीय अध्यक्ष**

### विषयांमध्ये आवड निर्माण होणार

राज्य सरकारच्या समृध्दी कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये गणित व विज्ञान विषयासंबंधी आवड निर्माण होण्यास मदत होईल. त्यामुळे या विषयाकडे विद्यार्थ्यांमध्ये अधिक आकर्षण तयार होणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचे शिक्षकांमधून स्वागत आहे.

**- धोंडीबा केवटे,**
**शिक्षक, टाकळी, दक्षिण सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १२५४

**माझा मराठाचि बोलु कौतुकें ।**
**परि अमृतांतेही पैजासी जिंके ।**
**ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ।।**

संस्कृत भाषेतील गीतारुपी ज्ञानाचा ठेवा मराठी भाषेत सांगणे तसे अत्यंत कठीण काम आहे. पण हे कठीण काम माऊलींनी अत्यंत सुलभपणे पुर्ण करुन दाखविले आहे. प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, नम्रपणा, लडिवाळपणा हे माऊलीकडून शिकण्यासारखे गुण आहेत. आपलीच भाषा आपणाला शिकवायची म्हणजे साधी गोष्ट नाही. आज आपण आपल्या मायबोलीत दोन ओळी सुध्दा शुध्द बोलू शकत नाही. या भाषेत चार दोन तरी दुस-या भाषेतील शब्द येतातच.



शुध्द पदार्थ जसा बाजारात मिळणे कठीण झाले आहे, तसे आपल्या मराठी भाषेचे झाले आहे भेसळयुक्त पदार्थाप्रमाणे मराठी भाषा आपण भेसळयुक्त केली आहे. या भेसळीस आपणच जबाबदार आहोत. हे सर्व सत्य असतांनाही मराठी भाषेवर अतोनात प्रेम असलेले ज्ञानीयांचे राजे, ज्ञानेश्वर माऊली मराठी भाषेतून हा गीतार्थ कसा सांगेन हे सांगतांना म्हणतात, माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतांतेही पैजासी जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ।। अर्थात, मराठी शब्दाची रचना अशा पध्दतीने करेन की, ते शब्द सहजपणाने, कौतुकाने अमृतालाही आव्हान देऊन जिंकतील. अमृतापेक्षाही माझ्या मराठी शब्दाचा गोडवा जास्त चांगला आहे. असे माऊली म्हणतात.

मराठी भाषेची महती सांगतांना माऊली म्हणतात की, मराठी भाषेचे शब्द असे आहेत की, ज्याच्या मृदुपणाच्या तुलनेने सप्तसुरापासून निर्माण होणा-या नादलहरींचा मृदुपणा कमी प्रतीचा वाटेल आणि शब्दाच्या आकर्षणाने सुवासाचे सामर्थ्य नाहीसे होईल. मराठी शब्दाच्या रसाळपणाची महती अशी आहे की, त्यावर लुब्ध होऊन कानांनाही जिभा फुटतील आणि इंद्रियांमध्ये रसाळपणाच्या हक्कावरुन कलह सुरु होईल. प्रत्यक्षात शब्द हे श्रवणेंद्रियाचा विषय असले तरीही जिभेला त्याचा रस घ्यावा वाटेल. नाकाला शब्दातील सुगंधाचा अनुभव येईल. शब्द बोलत असतांना ओवीतील सुंदर रेखीव शब्दचित्राची ओळ पाहून डोळयांना लावंण्याची खाण उघडल्याची जाणीव होईल. जेव्हा संपुर्ण पद रचले जाईल, तेव्हा श्रोत्यांचे मन बाहेर धाव घेऊ लागेल आणि आपल्या दोन्ही बाहुंनी शब्दांना अलिंगन देण्यासाठी आतुर होईल. अर्थात, प्रत्येक इंद्रिये आपआपल्या परिने शब्दाचा आनंद घेतील. अशा प्रकारे शब्द रचना मी मराठी भाषेत करीन. असे माऊली सांगत आहेत. आपण मराठी भाषा बोलतो, तेव्हा समोरच्याचे कान तरी आपल्या बोलण्याशी एकरुप होतात का ? असा प्रश्न आपण आपणाला विचारायला हरकत नाही. मराठी भाषेत एवढा गोडवा असतांनाही, आपले बोलणे कोणी का ऐकत फफटळ? आपण मराठी शब्दांची योग्यत्याप्रकारे रचना करण्यास कमी पडतो काय ? याचाही विचार आपण करणे आवश्यक आहे. लहानपणापासून या मायबोलीत वावरत असतानाही, आपणाला आपल्या भाषेबद्दल प्रेम वाटू नये म्हणजे आश्चर्यच आहे. आपल्या मातृभाषेत आपण निपुण असलो पाहिजे. आपली मातृभाषा बोलतांना आपल्यावर दुस-या भाषेचे शब्द घुसडण्याची वेळ का यावी. दुस-या अनेक भाषांचे शब्द आपल्या डोक्यात असे चिकटून बसले आहे की त्यांना बाहेर काढून शुध्द मराठी भाषेत बोलणे आपणाला कठीण जाते. आपल्या मातृभाषेबद्यल आपणाला अभिमान, गर्व वाटलाच पाहिजे. आपली मातृभाषा आपणाला पुर्णपणे व उत्कृष्टपणे आलीच पाहिजे.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - |
| दि. २ नोव्हेंबर २०२५ | तुलसी विवाहारंभ, |
| विक्रम संवत् २०८२ | प्रबोधिनी भागवत एकादशी. |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - कार्तिक | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. एकादशी (०७.३३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र- पू.भाद्रपदा (१७.०३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्याघ्यात (२३.१०) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१८.२४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |




## लोकमंगल कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ अमोल शिंदे हे लाभले होते. कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थी प्रतिनिधींच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक द्वितीय वर्षातील विद्यार्थी विशाल कल्याणकर याने केले. प्रा. अजित कुरे यांनी कृषी शिक्षणातून आत्मनिर्भर भारताच्या संपन्नतेसाठी सरदार वल्लभाई पटेल यांच्या विचारधारेवर आधारित एकतेचे महत्व विशद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अमोल शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना एकीचे महत्व विविध उदाहरणासह मांडले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकता दिनाची शपथ विद्यार्थी प्रतिनिधी निखिल म्हमाने याद्वारे देण्यात आली. सूत्रसंचालन व आभार विशाल कल्याणकर याने केली. कार्यक्रमास प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

# शुक्रवारी पाच हजार विद्यार्थी सामुहिकपणे म्हणणार वंदे मातरम्

## सोलापूर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या वतीने उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

बंकिमचंद्र चटर्जी लिखित ऐतिहासिक वंदे मातरम गीताच्या लिखाणास १५० वर्षे पूर्ण झाल्या निमित्त शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या (आयटीआय) वतीने शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता सोलापुरातील होम मैदानावर आयटीआयसह विविध शाळांमधील ५ हजार विद्यार्थी सामूहिकपणे वंदे मातरम म्हणणार आहेत, अशी माहिती आयटीआय शासकीय समितीचे सदस्य दशरथ वडतिले यांनी पत्रकार परिषदेत दिली.


वंदे मातरम या गीताने प्रेरित होऊन हजारो भारतीयांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभाग नोंदविला होता. स्वातंत्र्य लढ्याला नवी प्रेरणा मिळाली होती. या प्रेरक गीतास १५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त सोलापूर शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुली), डफरीन चौक या दोन्ही संस्थांच्या वतीने हा एकत्रित कार्यक्रम आयोजित केला आहे. होम मैदानावर सकाळी ९.३० वाजता या कार्यक्रमास पथनाट्याने सुरुवात होणार आहे. त्यानंतर दैनिक तरुण भारतचे माजी संपादक अरविंद जोशी यांचे व्याख्यान होणार आहे. दरम्यान, उपस्थित सर्व विद्यार्थी सामूहिक वंदे मातरम म्हणणार आहेत. यावेळी पाच कडव्यांचे संपूर्ण वंदे मातरम सादर करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सोलापूर शहरातील हरीभाई देवकरण प्रशाला, ज्ञानप्रबोधिनी प्रशाला, मेहता प्रशाला, सोनामाता प्रशाला, श्री सिद्धेश्वर हायस्कूल, छत्रपती शिवाजी हायस्कूल आदींसह विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर एनसीसी आणि एनएसएस या विद्यार्थ्यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे, असे सदस्य दशरथ वडतिले यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस सूर्यकांत झंजिरे, बालाजी माळी, भीमाशंकर कोंडगुळे, सिद्राम गोलेकर, प्रदीप दराडे, विजय भांगे आदी उपस्थित होते.

# महावितरण आता अत्याधुनिक

## सर्व सेवा ऑनलाइन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

वीजग्राहकांना दर्जेदार व तत्पर सेवा देण्याच्या दिशेने महावितरणने महत्त्वाचे निर्णय घेत वीजबिलावरील ग्राहक नावातील बदल करण्याच्या ऑनलाइन अर्जांना आता स्वयंचलित मंजुरी देण्यास सुरुवात केली आहे. यामुळे ग्राहकांना घरबसल्या, जलद आणि पारदर्शक सेवा मिळणार असून, पूर्वी एक महिना लागणारी ही प्रक्रिया आता केवळ तीन ते सात दिवसांत पूर्ण होणार आहे, अशी माहिती महावितरणच्या जनसंपर्क विभागाकडून दिली आहे.



दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या डिजिटल सेवेत ग्राहकाभिमुख बदल करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी वीजबिलातील नावबदल अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्याचा निर्णय घेतला. यासाठी नव्याने विकसित केलेली ऑनलाइन प्रणाली आता कार्यान्वित झाली आहे. या नव्या प्रणालीमुळे ग्राहकांना कार्यालयीन फेऱ्यांची गरज न पडता घरबसल्या सेवा मिळणार आहे. यामुळे वेळ, श्रम व खर्च वाचणार आहे.

**असा करा नावात बदल**

घर, दुकान किंवा इतर मालमत्तेच्या खरेदी-विक्री,वारसा हक्क अथवा इतर कारणांमुळे मालकीत बदल झाल्यानंतर वीजबिलावरील ग्राहक नावात बदल करण्याची आवश्यकता निर्माण होते. यासाठी महावितरणच्या मोबाईल ॲप किंवा www. mahadiscom. in या संकेतस्थळावर लॉग-इन करून ग्राहकांना ऑनलाइन अर्ज सादर करता येतो. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे अपलोड करून व प्रक्रिया शुल्क भरल्यावर ही कार्यवाही सुरू होते.

**वीजभारवाढीच्या अर्जांना मंजुरी**

महावितरणने याआधी लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीजभार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यास प्रारंभ केला होता. गेल्या महिन्यात २४६० औद्योगिक व ४१६४ इतर ग्राहकांनी एका क्लिकवर वीज भारात तब्बल २२ हजार किलोवॉटने वाढ केली आहे.

# ‘लोकमंगल’च्या विद्यार्थ्यांचा हैदराबाद येथे अभ्यास दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांचा हैदराबाद येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता.




या अभ्यास दौऱ्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट रिसर्च, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ऑईलसिड रिसर्च, नॅशनल ब्युरो ऑफ प्लँट जेनेटिक रिसर्च आदी राष्ट्रीय संशोधन संस्थांना भेट दिली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ऑईलसिड रिसर्च येथे वरिष्ठ संशोधक डॉ. मंगेश दुधे यांनी विद्यार्थ्यांना विविध तेलबियांविषयी (सूर्यफूल, जवस, एरंड, करडई) व त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञान याविषयी माहिती सांगितली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ऑईलसिड रिसर्च येथे विद्यार्थ्यांनी कृषीजैवतंत्रज्ञान विभाग, वनस्पती ऊती संवर्धन विभाग, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग आदी विभागांना भेट देऊन तेथील प्रगत तंत्रज्ञानाची माहिती घेतली. यासोबत विद्यार्थ्यांनी न्यूट्रीहब नावाच्या व्यवसाय विकास सेवा प्रकल्पाची माहिती जाणून घेतली. यासाठी वरिष्ठ संशोधक डॉ. संदीप कुमार व डॉ. प्रशांत कुमार यांनी मार्गदर्शन केले.

या भेटीत विद्यार्थ्यांनी बिर्ला मंदिर, एन टी आर. गार्डन, गोवळकोंडा किल्ला, चारमिनार, चौमाला पॅलेस, लुंबिनी पार्क, स्नो वर्ल्ड आदी पर्यटनस्थळांना भेट दिली. या सहलीसाठी प्रा. सायली बडेकर यांचा सहभाग होता. या सहलीसाठी प्राचार्य सागर महाजन यांचे मार्गदर्शन लाभले.




## सहस्त्रार्जुन प्रशालेत श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन महाराज जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

भवानी पेठ येथील सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलात क्षत्रिय समाजाचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख अतिथी हैद्राबाद भारतीय वायू सेनेतील उड्डाणं प्रमुख शिवप्रिया श्रीगिरी व सहस्त्रार्जुन शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर यांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून पूजन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, संस्थेचे सदस्य शिरीषसा कोल्हापुरे, गणेश दामजी, श्रीरामसा पवार, संजीवसा रंगरेज, भरतकुमार शालगर, शैक्षणिक संस्थेचे सदस्य अनिलसा रंगरेज यांच्यासह समाजबांधव ज्ञानेश्वर पवार, प्रशालेचे मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सविता हातवळणे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख अतिथी शिवप्रिया श्रीगिरी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना महाराजांच्या पराक्रमावर, त्याग, दानशीलता व समाजहितासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली महाराजांच्या जीवनावर आधारित माहितीपट सादर करून त्यांचा इतिहास आणि समाजातील योगदान उलगडून दाखवले.

## मध्य रेल्वेच्या विभागाच्यावतीने राष्ट्रीय एकता दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनी आयोजित एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारे अनेक कार्यक्रम आयोजित केले. सकाळी डीआरएम कार्यालय ते सोलापूर रेल्वे स्थानकापर्यंत रन फॉर युनिटी आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात विभागीय क्रीडा संघटनेचे सदस्य, भारत स्काउट्स अँड गाईड्सचे स्वयंसेवक, आरपीएफ आणि इतर रेल्वे कर्मचाऱ्यांचा उत्साही सहभाग दिसून आला.



सोलापूरचे अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार यांनी या रन फॉर युनिटीला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी देखील या कार्यक्रमात सहभागी झाले होते. एकता आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश पसरविण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तदनंतर डीआरएम कार्यालयात राष्ट्रीय एकता दिनाचा शपथविधी समारंभ आयोजित करण्यात आला.

## महापालिकेच्या वतीने इंदिरा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त इंद्रभूवन आवारातील त्यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात स्वर्गीय श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



तसेच सरदार वल्लभाई पटेल यांच्या जयंतीदिनानिमित्त कॉन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, सचिन पोरे, सिद्धू तिमीगार, अशोक खडके उपस्थित होते.




## सिंहगड महाविद्यालयात भ्रष्टाचाराविरुद्ध शपथ


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

केगाव येथील एन.बी.एन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात सतर्कता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. यानिमित्त जागरूक नागरिक - भ्रष्टाचारमुक्त भारत या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या नेतृत्वाखाली आणि प्राचार्य डॉ. एस. डी. नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. माणिक टी. शिंदे, ओंकार सुरवसे, चेतन मेहत्रे यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून महेंद्र माने, प्रा. एस. एच. क्षीरसागर उपस्थित होते.

या कार्यक्रमादरम्यान प्राचार्य डॉ. नवले यांनी विद्यार्थ्यांना भ्रष्टाचाराविरुद्ध सतर्क राहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी महाविद्यालयात भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आणि देशाच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त एक विशेष कार्यक्रमही आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ. नवले यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून दोन्ही महान नेत्यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांनी सांगितले की सरदार पटेल यांनी देशाच्या एकात्मता आणि प्रशासनिक सुदृढतेसाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे, तर श्रीमती इंदिरा गांधी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे देशाच्या प्रगतीला नवीन दिशा मिळाली. कार्यक्रमाचे सर्व नियोजन व देखरेख डॉ. एस. एच. शिरसगार यांनी केली. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. आभार ओंकार सुरवसे यांनी केले.

## फलटणची महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरण; स्त्रीच्या अस्तित्वावर उठलेले प्रश्न






सातारा जिल्ह्यातील फलटण येथे नुकत्याच घडलेल्या महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. समाजातील सुशिक्षित, संवेदनशील आणि सेवाभावी क्षेत्रात काम करणाऱ्या एका तरुण डॉक्टरने स्वतःचा जीव घेतल्याची ही घटना केवळ एक व्यक्तिगत दुःखद घटना नाही, तर ती आपल्या सामाजिक व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या विषारी मानसिकतेचा आरसा आहे. महिला जगत या संकल्पनेचा विचार करताना ही घटना आपल्या समाजाच्या प्रगतीचा आणि स्त्री समानतेच्या लढ्याचा एक कठोर सामाजिक वारसा म्हणून समोर येते.

फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका तरुण महिला डॉक्टरने आत्महत्या केली. तिच्या हातावर लिहिलेल्या सुसाइड नोटमध्ये तिने काही व्यक्तींनी विशेषतः एका पोलिस अधिकाऱ्याने तिच्यावर लैंगिक आणि मानसिक छळ केल्याचा उल्लेख केला. वारंवार तक्रारी करूनही योग्य न्याय न मिळाल्याने तिने शेवटी जगण्याचा अंत केला. ही केवळ एका व्यक्तीची शोकांतिका नाही ती आपल्या समाजातील स्त्रियांवरील अन्याय, शक्तीचा गैरवापर आणि संवेदनशील व्यवस्थेतील उदासीनतेचा प्रतिकात्मक धक्का आहे. आज स्त्रिया सर्व क्षेत्रांत पुढे आहेत. वैद्यकीय, शिक्षण, प्रशासन, विज्ञान, क्रीडा आणि उद्योगक्षेत्रातही त्यांचे यश झळकत आहे. तरीसुद्धा त्यांना दररोज मानसिक, शारीरिक आणि सामाजिक संघर्षांना सामोरे जावे लागते. फलटणमधील डॉक्टर ही उच्चशिक्षित, स्वावलंबी स्त्री होती. पण तिच्या बुद्धिमत्तेच्या आणि स्वावलंबनाच्या पलीकडे तिला ज्या दडपशाहीचा, छळाचा आणि सत्तेच्या गैरवापराचा सामना करावा लागला, त्याने दाखवून दिले की समानतेची लढाई अजून संपलेली नाही. या घटनेने महिला आरोग्यकर्मी, डॉक्टर, नर्स आणि इतर व्यावसायिक महिलांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष वेधले आहे. आजच्या स्पर्धात्मक जगात कामाचा ताण, सामाजिक अपेक्षा आणि कार्यस्थळी असमान वागणूक यामुळे अनेक स्त्रिया मानसिक त्रासातून जातात. समाजात स्त्री मजबूत असावी ही अपेक्षा असते, पण त्या मजबूतपणामागे दडलेले वेदनादायी वास्तव कोणी पाहत नाही. आत्महत्या हा पर्याय निवडणं म्हणजे समाजाकडून मिळालेल्या अन्यायाच्या, न ऐकलेल्या आवाजाच्या आणि दुर्लक्षित भावनांच्या निषेधाचा शेवटचा टप्पा आहे. भारतीय दंडसंहितेत लैंगिक छळ, बलात्कार, आत्महत्येस प्रवृत्त करणे या गुन्ह्यांबाबत कठोर तरतुदी आहेत. परंतु या कायद्यांचा अंमल तितकाच प्रभावी आहे का? फलटण प्रकरणात तक्रारी वेळेवर ऐकल्या गेल्या असत्या, अधिकाऱ्यांनी संवेदनशीलतेने वागले असते, तर कदाचित ही जीवघेणी वेळ आली नसती. अशा घटनेने हे सिद्ध होते की कायदा असणे पुरेसे नाही, तर त्याचा न्याय आणि तत्पर वापर होणे आवश्यक आहे. केवळ प्रसारमाध्यमांच्या चर्चांपलीकडे जाऊन प्रत्येक नागरिकाने विशेषतः सरकारी आणि प्रशासकीय यंत्रणेतील व्यक्तींनी महिलांविषयी आदर आणि सहानुभूतीची भूमिका अंगीकारणे गरजेचे आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न फक्त पोलिसांचा नाही; तो संपूर्ण समाजाचा आहे. फलटणच्या या डॉक्टरने आपल्या आत्महत्येद्वारे समाजासमोर एक कठोर प्रश्न उभा केला आहे. स्त्रियांना खरंच सुरक्षितता, न्याय आणि समानतेचा हक्क मिळतो आहे का? प्रत्येक स्त्रीच्या सुरक्षिततेची आणि सन्मानाची हमी देणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत समाज ठरेल.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### अभियंता नंदकुमार बेडगे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

सोलापूर आकाशवाणीचे अभियंता नंदकुमार बेडगे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. ३८ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नंदकुमार बेडगे निवृत्त झाले. पणजी दूरदर्शन प्रक्षेपण केंद्र येथे बेडगे ९ वर्षे कार्यरत होते. बेडगे हे लातूर, पंढरपूर येथेही कार्यरत होते. सोलापूर आकाशवाणीच्या अभियांत्रिकी विभागाचे सहाय्यक निदेशक तथा प्रशासकीय अधिकारी अर्चिता ढेरे, प्रसारण अधिकारी सोमशेखर पाटील, दैनिक जनसत्यचे संपादक सरदार आतार आदींची प्रमुख उपस्थिती होती. सोलापूर आकाशवाणीच्या अभियांत्रिकी विभागाचे सहाय्यक निदेशक तथा प्रशासकीय अधिकारी अर्चिता ढेरे यांनी नंदकुमार बेडगे आणि त्यांच्या मातोश्री विजया बेडगे यांचा सत्कार केला. रेणुका हब्बू, आकाशवाणीचे सलीम शेख, अभिराम सराफ, किशोर दुदगीकर, श्रृती जोकार, बर्षा हब्बू, ऋषिकेश बेडगे, पत्रकार सरदार आतार, सदाशिव बेडगे आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रचंलान अरविंद माने यांनी केले. सारिका बेडगे, अंकिता बेडगे, श्रुती जोकार, धनश्री बेडगे, नागेश जोकार, विशाल मिसाळ आदिंनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पत्रकार पद्माकर कुलकर्णी, पुरूषोत्तम कुलकर्णी, रोहित हब्बू, लिंगाप्पा बेडगे, रमेश बेडगे, बाळासाहेब मस्के व दिलीप मिसाळ, बसवेश्वर बेडगे, अमोल जुनवनकर, नागनाथ पाटील, कुमार वारद आदी उपस्थित होते.

### सुळेवाडी येथे श्री संत बाळूमामा प्राणप्रतिष्ठा सोहळा

**पिलीव, दि. १ नोव्हेंबर-**



माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे रविवार दि २ नोव्हेंबर रोजी संत बाळुमामा प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार उत्तमराव जानकर, आमदार बाबासाहेब देशमुख, माळशिरस तालुक्याचे लोकप्रिय माजी आमदार राम सातपुते, कुर्ला नागरी बँकेचे माजी अध्यक्ष बाबा मदने व इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त एक नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता बाळूमामा मिरवणूक सोहळा, दि.२ नोव्हेंबर रोजी सकाळी आठ वाजता महाअभिषेक व कळस पूजन, सकाळी ९ पासून गझीढोल कार्यक्रम, सकाळी ९ ते १२ अखंड नामस्मरण, दुपारी बारा वाजता मान्यवरांचे स्वागत समारंभ, दुपारी १२.३० पासुन भंडारा, सायंकाळी सात वाजता आरती, रात्री ८.३० पासून भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान आज एक नोव्हेंबर रोजी दुपारी पिलीव बाजारपेठेतून बाळूमामाच्या मूर्तीची मोठ्या उत्साहात मिरवणूक काढण्यात आली.

### घरगुती वादातून तरूणीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

घरगुती वादातून तरूणीने डेटॉल प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.करिश्मा नातू जाधव (वय २२, रा. नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी सकाळी पावणे दहाच्या सुमारास करिश्मा हिने घरी घरगुती वादातून डेटॉल लिक्विड प्राशन केले. त्यामुळे तिला त्रास होऊ लागल्यानंतर मामा अभिजित राठोड यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# सावकारांच्या त्रासाला कंटाळून सफाई कामगाराची आत्महत्या

**पत्नीची सातजणांविरुद्ध पोलीस ठाण्यात फिर्याद; घटनास्थळी चार सुसाईड नोट**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपालिकेतील सफाई कर्मचारी गणेश गोविंद बनसोडे (वय ४५, रा. म्हाडा कॉलनी, गाडेगाव रोड, बार्शी) यांनी व्याजाने पैसे देणाऱ्या सावकारांच्या त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी मृताची पत्नी वैशाली गणेश बनसोडे (वय ३५) यांनी सातजणांविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादीनुसार निलेश खुडे (रा. सुभाषनगर लहुजी चौक), प्रशांत माने (रा. बालाजी कॉलनी), विशाल गुगळे (सोनार, रा. बार्शी), अतुल कांबळे (रा. मंगळवार पेठ झोपडपट्टी), संगीता पवार (रा. ४२२ बार्शी), सचिन सोनवणे (रा. भीमनगर), व संतोष नानासाहेब कळमकर (रा. ४२२ बार्शी) या सातजणांनी व्याजाच्या पैशांच्या कारणावरुन गणेश यांना सातत्याने त्रास दिला होता.



फिर्यादी वैशाली बनसोडे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांचे पती गणेश गेल्या दहा वर्षांपासून बार्शी नगरपालिकेत सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत होते. पतीच्या उत्पन्नावरच घराचा उदरनिर्वाह चालत होता. दिवाळीनिमित्त त्या आपल्या दोन मुलांसह सोलापुरला म ाहेरी गेल्या असताना, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्या नणंदेचा फोन आला. तिने गणेश यांनी ग्रामीण रुग्णालयासमोरच्या कँटीनमध्ये गळफास घेतल्याची माहिती दिली.

तक्रारीनुसार, गणेश बनसोडे यांनी गेल्या वर्षभरात वेळोवेळी वर नमूद सातजणांकडून व्याजाने पैसे घेतले होते. मागील काही महिन्यांपासून त्यांनी सतत पैशांचा तगादा लावून, घर आणि कामाच्या ठिकाणी जाऊन शिवीगाळ, धमक्या व जातीवाचक अपमान करुन मानसिक त्रास दिला होता. प्रशांत माने, संगीता पवार आणि संतोष कळमकर हे वारंवार त्यांच्या घरी येऊन जातीवाचक बोलून, तुझी लायकी नाही, हातपाय मोडतो, अशा शब्दांत धमक्या देत असत. संगीता पवार हिने तर 'पैसे दिले नाहीस तर महिलांना घेऊन छेडछाडीचा खोटा गुन्हा दाखल करेन', अशी धमकी दिली होती, असेही तिने तक्रारीत नमूद केले आहे.

या सर्व मानसिक ताणामुळे गणेश बनसोडे नैराश्यात गेले होते. पत्नीने त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला; मात्र अखेर ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्यांनी गळफास घेऊन जीवन संपवले. घटनास्थळी पोलिसांना चार सुसाईड नोट्स मिळाल्या असून, त्यामध्ये वरील सातही जणांची नावे नमूद आहेत. त्या सर्वांकडून झालेल्या सावकारकीच्या त्रासामुळेच आत्महत्या केल्याचे स्पष्टपणे लिहिलेले आहे. या प्रकरणी बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक करीत आहेत. घटनेमुळे बार्शी शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जाहीर

**उद्यापासून अर्ज भरण्यास सुरुवात**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ नोव्हेंबर-**

गेल्या अनेक दिवसांपासून प्रतिक्षा असलेली बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक अखेर काल दि. ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर झाली असून दि.३ ते ७ नोव्हेंबर दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहे. तर ७ डिसेंबर रोजी मतदान होणार असून ८ डिसेंबर रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा निबंधक सहकारी संस्था किरण गायकवाड व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

सप्टेंबर महिन्यात बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जाहीर झाली होती. परंतु सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे महाराष्ट्र शासनाने अनेक सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या होत्या. बाजार समिती निवडणूकीसाठी ए.ए. गावंडे हे काम पाहणार निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सोमवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात ७ डिसेंबर रोजी मतदान तर ८ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. संचालक मंडळाची मुदत तीन वर्षांपूर्वी संपली होती. मात्र तीन वेळा मुदत वाढ व नंतर प्रशासकीय मंडळ बाजार समितीचा कारभार पाहत आहे. सहकारी संस्था ११ जागा, ग्रामपंचायत गटाच्या ४ जागा, व्यापारी-अडते २ जागा व हमाल तोलार १ जागा या चार मतदारसंघात १८ संचालकांसाठी ही निवडणूक होणार आहे. निवडणुकीसाठी दि.३ ते ७ नोव्हेंबर या दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. अर्जाची छाननी १० नोव्हेंबर रोजी होणार असून ११ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार आहे. त्यानंतर ११ ते २५ नोव्हेंबर या दरम्यान उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. दि.२६ नोव्हेंबर रोजी उमेदवाराची अंतिम यादी प्रसिद्ध व चिन्ह वाटप केल्यानंतर ७ डिसेंबर रोजी मतदान होईल तर ८ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन अंतिम निकाल जाहीर केला जाणार असल्याचे किरण गायकवाड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या या निवडणूक कार्यक्रमात म्हटले आहे.

# जिथे बळ तिथे स्वबळ, जिथे कमी बळ तिथे पाठिंबा

**महाविकास आघाडीच्या बैठकीत नेत्यांचे सूर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या संदर्भात महाविकास आघाडीची बैठक पंढरपूर येथे आमदार अभिजीत पाटील, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत ,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. सातलिंग शटगार,राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, शिवसेना उबाठाचे जिल्हाध्यक्ष संभाजीराजे शिंदे, मनसेचे जिल्हाध्यक्ष दिलीप धोत्रे, काँग्रेसचे निरीक्षक जावेद काझी उपस्थित होते.

माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील म्हणाले की उमेदवार हा जन माणसात मि सळणारा, लोकांची कामे करणारा, लोकांच्या सुखदु:खात सहभागी होणारा असावा. ज्यांना निवडणूक लढवायची आहे त्यांनी गण- गट व प्रभागात जाऊन मतदार यादीची पडताळणी करावी. मतदारांच्या गाठीभेटी घ्याव्यात. विरोधकांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवावे. काम करावे.

काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. शटगार म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत निष्ठावंत,एकनिष्ठ कार्यकर्त्यांना तिकीट देणार असून तो विश्वासू आणि पक्षनिष्ठ असला पाहिजे. निवडून आल्यावर दगा- फटका करणार नसावा. अशा निष्ठावंत कार्यकर्त्यांना वरिष्ठाच्या म ान्यतेनुसार संधी देणार असल्याचे सांगितले. शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष शिंदे, मनसेचे धोत्रे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष देशमुख, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन पंढरपूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आदित्य फत्तेपूर यांनी केले. यावेळी काँग्रेस पक्षाचे निरीक्षक जावेद काझी, तालुकाध्यक्ष संदीप पाटील, युवक काँग्रेसचे अध्यक्ष सुनंजय पवार, जिल्हा उपाध्यक्ष नागेश गंगेकर, अरुण भाऊ कोळी, हनुमंतराव मोरे, राहूल पाटील, सुहास भाळवणकर, समीर कोळी, अमर सूर्यवंशी, राहुल पाटील,नागनाथ आढळराव,बाळासाहेब मगर, राजेंद्र मोरे, मामा फलटणकर, संदिप शिंदे, राजाभाऊ उराडे, प्रा.अशोक डोळ, बाळासाहेब आसबे, नितिन शिंदे, शिवाजी धोत्रे उपस्थित होते.




# बार्शीत चोरी; ३२ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ नोव्हेंबर-**

बार्शी शहरातील १०० फुटी रोडवरील साई संजीवनी हॉस्पिटलशेजारील गांधी स्टॉप परिसरात एका भाड्याच्या घराचे कुलूप तोडून, अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करुन रोख रक्कम आणि चांदीचा ऐवज असा एकूण ३२ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत चैतन्य अनिल सोनवणे (वय २८, मूळ रा. आदित्य संस्कृती सोसायटी, लातूर, सध्या उ/ड मंगेश मारुती येरोळकर, १०० फुटी रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते गेल्या एका म हिन्यापासून वरील पत्त्यावर एकटेच भाड्याने राहत आहेत. त्यांचे आई-वडील लातूर येथे राहतात. दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी त्यांनी घर बंद करुन सोलापूर व नंतर पुणे येथे कामानिमित्त गेले होते. दि.३० ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता घरमालक मंगेश येरोळकर यांनी फोनवर कळविले की, त्यांच्या घराचे कुलूप तुटलेले असून दरवाजा उघडा दिसत आहे. चोरट्यांनी कपाटाचे कुलूप तोडलेले होते आणि त्यात ठेवलेली ३०,००० रुपये रोख रक्कम, तसेच अंदाजे २,००० रुपये किमतीची दोन चांदीची नाणी चोरुन नेल्याचे आढळले. बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# 'उमेद'च्या महिलांचा कट्ट्यावरील संघर्ष

**शासकीय उदासिनतेचा क्लेशदायक अनुभव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

रुई (ता. बार्शी): ग्रामीण विकासाचे इंजिन मानल्या जाणाऱ्या 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) अंतर्गत रुई (ता. बार्शी) येथील महिला बचत गटांना शासकीय उदासीनतेचा अत्यंत क्लेशदायक अनुभव येत आहे.



प्रशासनाच्या घोर दुर्लक्षामुळे आणि असंवेदनशील भूमिकेमुळे या महिलांना नाइलाजाने गावातील मुख्य चौकात, लोकांच्या वर्दळीत, उघड्यावर कट्ट्यावर बसून आपला महत्त्वाचा शासकीय कारभार आणि मासिक बैठका पार पाडाव्या लागत आहेत. विकासाच्या गप्पा मारणाऱ्या शासनाच्या दाव्यांना थेट आव्हान देणारे हे चित्र अत्यंत निंदनीय आणि गंभीर आहे. रुई येथील महिला बचतगटांना त्यांचे दैनंदिन कामकाज, महत्त्वाच्या बैठका आणि शासकीय योजनांचे दस्तऐवज ठेवण्यासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून एकही सुरक्षित कोपरा उपलब्ध नाही. जागा नसल्यामुळे, महिलांना अनेक महिन्यांपासून असुरक्षित आणि अत्यंत गैरसोयीच्या वातावरणात काम करावे लागत आहे. असुरक्षित बैठक व्यवस्था: ज्या ठिकाणी केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्त्वाच्या योजनांवर निर्णय घेतले जातात, तो शासकीय कारभार उघड्यावर, लोकांच्या सततच्या वर्दळीत चालतो आहे. या महिलांच्या कामाची आणि त्यांच्या सन्मानाची प्रशासनाला जराही किंमत नाही का, असा संतप्त सवाल महिलांनी उपस्थित केला आहे. बचतगटाचे महत्त्वाचे आर्थिक दस्तऐवज (लेखा-जोखा) आणि शासकीय साहित्य ठेवण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध नसल्याने त्यांच्या चोरीचा किंवा पाण्यामुळे नुकसान होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. या साहित्याचे काही नुकसान झाल्यास, त्याला सर्वस्वी प्रशासनाला जबाबदार धरले जाईल, असा इशारा महिलांनी दिला आहे. अत्यंत गैरसोयीच्या वातावरणात कामाचा अपेक्षित दर्जा राखणे महिलांना शक्य होत नाही. याचा थेट परिणाम ग्रामीण विकासाच्या गतीवर होत आहे. रुई गाव महिलांसाठी अडगळीतच का? - महिलांचा संतप्त आणि जळजळीत सवाल! शासनाच्या या निष्क्रिय भूमिकेमुळे 'रुई येथील बचत' गटासह सर्व महिलांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. वारंवार तोंडी आणि लेखी मागणी करूनही तालुका तसेच जिल्हा प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा गंभीर आरोप महिलांनी केला आहे. आम्ही 'उमेद' अभियानाचे काम करतो, जे ग्रामीण विकासाचे इंजिन आहे. तरीही आम्हाला एक साधे, सुरक्षित कार्यालय मिळत नसेल, तर प्रशासनासाठी रुई गाव आणि येथील महिला अजूनही विकासाच्या 'अडगळीत' पडल्या आहेत का? 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' म्हणणाऱ्या शासनाला ग्रामीण महिलांचा सन्मान कट्ट्यावर बसवून करायचा आहे का? - रुई येथील महिला बचत गट तात्काळ कृती करा, अन्यथा...: प्रशासनाला 'अंतिम' आणि थेट इशारा! रुई येथील बचत गटाच्या भाग्यश्री पावले, स्वाती चव्हाण, स्वाती भोसले, ज्योती ठोकळ, वंदना भोसले, विद्या भोसले यांनी जिल्हा आणि तालुका प्रशासनाला गंभीर इशारा दिला आहे.

प्रशासनाच्या एका निर्णयावर येथील शेकडो महिलांचे कार्य, सन्मान आणि ग्रामीण विकासाची गती अवलंबून आहे. रुई येथील महिलांनी आपल्या हक्कासाठी आणि सन्मानासाठी दिलेला हा 'कट्ट्यावरील' संघर्ष आता प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी किती गांभीर्याने घेतात आणि किती जलद कारवाई करतात, याकडे संपूर्ण बार्शी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**महिलांची न्यायपूर्ण मागणी**

जिल्हा आणि तालुका प्रशासनाने या गंभीर बाबीची तात्काळ आणि सर्वोच्च गांभीर्याने दखल घ्यावी.महिला बचत गटांच्या कार्यात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी लवकरात लवकर एक सुसज्ज, सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यालय (ऑफिस) उपलब्ध करून देण्यात यावे. जर पुढील सात दिवसांत महिलांसाठी सोय उपलब्ध झाली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आणि आक्रमक आंदोलन छेडू! या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नाची आणि कामाच्या नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल!

# संघ म्हणजे संघटन

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - ६**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नावातील शेवटचा शब्द म्हणजे संघ होय. हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. संघ म्हणजे अनेक जण. एकट्याचा कधी संघ होत नाही. आपला हिंदू समाज संख्येने एवढा मोठा पण प्रत्येकालाच आपण एकटे आहोत असे वाटणारा. डॉ. हेडगेवारांच्या आयुष्यातील एक प्रसंग खूप बोलका आहे, तो संघ स्थापण्यापूर्वीचा आहे. त्यावेळी डॉ.हेडगेवार काँग्रेसचे कार्यकर्ते होते. इंग्रज सरकारच्या सरकारचा निषेध करण्याकरिता गावोगावी सभांचे आयोजन करण्यात आले होते. त्या सभांमध्ये सरकारच्या निषेधाचा ठराव पारित करावयाचा होता. या सभेच्या निमित्ताने डॉ.हेडगेवार चंद्रपूर येथे गेले होते. नागपूरलाही सभेचे आयोजन केले होते. ही सभा नागपूरच्या टाऊन हॉलच्या मैदानात भरली होती. मैदान लोकांनी खच्चून भरले होते, वक्त्यांची जोरदार भाषणे झाली आणि निषेधाचा ठराव वाचणे सुरू झाले. तोच कुणीतरी अरे बापरे साप असे ओरडला आणि काही लोक पळू लागले, त्यांना पळताना पाहून बाकीचेही जणू काही साप आपल्याच पाठीमागे लागला आहे अशा कल्पनेने धूम ठोकून पळू लागले.

त्या वेळच्या महाराष्ट्र या वर्तमानपत्रातून या पळापळीचे रसभरीत वर्णन आले आहे. आपण का पळतो हेच लोकांना कळले नाही. बाकीचे पळतात म्हणून तेही पळत होते. डॉ.हेडगेवार चंद्रपूरहून आल्यानंतर अनेक पुढाऱ्यांकडे गेले आणि त्यांना सभेचा वृत्तांत विचारू लागले आणि प्रत्येक जण सांगून लागला, की सभा विशाल होती, भाषणे जोरदार झाली पण कुणातरी बदमाशाने रबराचा साप फेकून अरे बापरे साप अशी आरोळी ठोकून पळण्यास सुरुवात केली, तर सारी सभा पळून गेली. डॉक्टरांनी विचारले, तुम्ही तर तेथे होता, तुम्ही या लोकांना आवरले नाही? त्या प्रत्येकाकडून उत्तर आले, मी एकटा काय करू शकत होतो? अनेकांनी हेच सांगितले की मी एकटा काय करू शकत होतो? इतके लोक असूनही प्रत्येकास वाटत होते, की मी एकटाच आहे. डॉक्टरांनी ठरविले की हिंदू समाजामधील ही एकटेपणाची भावना काढून टाकायची, त्यासाठी संघ निघाला. रोज कोणी आपल्या संघटनेचे नाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असे सांगत नसतो. संघ हे त्याचे छोटे नावच सर्वांच्या तोंडी बसले आहे. तू कुठे जातोस? या प्रश्नाचे उत्तर असायचे संघात जातो. आज संघाचा कार्यक्रम आहे, ही संघाची शाखा आहे, हे संघस्थान आहे असे आपण म्हणतो. संघ महत्त्वाचा. म्हणजे अनेक असूनही एक असल्याची भावना महत्त्वाची.

संघ म्हणजे केवळ एकत्रीकरण नव्हे तर संस्कारयुक्त लोकांचे एकत्रीकरण म्हणजे संघ. संघाचे संस्कार कोणते? पहिला संस्कार हा की आपण सारे भारत मातेचे पुत्र हिंदू आहोत आणि सारे एक आहोत असे मनावर ठसणे. हिंदूंमध्ये जाती अनेक, भाषा अनेक, खाणे पिणे वेगवेगळ्या प्रकारचे, वर पुन्हा अमुक जात श्रेष्ठ अमुक कनिष्ठ अशी भावना आणि त्याच्यावरही कहर म्हणजे काही जाती अस्पृश्य म्हणजे त्यांना स्पर्श करावयाचा नाही, स्पर्श केला तर तो विटाळला असे वागणे अशा वैविध्यपूर्ण समाजाचा संघ बांधायचा म्हणजे आवळ्याची मोट बांधण्याइतके कठीण, पण डॉक्टरांनी हे अवघड काम करण्याचे कंकण बांधले व संघाची निर्मिती केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करून डॉ.हेडगेवार यांनी हिंदू समाजाला संघटित करण्याचे जणू शिव धनुष्यच उचलले. हे संघटन करत असताना डॉ.हेडगेवार यांनी एक सोपा मंत्र दिला. एकश: संपत् म्हणजे एका रांगेत उभे रहा. उच्च जातीचे असा अथवा नीच जातीचे असा, पहिल्याने आपला अहंकार सोडून आणि दुसऱ्याने आपली लाचारी सोडून एका रांगेत उभे राहायचे. कोणी श्रीमंत असतील तर आपल्या श्रीमंतीचा बडेजाव विसरून आणि कोणी गरीब असतील तर आपली दीनता विसरून एका रांगेत उभे राहावयाचे, कोणी शिकलेले पंडित असतील तर आपली विद्वत्ता बाजूला ठेवून आणि कोणी अडाणी असतील तर आपले अज्ञान विसरून एका रांगेत उभे राहावयाचे, हिंदू आहात ना? मग एका रांगेत उभे रहा. डॉ.हेडगेवार यांनी एकश: संपत् चा मंत्र दिला आणि अठरापगड जातींच्या लोकांना, नाना भाषा बोलणाऱ्या लोकांना, नाना प्रांतांच्या लोकांना, वेगवेगळी वेशभूषा असलेल्या लोकांना एका रांगेत उभे केले. मग ते एका रांगेत बसू लागले, एका रांगेत चालू लागले, एका रांगेत बसून जेवू लागले. हा तर मोठा चमत्कारच होता, तो डॉ.हेडगेवार आणि संघाच्या द्वारे घडविला. डॉ.हेडगेवार यांनी जातीभेदाविरुद्ध आक्रस्ताळी भाषणे दिली नाहीत. आम्ही अस्पृश्यता मिटविणार आहोत अशा घोषणा दिल्या नाहीत. सर्वांना एकच सांगितले, की आपण सर्व हिंदू आहोत आणि हिंदूंना आपण कसे एक आहोत याची जाणीव व्हावी, अगदी नकळत जाणीव व्हावी यासाठी दैनंदिन शाखा काढली. रोज सर्वांनी एकत्र यायचे, एका रांगेत उभे राहावयाचे, एकत्र खेळ खेळावयाचे, कधी सहल काढायची आणि सर्वांचा स्वयंपाक एका ठिकाणी शिजणार, स्वयंसेवक एका पंक्तीत बसून जेवणार, स्वयंसेवकच वाढणार, कोणी कुणाची जात विचारणार नाही, माहित असली तरी त्याचा गवगवा नाही. सारेच स्वयंसेवक. संघ स्वयंसेवकांचा आणि स्वयंसेवक संघाचे. हा पहिला अत्यंत महत्त्वाचा संस्कार संघाच्या शाखापद्धतीने दिला.

शाखा रोज असते. आम्ही देशासाठी हे करू, ते करू असे खूप लोक म्हणत असतात, त्या काळीही म्हणायचे. डॉ.हेडगेवार यांनी सांगितले, की दिवसाचे चोवीस तास असतात ना, त्यातले तेवीस तास तुमचे, एक तास तर देशासाठी द्या, समाजासाठी म्हणजे संघासाठी द्या. म्हणजेच जीवनाची अशी रचना करा, की त्या एक तासात मी स्वतःचा विचार करणार नाही, आपल्या नोकरीचा, आपल्या धंद्याचा विचार करणार नाही, संघाचा विचार करीन. संघ हे व्रत समजा. क्लबमध्ये व संघाच्या शाखेत फरक आहे. फुरसतीच्या वेळी जाण्याचे स्थान म्हणजे क्लब तर फ ुरसत काढून जाण्याचे काम म्हणजे संघाची शाखा. आपले सर्व खासगी कार्यक्रम अशा रीतीने आखायचे की संघासाठी कमीत कमी एक तास मोकळा राहिलंच, यामुळे जीवनाला एक वेगळा संस्कार मिळाला. मी केवळ म ाझ्याकरिता नाही समाजाकरिताही आहे, हा तो संस्कार होय. हिंदू समाजात याच सामाजिक भावनेचा अभाव होता, संघाने तो दूर केला. आपण हिंदू लोक खूपच व्यक्तीनिष्ठ आहोत, फार तर कुटुंबनिष्ठ. संघाने त्यांना समाजनिष्ठ बनविले. समाजनिष्ठेचे व्रत घेतलेल्या लोकांचे एकत्रीकरण म्हणजे संघ, म्हणून आपल्या येथे म्हटले जाते की संघ ही संस्कार देणारी शाळा आहे. कोणते संस्कार? तर हिंदू समाजाच्या एकतेचे, समाजशील जीवन जगण्याचे आणि आपले समाजाप्रती काही कर्तव्य आहे हे भान ठेवून जीवन जगण्याचे संस्कार. संघ या शब्दाचा असा व्यापक अर्थ आहे. एकत्रीकरण, समूह, गर्दी मेळा, सभा, संस्था या शब्दांपेक्षा संघ शब्दाचा अर्थ निराळा आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कश्मीर ते कन्याकुमारी सायकल रॅलीमध्ये बार्शीचे अमृत खेडकर यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ नोव्हेंबर-**

भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेअर्स अँड स्पोर्ट्स यांच्या सहकार्याने तसेच फिट इंडिया मूव्हमेंट अंतर्गत, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कश्मीर ते कन्याकुमारी या एकूण ४२५० कि.मी. अंतराच्या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही रॅली दि. ३१ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबर या कालावधीत पार पडणार असून देशभरातील निवडक सायकलस्वार त्यात सहभागी होणार आहेत. या प्रतिष्ठित रॅलीसाठी वृक्ष संवर्धन समिती बार्शी, बार्शी सायकलिंग क्लबचे सदस्य व सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील पोलीस हवालदार अमृत रोहिदास खेडकर यांची निवड झालेली आहे. या निवडीबद्दल बार्शी रनर्स क्लब, बार्शी सायकलिंग क्लब, सोलापूर ग्रामीण पोलीस दल, माढा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी, वृक्ष संवर्धन समिती बार्शी, सर्व मित्र परिवार यांच्यावतीने अमृत खेडकर यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. तसेच सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, बार्शी उपविभागीय अधिकारी अशोक सायकर, आणि माढा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी नेताजी बंडगर यांनीही अभिनंदन केले.





### महत्त्वाचे

## बार्शीचा प्रतिक आगरकर राज्यसेवा परीक्षेत महाराष्ट्रात ५१ वा



**बार्शी, दि. १ नोव्हेंबर-**

आपल्या जिद्द आणि मेहनतीच्या बळावर बार्शीतील प्रतिक स्मिता मुकुंद आगरकर याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (चझडउ) राज्यसेवा नागरी परीक्षा २०२४ मध्ये नेत्रदीपक यश संपादन केले आहे. प्रतिकने ऑल महाराष्ट्रमध्ये ५१ वी रँक मिळवून बार्शी शहराचे नाव राज्यभर उज्वल केले आहे. विशेष म्हणजे प्रतिकने हे यश कोणत्याही अभ्यासिका किंवा क्लासचा आधार न घेता, केवळ स्वतःच्या घरी राहून सातत्याने अभ्यास करत प्राप्त केले. तर प्रतिकचे हे यश केवळ ५१ व्या रँकमुळेच नव्हे, तर त्याच्या यापूर्वीच्या कामगिरीमुळेही विशेष ठरते. प्रतिकची यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्यकर निरीक्षक २०२३, सहायक कक्ष अधिकारी २०२३ आणि राज्यकर निरीक्षक २०२४ या पदांसाठीही निवड झाली होती. एकाच वेळी चार महत्त्वाच्या शासकीय पदांसाठी निवड होणे, हे प्रतिकच्या अभ्यासाची अचूक दिशा आणि कठोर परिश्रमाचे द्योतक आहे. बार्शीत राहून, कोणत्याही मोठ्या शहराचा आधार न घेता प्रतिकने मिळवलेले हे यश, ग्रामीण भागातील आणि आर्थिक परिस्थितीमुळे मोठ्या शहरात जाऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक मोठा प्रेरणास्रोत आहे. प्रतिकच्या या यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत असून, भावी प्रशासकीय सेवेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या जात आहेत.



## विंचूर महिला बचत गटाकडून वडकबाळ गोशाळेला मदत

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील विंचूर येथील महिला बचत गटाच्या ग्रामसंघाने पुरग्रस्त असणाऱ्या वडकबाळ येथील श्री कट्टेव्वादेवी गोशाळेला गुप्तदानाच्या स्वरूपात मदतीचा हात दिला. उमेद अंतर्गत विंचूर येथील महिला बचत गटकाम करीत आहे. प्रमिला वांगीकर यांच्या प्रेरणेने या ग्रामसंघाच्यो सर्व महिला सदस्यांनी एकत्र येऊन दहा हजार रूपये रक्कम जमा केलो. ती रक्कम वडकबाळ येथील श्री कट्टेव्वादेवी गोशाळेला गुप्तदानाच्या स्वरूपात गोशाळेतील पशूंच्या चाऱ्यासाठी गोशाळेच्या अध्यक्षा उमा बिराजदार यांच्याकडे देण्यात आली. यावेळी प्रमिला वांगीकर, सुमित्रा कोठे, शोभा पाटील, द्यामव्वा परीट, सविता बेनुरे उपस्थित होते.



## गोशाळा चालकांकडून एकता दौड

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असणारे पोलादी पुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीचे औचित्य साधून गोशाळा चालकांकडून गो एकता दौडचे आयेजन करण्यात आले होते. गो एकता दौडची सुरूवात गो पूजनाने करण्यात आली. गिरीश शहा यांच्या मार्गदर्शनाखाली चार पुतळयापासून सात रस्त्यापर्यंत गो एकता दौड पार पडली. यावेळी पुष्पलता पाटील महाराज, उमा बिराजदार, महेश भंडारी, केतन शहा, प्रविण तळे, विजयकुमार पिसे, अभय कुलते, सुधीर बहिरवडे, आरती मेटकरी,अण्णासाहेब सुपनवर, माधुरी पारपल्लीवार, विजय यादव, शुभम साठे, राजेश वडशेरला, सुभाष रजपूत उपस्थित हेते. रूद्रप्पा बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले.

## देशभक्ती वृध्दींगत करण्यासाठी पाच लाख विद्यार्थ्यांकडून वंदे मातरम् राष्ट्रीय गीत गायन

### सात दिवस सर्व शाळांमध्ये चालणार उपक्रम

**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर -**

राष्ट्रगीत वंदे मातरम् या अमर गीताला यंदा १५० वर्षे पूर्ण होत असल्याने जिल्ह्यातील तीन हजार ५८३ प्राथमिक शाळेतील जवळपास पाच लाख विद्यार्थ्यांनी शुक्रवारी वंदे मातरम राष्ट्रीयगीत गायन केले. राज्यातील सर्व शाळांमध्ये शुक्रवारपासून वंदे मातरम गीताचे गायन सुरू करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या शाळेत वंदे मातरम् गीत गायन केले जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रीय अभिमान आणि एकात्मतेची भावना वृद्धिंगत व्हावी, यासाठी शालेय शिक्षण विभागाने सर्व जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांना आदेश जारी केले आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व शासकीय, खासगी, तसेच अनुदानित शाळांमध्ये पुढील सात दिवस दररोज सकाळच्या प्रार्थनावेळी वंदे मातरम गीताचे गायन होणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या शाळेत शुक्रवारी तीन हजार ५८३ शाळेतील सुमारे पाच लाख विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् गीत गायले आहेत. हा उपक्रम सात दिवस चालणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि राष्ट्रीय एकता वृद्धिंगत होण्यास मदत होणार आहे.

# कांद्याचा बाजारभाव घसरला; शेतकऱ्यांमधून टाहो

- कांद्याला अनुदान पाहिजे!
- सोलापूर बाजारपेठेत कांद्याची वाढली आवक दर मात्र जैसे थेच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ नोव्हेंबर**

राज्यातील कांद्याच्या विक्रमी उलाढालीसाठी प्रसिद्ध असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या काही दिवसांपासून कांद्याची आवक आणि दर घसरल्याने शेतकऱ्यांमधून कांदा अनुदान देण्याची मागणी आता जोर धरू लागलेली आहे. बाजार समितीत गेल्या काही दिवसांपासून कांद्याची आवक कमी प्रमाणात येत होती. मात्र शनिवारी कांद्याची आवक वाढल्याचे चित्र दिसून आले. सुमारे २८० ट्रक कांदा विक्रीसाठी सोलापूर बाजार समिती दाखल झाला. मात्र हा सर्व कांदा परजिल्ह्यातील असून सोलापूर जिल्ह्यातील कांदा अद्याप विक्रीसाठी आलेला नसल्याचे अडत व्यापाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, अतिवृष्टी आणि महापुरामुळे शेतकरी बेहाल झाला आहे. अशा अवस्थेत शेतकऱ्यांना शासनाने आधार देणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील अनेक कांदा लागवड क्षेत्र पाण्याखाली गेल्याने सोलापूर जिल्ह्यातील कांदा जवळपास नसल्यातच जमा आहे. त्यामुळे सोलापूर बाजार समितीमध्ये अहिल्यानगर, बीड, लातूर, नांदेड, पुणे जिल्ह्यातील कांदा विक्रीसाठी येत आहे. सर्वाधिक कांदा हा अहिल्यानगर जिल्ह्यातील असून येथील शेतकऱ्यांना सोलापूर बाजार समितीमध्ये वाढीव दर अपेक्षित असल्याने हजारो टन कांदा विक्रीसाठी आणला होता. परंतु, दर जैसे थेच असल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडली. त्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाकडे आता कांदा अनुदानाची मागणी केली आहे.



श्री सिद्धेश्वर सोलापूर बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आणलेल्या आपल्या कांद्याला लिलावात काय दर मिळतो? याची प्रतीक्षा लावून बसलेला शेतकऱ्याचे टिपलेले हे छायाचित्र.

### कांद्याची आवक वाढली दर मात्र जैसे थे

सोलापूर बाजार समितीमध्ये शनिवारी कांद्याची मोठी आवक झाली. मात्र कांद्याचे दर जैसे थेच होते.१२०० ते १६०० हा दर प्रतिक्विंटल कांद्याला मिळाला. चांगल्या दर्जाच्या कांद्याला १८०० रुपये इतका उच्च दर मिळाला. जागतिक बाजारपेठेत भारत सरकारने कांद्याच्या निर्यात शुल्काचे दर कमी जास्त केल्याने भारताच्या कांद्याची मागणी कमी झाल्याने खरेदीदार कांदा खरेदी करण्यात हात आकडा घेत आहेत.

**- सादिक बागवान, अडते श्री सिध्देश्वर सोलापूर बाजार समिती**

### कांदा अनुदान गरजेचे

कांद्याचे दर सातत्याने घसरत आहेत. अशा परिस्थितीत कांदा अनुदान मिळणे गरजेचे आहे. मोठ्या प्रमाणात कांद्याचे लागवडी क्षेत्र असून त्यासाठी तितक्याच प्रमाणात खर्च येतो. मात्र उत्पन्न त्या पद्धतीने मिळत नसल्याने, खर्च वजा जाता शिल्लक उत्पन्न राहत नाही. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. अशा अवस्थेत सरकारने शेतकऱ्यांसाठी कांदा अनुदान जाहीर करणे गरजेचे आहे.

**- बाळासाहेब वाघमोडे, कांदा उत्पादक शेतकरी मिरजगाव अहिल्यानगर**

### वाढीव दराची अपेक्षा

कांदा लागवड क्षेत्र एक एकर असताना त्यासाठी सुमारे ८० ते ९० हजार रुपये खर्च येत आहे. मात्र मिळणारे उत्पन्न ६० ते ७० हजार रुपये इतके आहे. शेतकऱ्यांना प्रति एकरी २० रुपयांचा फटका बसत आहे. दर वाढले नसल्याने गेल्या पाच महिन्यांपासून कांद्याची साठवणूक केली होती. मात्र साठवणुकीतील कांदा खराब होत असल्याने विक्रीसाठी बाजारपेठेत आणला असता वाढीव दर अपेक्षित असताना तसा मिळाला नाही. दर वाढले पाहिजेत अशी मागणी आहे.

**- विठ्ठल चितळकर, कांदा उत्पादक शेतकरी अहिल्यानगर**

## गवळ्याची लेक झाली उपजिल्हाधिकारी

- वडीलांची इच्छा मुलीने पूर्ण केली
- हिपळे येथील गवळी कुटुंबाने मुलीला दिले बळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

एमपीएससी परीक्षेच्या निकालात दक्षिण सोलापूर तालुक्यातील हिपळे येथील आरती परमेश्वर जाधव हिने एमपीएससी परीक्षेत राज्यात मुलींमध्ये पहिली येण्याचा मान मिळविले आहे. उपजिल्हाधिकारी होण्याचा मान मिळविले आहे.



आरतीचे वडील परमेश्वर उर्फ वामन मलबा जाधव हे गवळी म्हणून दूध संकलन करुन कुटुंबाचा चरितार्थ चालवतात. परमेश्वर हे वामन गवळी म्हणून ओळखले जातात. त्यांनी अत्यंत संघर्ष करुन १९९० मध्ये वाणिज्य शाखेची पदवी मिळवली आणि एमपीएससी साठी प्रयत्न केले. पण केवळ एका मार्काने जाधव हे एमपीएससी परीक्षेत अपयशी ठरले होते. तेव्हा त्यांनी दूध व्यवसाय करून आपल स्वप्न पुढच्या पिढीत रुजवलं. भाऊ महावीर मालबा जाधव याला आधी पीएसआय केले. त्यानंतर मुलगा विनायक वामन जाधव गटविकास अधिकारी याला एमपीएससीत यशस्वी होण्यासाठी पाठबळ दिले. आता मुलगी आरतीने उपजिल्हाधिकारी परीक्षा उत्तीर्ण होऊन वडिलांच्या अपूर्ण स्वप्नाला यशाचे कोंदण लावले आहे. आरती जाधव सध्या नागपूरला मुख्याधिकारी म्हणून प्रशिक्षण पूर्ण करत आहे.

### वडिलांच्या जिद्दीला सलाम

वामन गवळी यांना एमपीएससी परीक्षेत अपयश मिळाल्यानंतर त्यांनी जिद्दीने भावाला, मुलाला व मुलीला क्लास वन अधिकारी होण्यासाठी मेहनत घेतले. शिवाय वेळोवेळी मार्गदर्शन करीत स्वताची स्वप्नाची परीपूर्ती केली. त्यामुळे गवळी वामन जाधव यांच्या जिद्दीला सलाम म्हणत परीसरात जोरदार चर्चा सुरू आहे.

## कार्तिकीत स्वच्छतेला प्राधान्य

### जिल्हाधिकाऱ्यांकडून शौचालयाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ नोव्हेंबर-**

कार्तिकी शुद्ध एकादशी सोहळा २ नोव्हेंबर रोजी संपन्न होत असून कार्तिकी यात्रा कालावधीत लाखो वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना दर्शनरांग, पत्राशेड, वाळवंट, भक्तीसागर ( पासष्ठ एकर) येथे पाणीपुरवठा,आरोग्य, सुरक्षा, स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्वतः प्रत्येक ठिकाणी जाऊन शौचालयाची व्यवस्था, त्या ठिकाणी पुरेसे पाणी उपलब्ध आहे का? स्वच्छता ठेवण्यात आली आहे का व वारकऱ्यांना शौचालयाचा वापर केल्यानंतर हात धुण्यासाठी हँडवॉशची ही सोय या ठिकाणी करण्यात आले आहे त्याची पाहणी केली. काही शौचालये स्वतः जिल्हाधिकारी यांनी उघडून पाहणी केली आहे. शौचालय साफसफाई करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ तसेच शौचालयाची वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी जेटींग व सक्शेन मशीन उपलब्धता करण्यात आली आहे.



स्वच्छतेच्या वाहनांना वाहतुकीचा कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

## चैतन्याचे प्रणेते डॉ. आंबेडकर ग्रंथाच्या तृतीय आवृत्तीचे आज लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

ज्येष्ठ विचारवंत दत्ता गायकवाड लिखित चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथाच्या तृतीय आवृत्तीचा लोकार्पण सोहळा रविवार दि. २ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता सोलापुरातील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.




हा सोहळा ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागीय अपर आयुक्त तुषार ठोंबरे हे राहणार आहेत. याप्रसंगी अंबाजोगाईचे प्रांताधिकारी दीपक वजाळे तसेच सोलापूरचे ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा. एम. आर. कांबळे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या ग्रंथाद्वारे लेखक गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा आणि सामाजिक चैतन्याचा सखोल वेध घेतला असून विचारप्रवर्तक व प्रेरणादायी असा हा ग्रंथ वाचकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रगती प्रकाशनतर्फे करण्यात आले असून निमंत्रक म्हणून सूर्यमणी गायकवाड, दत्ता थोरे, संतोष पवार, सुधीर चंदनशिवे व सुजित हावळे यांचा सहभाग आहे. या सोहळ्याला आंबेडकरी विचारवंत, वाचनप्रेमी, विद्यार्थी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### घरगुती वादातून महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** - घरगुती वादातून महिलेने फिनेल प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. लावण्या आकाश साळवे (वय २१, रा. न्यु जगजीवनराम झोपडपट्टी, मोदी, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी सकाळी पावणे नऊच्या सुमारास लावण्या हिने घरी घरगुती वादातून फिनेल प्राशन केले. त्यामुळे तिला त्रास होऊ लागल्यानंतर भाऊ रोहित जोगळेकर यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## जि.प. चा विद्यार्थी बनला क्लासवन अधिकारी

### मंद्रुपचा सुपुत्र नौशाद काझी महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुपचे सुपुत्र नौशाद शहाजहान काझी यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग परिक्षेत उत्तीर्ण होवून वर्ग १ अधिकारी होण्याचा मान पटकावला आहे.

काझी यांनी मिळवलेल्या यशाबद्दल मंद्रुपकरांमध्ये उत्साह आणि अभिमानाची बाब मानली जात आहे. मंद्रुपच्या जिल्हा परिषद शाळेत शिकणारा विद्यार्थी क्लास वन अधिकारी बनल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

काझी यांचे प्राथमिक शिक्षण मंद्रुप जिल्हा परिषद शाळेत झालु असून माध्यमिक शिक्षण महात्मा फुले विद्यालय येथे झाली आहे.

महाविद्यालयीन शिक्षण सोलापूर व छत्रपती संभाजीनगर येथून पूर्ण केला आहे. काझी यांचे वडील शहाजहान काझी यांनी संपत्तीपेक्षा मुलांच्या शिक्षणाला महत्त्व दिल्याने मंद्रुपमधील एक सुशिक्षित कुटुंब म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते. नौशाद काझी यांचे बंधू आसिफ काझी हे मुंबई पोलीस दलात सेवा करीत आहेत.

### मंद्रुपमधील पहिला वर्ग १ अधिकारी



नौशाद काझी हे सध्या मंत्रालयात सहायक कक्ष अधिकारी म्हणून काम करीत होते. शासकीय सेवा करताना एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने मंद्रुपमध्ये पहिला क्लास वन अधिकारी होण्याचा मान मिळाला आहे. त्यामुळे मंद्रुपच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

## जयसिंह ते कर्मवीर चौक हा रखडलेला रस्ता अखेर मार्गी

### अकलूज नगरपरिषदेच्या नगरोत्थान योजनेतून होणार काँक्रिटीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १ नोव्हेंबर-**

शहरातील सर्वाधिक वर्दळीचा जयसिंह चौक - गांधी चौक ते कर्मवीर चौक हा दोन किलोमीटरचा रस्ता अखेर अडथळ्यांमधून बाहेर येत नगर परिषदेच्या अखत्यारीत वर्ग करण्यात आला आहे.

गेली काही वर्षे सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) आणि महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ (चडठऊ) यांच्यातील अखत्यारविषयक वादामुळे या रस्त्याच्या दुरुस्ती व विकासाची कामे रखडली होती. परिणामी, रस्त्यावरील खड्डे आणि वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक व नागरिक यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी



सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी थेट मंत्रालयीन पातळीवर पाठपुरावा सुरू केला. संबंधित विभागांशी सलग बैठका घेऊन, आवश्यक पत्रव्यवहार करून अखेर रस्ता नगर परिषदेकडे वर्ग करण्याचा लवकरच अंतिम निर्णय होणार आहे.

नगर परिषदेकडे हा रस्ता वर्ग झाल्याने आता नगरोत्थान योजनेतून या रस्त्याचे संपूर्ण काँक्रिटीकरण आणि सुशोभीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे. रस्त्याचे रुंदीकरण आणि दिव्यांची उभारणी या कामांमुळे या भागाचे सौंदर्य आणि सुविधा दोन्ही वाढणार आहेत.

या निर्णयाबाबत शिवतेजसिंह मोहिते-पाटील म्हणाले, अकलूज शहराच्या वाहतुकीचा हा मुख्य मार्ग आहे. नागरिकांच्या सोयीसाठी आणि शहराच्या दर्जेदार विकासासाठी हा रस्ता नगर परिषदेकडे वर्ग होणे अत्यंत आवश्यक होते. आता काँक्रिटीकरण आणि सुशोभीकरणाचे काम लवकरच सुरू होणार असून अकलूजकरांना एक सुंदर आणि टिकाऊ रस्ता लवकरच मिळेल. या निर्णयामुळे अकलूज शहराच्या नागरी विकासाला नवसंजीवनी मिळाली असून, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.